१९७० **माणूस** चाळीस पैसे



ाशिक शहरात एक झाड होतं. १८७० सालात त्या झाडाचं बीजारोपण झालं. आणि बरोबर २६ वर्षांनी त्या झाडात काहीतरी संचारल्यासारखं झालं—ते झपाटलं! त्यावर कसला तरी मंत्र टाकल्यासारखं झालं. आणि मग त्या झाडात आमूलाग्र बदल झाला. ते मंतरलेलं झाड म्हणजे भारतीय चित्रपटसृष्टीचे आद्य जनक

## दासाहेब ऊर्फ धुंडिराज गोविंद फाळके

१८७० | १८७० | १८७० | १८७० | १८७०

१९७० | १९७० | १९७० | १९७० | १९७०

२५ एप्रिल १९७०

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष नववे : अंक सत्तेचाळीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर । सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

माणूस मी नियमीत वाचण्याचा प्रयत्न करतो. परंतु काही वेळा राहून जाते. २१ फेब्रुवारी १९७० च्या अंकात डॉ. मो. ग. कानिटकर व श्री. श्री. ज. जोशी यांच्या पत्रव्यवहाराचे कात्रण एका मित्राने माझ्याकडे पाठविले आहे. डॉ. मो. ग. कानिटकरांचे म्हणणे असे दिसते की, कै. काकासाहेब गाडगीळ यांच्या आत्मचरित्रांत त्यांनी कै. बाळूकाका कानिटकरांचा उल्लेखही केलेला नाही. आणि उल्लेखही नाही हे वाचून श्री. श्री. ज. जोशी सर्द झाले असे म्हणतात.

या दोघा सद्‌गृहस्थांनी कै. काकासाहेबांच्या पथिक या आत्मचरित्राच्या पहिल्या खंडाची सूची जरी उघडून पाहिली असती तरी त्यात त्यांना कै. बाळूकाकांच्याबद्दल खालील गौरवपर उल्लेख आढळले असते—

" कै. बाळूकाका कानिटकर आम्हाला सहावीत इंग्रजी शिकवीत. त्यांची तळमळ, वक्तशीरपणा व शिकवताना होणारी तन्मयता अजूनही मी विसरलो नाही. "

(पृष्ठ ४२ ओळ २१)

' बाळूकाका कानिटकर यांनी शिकवताना केलेला हितोपदेश व त्यागाचे महत्त्व याची माझ्या मनावर छाप पडली होती. ' (पृष्ठ ४४ ओळी ५)

' बाळूकाका कानिटकर, वा. वि. साठे व सेनापती

प्रकाशित लेख, चित्र इत्यादीबाबत हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

बापट या तिन्ही व्यक्ती विलक्षण होत. थट्टेने मी त्याना 'कफ, वात, पित्त' म्हणे. तिघांची तळमळ अवर्णनीय, मिळवून न घेण्याचे व्यक्तित्व विलक्षण. चारित्र्याने तिघेही श्रेष्ठ होत.' (पृष्ठ २५७ ओळ ३)

या व्यतिरिक्त सूचिमध्ये नसलेला पुढील भाग 'पष्ठ २२८ वर आहे-

'म्हणून २६ जानेवारीच्या कार्यक्रमात मी प्रतिज्ञा वाचन करावे व बाळूकाका यांनी थोडे भाषण करावे असे ठरले. आमची तयारी झाली. चौकाचौकातून माझी व कानिटकर याची व्याख्याने झाली. मंडईत गोटीराम भय्याने डफावर थाप मारून तुफान प्रचार चालविला...मी, बाळूकाका, गोटीराम व नतर अतोबा काळे असा क्रम ठरवून टाकला. बरोबर ५ वाजता मी शनिवार वाड्यापुढे आलो. दहापधरा मंडईतील स्वयंसेवक झेंडा घेऊन हजर होते. मी आलो व नंतर बाळूकाका आले. सुमारे २५ वर्दी घातलेले व तितकेच पोलीस गुप्त आमच्या घोळक्या भोवती उभे राहिले होते. सामान्यपणे राजकीय मचावर व सभेस हजर राहणारे मिरासदार कोणी नव्हते. सव्वा-पाचला आम्ही स्वातंत्र्याचा व गांधीचा जयजयकार करून निघालो--माझ्या अंगात ताप होता. बाळूकाका म्हणाले 'टांग्यात बसा.' मी नाकारले. आमची मिरवणूक गणपती दरवाजावरून टिळक पुतळ्यावरून सायंकाळी सहा वाजता शिवाजी मंदिरात पोहोचलो. वाटेत माणसे दूरदूर उभे राहून बघत. घरातून खिडक्यातून काही बघत. बुधवारच्या हौदाजवळ दोनचार फिरकोळ हार माझ्या व बाळूकाकाच्या गळ्यात पडले. पश्चिम भागात म्हणजे शनीच्या पारा-नतरच्या यात्रेत मंडळी फार थोडी दिसली. त्या भागात बुद्धिमत्ता माहेराला आली होती. गांधीच्या चळवळीने परंपरागत राजकीय व सामाजिक नेतृत्व निःसत्व केले होते हा राग होता. शिवाजी मंदिरात आम्ही मिरवणुकीत २० जण व दूरवर उभे असलेले शंभर याशिवाय उपस्थिती नव्हती. शिवाजी पुतळ्याच्या पायरीवर बसून केसरी कंपूतील काही मंडळी टवाळी करीत होती. हे लिहिण्यात दुःख होत आहे, पण सत्य ते सांगितले पाहिजे. झेंडावंदन झाले. भय्या रंगला होता. सामान्य-जनाचा तो प्रतिनिधी होता. स्वातंत्र्याचा खरा लाभ सामान्य जनाला मिळवा-वयाचा होता. निदान त्यावेळी हा आमचा संकल्प होता. गीत संपताच प्रतिज्ञा-वाचन झाले. मी सांगितले व इतरांनी म्हटले. बाळूकाका दोन मिनिटे बोलले. आम्ही घरी परतलो.'

गोटीरामभय्या यांच्याबद्दल तर कै. काकासाहेब गाडगीळ यांनी एक स्वतंत्र लेख लिहिला होता आणि नवयुगमध्ये तो प्रसिद्ध झाला होता. एक उत्कृष्ट शब्द-चित्र असा अभिप्राय अनेक व्यावसायिक साहित्यिकांनी त्याबद्दल दिला होता. वाचकाना "सालगुदस्त" या कै. काकासाहेबांच्या लेखसंग्रहात तो लेख वाचा-वयास मिळेल.

कै. बाळूकाकांचा उल्लेख कै. काकासाहेबानीही आपल्या आत्मचरित्रात केला

नाही, इतरांच्या बद्दल अपेक्षा नव्हती असे जेव्हा डॉ. कानिटकर लिहितात, त्यावेळी कै. काकासाहेबांनीसुद्धा त्यांच्या वडिलावर अन्याय केला असे त्यांना ध्वनित करावयाचे आहे. परतु त्याचे साहित्य उघडूनसुद्धा न पाहता असे बेधडक विधान करून डॉ. कानिटकर यांनी माझ्या वडिलावर अन्याय केला आहे म्हणून मला हे लिहावे लागत आहे. माझ्या वडिलांचे काही वैशिष्ट्य असेल तर नेमके हेच होते की, गरीब, दुःखित, उपेक्षित आणि लौकीकदृष्ट्या अयशस्वी यांची ते मुद्दाम कदर करीत.

गेल्या महिन्यात पथिकचा तिसरा अप्रकाशित खंड प्रसिद्ध झाला. त्या प्रकाशन समारंभाच्या वेळी श्री. श्री. ज. जोशी याचे भाषण झाले होते. पथिकवर भाषण करताना त्याचे पहिले दोन खंड श्री. जोशी यांनी वाचले असावेत अशी अपेक्षा होती, परतु कै. बाळूकाकाबद्दल कै. काकासाहेबानी उल्लेखही केलेला नाही हे डॉ. कानिट-कराचे विधान खरे आहे असे गृहीत धरून आपण सर्द झालो असे श्री. जोशी ज्यावेळी लिहितात त्यावेळी पथिकचे पहिले दोन खंड श्री. जोशी यानी खरोखर वाचले की नाही याबद्दल शका येते. का राजकारणी लोकाप्रमाणे साहित्यिकही लवकर विसरतात असे म्हणावे?

आपला विश्वासू,
वि. म. गाडगीळ

---


महाराष्ट्र शासन पुरस्कार लाभलेले
आमचे एक गौरवास्पद प्रकाशन

व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०


---

३० एप्रिल १९७०
या दिवशी
दादासाहेब फाळके यांची
जन्मशताब्दी साजरी होत आहे.

# एक मंतरलेलं झाड

भाई भगत

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट.„आपल्या ह्या हिंदुस्थानातील गोष्ट. बरोबर एका शतकापूर्वीची म्हणाना. नाशिक शहरात एक झाड होतं. १८७० सालात त्या झाडाचं बीजारोपण झालं आणि बरोबर २६ वर्षांनी त्या झाडात काहीतरी संचारल्यासारखं झालं–ते झपाटलं ! त्यावर कसलातरी मंत्र टाकल्यासारखं झालं आणि मग त्या झाडात आमूलाग्र बदल झाला. कुणी कदाचित् त्या साध्या झाडाला कल्पवृक्ष म्हणू लागले. तशीच कथा नि व्यथा होती त्या झाडाची.

ते मंतरलेलं झाड म्हणजे भारतीय चित्रपटसृष्टीचे आद्य जनक कै दादासाहेब फाळके उर्फ धुंडिराज गोविंद फाळके. त्यांचा जन्म नाशकाचा–१८७० सालचा.

अशी कुठली शक्ती होती त्यांच्यात की त्यानी ह्या देशात सिनेमाचा शोध लावला ? अशी शक्ती फक्त द्रष्टयांच्याच मनी यावी असा संकेत आहे. त्यासाठी भारताच्या पुण्यग्रामी अशी व्यक्ती जन्मावी लागते. त्या व्यक्तीनं कुठल्यातरी एका वेडानं पछाडावं लागतं. दादासाहेबांचं वेड एकच–सिनेमाचं. त्या वेडापायी त्यांनी आपलं सर्वस्व पणाला लावलं. त्या वेडापायी ते आपली तहानभूक हरपले. उठता बसता, खाता पिता एकच ध्यास मनी–सिनेमाचा. त्या ध्यासापायी, त्या वेडापायी त्यानी अनेकांची हेटाळणीदेखील सहन केली असेल. पण त्या हेटाळणीकडे दुर्लक्ष करतो तोच महापुरुष बनतो. दादासाहेब म्हणूनच भारतीय सिनेमाचे महापुरुष बनले.

गोष्ट अशी. कामधंद्यानिमित्त दादासाहेबांचं वास्तव्य मुंबईत होतं.

ल्युमिएर बंधूंनी काढलेला पहिला मूकपट भारतात १८९६ साली प्रदर्शित झाला. ख्रिस्तचरित्रावरचा हा मूकपट. दादासाहेबांनी तो पाहिला आणि त्यांच्या महत्त्वाकांक्षी डोक्यात पहिला विचार आला. ह्या ख्रिस्ताच्या जागी जर कृष्णचरित्र

चित्रित केलं तर ? आणि काय कल्पनेला पंख फुटले. दादासाहेबांनी एकच ध्यास घेतला. कृष्णचरित्रावर भारतात मूकपट काढायचा. त्यासाठी त्यांनी तो मूकपट थिएटरात जाऊन अनेक वेळा पाहिला. हा कसा काढला असेल ? त्यासाठी कुठली साधनसामग्री असेल ह्यावर त्यांनी खूपखूप विचार केला.

त्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकं मागवली त्या विषयावरची. पण तरीही समाधान होईना. म्हणून त्यांनी परदेशची वारीही केली. आपली स्वतःची पुंजी त्यासाठी त्यांनी खर्ची घातली. एवढ्यानही जमत नाहीसं पाहिल्यावर स्वत:च्या पत्नीचे दागिनेही मोडायला त्यांनी कमी केलं नाही.

आणि मग चित्रपटमाध्यमाचा संपूर्णपणे अभ्यास केल्यावर दादासाहेब फाळके नावाच्या महापुरुषानं १९१३ च्या सुमाराला 'राजा हरिश्चंद्र' ह्या पहिल्या मूकपटाच प्रदर्शन भारतात प्रथमच केलं. त्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम खरोखरच कौतुकास्पद असे होते. 'राजा हरिश्चंद्र' पाहायला मुंबईच्या कॉरोनेशन थिएटरात लोकांनीं अक्षरशः जत्रेसारखी गर्दी केली. सकाळी ७ वाजल्यापासून रात्री १२॥ वाजेपर्यंत खेळ चालत आणि पैशांच्या थैल्या नेण्यासाठी बैलगाड्यांचा उपयोग करावा लागला.

फाळक्यांनी चित्रपटतंत्र आणण्याआधी पडद्यावर चित्र नव्हती असं नाही. पण ती स्थिर-चित्रं स्वरूपात होती. त्यांना गती प्राप्त झाली नव्हती. ह्या गतीचा—स्थिरचित्रांच्या गतीचा शोध प्रथम परदेशात लागला. स्थिरचित्रं एकापाठोपाठ एक जर निरनिराळ्या स्वरूपात एकदम दाखवली गेली तर त्याना विशिष्ट गती प्राप्त होते नि ती हालू-चालू लागतील हे ते शास्त्र. त्या शास्त्रानुसार दादासाहेबांनी आपलं पहिलं चित्र 'राजा हरिश्चद्र' तयार केल. ते पाहून प्रेक्षक तर देहभानच विसरले. पडद्यावरील चित्र हालचाल करू शकतील हे कस काय शक्य आहे ? पण ह्या किमयागारानं ते करून दाखवलं याबद्दल त्यावेळच्या प्रेक्षकानी दादासाहेबांची पाठ थोपटली.

दादासाहेबांनी त्यावेळच्या समाजाला आवडतील अशा विषयांची रचना आपल्या मूकपटातून केली. पौराणिक विषय हे सद्भिरुचीला धरून तर होतेच पण त्याबरोबर चमत्कारांची भरपूर रेलचेल असल्यामुळे तसल्या विषयावरील चित्रपट लोकप्रिय व्हायला कठीण नव्हते. हे हेरून त्यांनी 'राजा हरिश्चंद्र' च्या पाठोपाठ 'भस्मासूर मोहिनी' व 'सावित्री' हे मूकपट १९१४ साली सादर केले.

पण त्याच सुमाराला युरोपात पहिल महायुद्ध पेटलं आणि त्याची झळ हिंदुस्थानालाही लागली. त्यामुळे बाल्यावस्थेतल्या ह्या धंद्याला तशी थोडीफार नुकसानी जाणवली.

तरीही दादासाहेबांची किर्ती इंग्लंडात पोचली होतीच. लंडनच्या 'बायोस्कोप' मध्ये त्यांच्याविषयी प्रशंसा प्रसिद्ध झाली आणि सेसिल हेंपवर्थ ह्या ब्रिटिश चित्रपटजनकानं त्यांना इंग्लंडमध्ये येऊन चित्रपटनिर्मिती करण्याचं आमंत्रण दिलं. पण

ह्या देशाभिमानी पुरुष नं ते आमंत्रण नाकारून आपल्या देशाचीच पताका उंचावण्याचं ठरवलं.

महायुद्धाच्या धामधुमीतच दादासाहेबांनी 'लंकादहन', 'श्रीकृष्णजन्म' व 'कालिया मर्दन' हे मूकपट काढले त्यांना अमाप लोकप्रियता लाभली. 'कालिया मर्दन' मध्ये तर त्यांची कन्या मंदाकिनी हिन कृष्णाची भूमिका केली होती आणि ह्याच्या उलट म्हणजे त्यांच्या सुरुवातीच्या काही मूकपटातून कामे करण्यास स्त्रिया मिळत नसत तेव्हा त्यांनी पुरुषपात्रांकडूनच स्त्रीभूमिका करवून घेतल्या. अर्थात पुढं पुढं हे वादळ शमल आणि त्यांना स्त्रीभूमिकेसाठी नटी मिळू लागल्या.

दादासाहेबांच्या चित्रपटनिर्मितीमागची तळमळ म्हणजे एकच गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे. त्यांच्या चित्रपटाची कथा लिहिण्यापासून ते दिग्दर्शन, छायालेखन, संकलन, कलादिग्दर्शन इ. चित्रपटकलेतील सर्व खाती दादासाहेब स्वतः संभाळीत. खऱ्या अर्थानं ते वन मॅन शो करीत.

जवळजवळ २१ वर्षं दादासाहेबांनी मूकपटांची निर्मिती केली नि त्या अवधीत जवळजवळ १०० तरी मूकपट काढले.

पहिल्या महायुद्धाच्या काळात आपल्या मूकपटाला सुरुवात करून दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीला दादासाहेबांनी 'गंगावतरण' हा एकमेव बोलपट कोल्हापुरात काढला. हे एक आश्चर्य मानावं लागेल. त्यानतर १९४४ साली नाशकात दादासाहेब आपले शेवटचे दिवस काढीत असतानाच निवर्तले !

दादासाहेबांच्या मूकपटाबद्दल जर विचार करू लागल तर एकच गोष्ट लक्षात येते की त्यांनी पौराणिक कथाविषय निवडल्यामुळे स्पेशल इफेक्टसवर म्हणजे ट्रिक-फोटोग्राफीवर जादा भर दिला होता आपल्या चित्रपटातून. त्या काळात आजच्या एवढं हे तंत्र प्रगत झालेल नव्हत. तरीसुद्धा दादासाहेबाचे मूकपट एकाच अँगलनं शूट केलेले असत. त्यामुळे त्यांना स्टेजप्लेच स्वरूप होत. तरीसुद्धा काहीतरी वेगळं पाहायला मिळतं म्हणून प्रेक्षक खूष होते

दादासाहेबांनी कलात्मक चित्रपट काढण्यापेक्षा गल्लाभरू मूकपटांवर विशेष भर दिला होता. कलात्मक चित्रपटांची मुहूर्तमेढ दादासाहेबांच्या नंतर आलेल्या बाबूराव पेंटरांनी रोवली. तरीसुद्धा चित्रपटाचे आद्यजनक म्हणून दादासाहेबांच्या पुढे आजच्या चित्रपटधंद्याची मान विनम्रतेन खालीच राहील.

अशा ह्या एका मतरलेल्या झाडानं माणसाच्या मनान एकादं वेड घेतलं की तो काय करू शकतो हे आपल्या कृतीनं साऱ्या जगाला दाखवन दिलं. त्या मतरलेल्या झाडाचा विस्तार आता बराच वाढला आहे. त्या मूकपटाचे नंतर बोलपट झाले. बोलपटांनी साहित्य–शास्त्र–मनोरंजन हे त्रिसूत्र पाळलं काळ्यापांढऱ्या रंगानंतर आज रंगीतही बोलपट निघू लागलेत

आणि हळूहळू दादासाहेबांच्या रूपातलं हे मतरलेल झाड परदेशातही आपल्या शाखा पसरवू लागलंय्.

□ □ □

# विचार धारे

समीर

## अमेरिकेचे आंतरराष्ट्रीय धोरण

अमेरिकेच्या आतरराष्ट्रीय धोरणाचे इतिहासकार म्हणून प्रसिद्ध असलेले एक अमेरिकन तज्ज्ञ प्रा. नॉमन ग्रेबनर या विषयावर भाषणे देण्यासाठी नुकतेच दिल्लीला येऊन गेले. तेव्हा या धोरणाची काही प्रमुख प्रमेये त्यांनी विशद केली :


जगापासून अलग राहण्याची वृत्ती अमेरिकेत पुन बळावत आहे असे म्हणता येणार नाही. "अमेरिका आता जगाच्या कारभारात इतकी गरफटली आहे की १९३० च्या सुमारास तिने जे अलगपणाचे धोरण स्वीकारले होते ते पुन: स्वीकारणे तिला शक्य होणार नाही." खरे म्हणजे सध्याच्या परिस्थितीत अलगपणा ('आयसोलेशॅनिझम्') हा शब्द वापरणे चुकीचे आहे जगापासून सपूर्णपणे अलग रहावे असे अमेरिकेतील जनमत नाही. सध्याचे मत असे आहे की अमेरिकेने वाजवीपेक्षा अधिक जबाबदाऱ्या अगावर घतल्या आहेत. व त्यापैकी काही जबाबदाऱ्या विशेषत आशियाई प्रदेशातल्या-कमी करण्यात याव्यात. अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणाचा विकास करण्याचे श्रेय ज्यांना विशेष द्यावे लागेल असे अध्यक्ष म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टन्, जॉन क्विन्सी अडॅम्स, थियोडोर रुझवेल्ट, वुड्रो विल्सन, फ्रँकलिन रुझवेल्ट आणि हॅरी ट्रूमन. या मंडळींपैकी प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाची परराष्ट्रीय धोरणावर छाप पडली असली तरी त्या धोरणात एक प्रकारची सुसूत्रता टिकून राहिली. अमेरिकन परराष्ट्रीय धोरणातला पहिला विशेष बदल अध्यक्ष निक्सन यांच्या कारकीर्दीत घडून येत आहे. उदाहरणार्थ, गेल्या वीस वर्षात प्रथमच चीन-विषयक एखाद्या नवीन धोरणाचा शोध अमेरिकेत सुरू झाला आहे.

एक प्रश्न : भारत व चीन याच्यात युद्ध झाले तर भारताच्या मदतीला जावे असे अमेरिकेला वाटेल काय? उत्तर : हे अमेरिकन सरकारने ठरवायचे आहे, पण आशियात स्थैर्य नांदावे ही अमेरिकेने आपली एक आतरराष्ट्रीय जबाबदारी मानली आहे, तेव्हा या स्थैर्याला धोका निर्माण झाला तर अमेरिकेला नक्कीच काळजी वाटेल.

## उद्योग-संचालनात कामगाराचे स्थान

उद्योगधंदा किंवा कारखाना म्हटला की मजूर आणि मालक हा भेदभाव आलाच ही पारपरिक समजूत कितपत खरी आहे? मजूर हेच मालक होऊ शकणार नाहीत काय? थोडक्यात म्हणजे आधुनिक उद्योग-संचालनात कामगाराचे स्थान कोणते? या विषयावर भारतात निरनिराळ्या ठिकाणी भाषणे देण्यासाठी आलेले युगोस्लाव्ह तज्ज्ञ डॉ. स्टानिस्लाव् ग्रॉझ्डॅनिक यानी दिल्लीच्या मुक्कामात काही अभ्यासपूर्ण मते प्रगट केली :

[पृष्ठ ६४ वर]



व्हेनेस्सा रेडग्रेव्ह । डेव्हिड हेमिंग्ज । 'ब्लो-अप'मध्ये

कधी तरी आपल्यालाही एकादा वेगळा अनुभव आलेला असतो.

डोक्यात विचारांचे किडे असतात. आपलीच नाहीतर कोणाची छोटी मुलगी बाजूला भातुकली खेळत असते; एकटीच. डोक्यातला विचार असह्य होऊन अगतिकपणे, या क्षणी यातून कोणत्याही उपायाने एकदा बाहेर पडायचे असे ठरवून आपण त्या पोरटीशी बळेच जाऊन म्हणतो, काय चिऊताई, काय खेळता ?

खेळात गढलेली ती पोर गालातल्या गालात गोड हसून म्हणते, भातुकली.

आम्ही येऊ का खेळायला ?–तुम्ही विचारता.

तिला आश्चर्य वाटते. हा एवढा गंभीर नि कामाचा मोठा माणूस आज आपल्याशी कसा खेळायला निघाला ? पण का कुणास ठाऊक, ती एकदम तयार होते. म्हणते, हो. या. आपण खेळू. आणि मग तो भातुकलीचा खेळ सुरू होतो. छोटा चिऊ तुम्हाला एक भूमिका देते.

# क्लो-अप

विजय तेंडुलकर

तिच्या प्लास्टिकच्या बबडीच्या जरा मोठ्या भावाची नाहीतर बाबाचीच. तुम्हाला बबडीला घ्यायला लावते–ती रडते म्हणून. तोवर ती तुमचे पान वाढते–तिच्याच तळव्या एवढ्या ताटलीत. मध्येच वैतागून म्हणते, हे काय, नीट घ्या ना तिला. अहो अशाने बबडीची मान तिरपावेल! मग तुम्ही जेवायला बसलात की चिऊ बबडीला मांडीवर घेऊन तिला उगी करीत तुम्हाला तूप वाढते, कढत कढत वरण वाढते, लोणचे वाढते, पापड भाजून देते, आणि चुकून त्या रिकाम्या नाहीतर शेंगादाण्यांची पूड आणि लिमलेटचा चुरा असल्या पक्वान्नानी भरलेल्या ताटलीत तुम्ही अंदाजाने हात घातलात की ती ओरडते, हे काय, लोणचे काय कालवता? भात तो तिकडे आहे? ताटलीतला बोलाचा पापड तुम्ही उचललात की ती कळवळते. म्हणते, पापड गरम आहे ना, एकदम काय उचलता? पोळी म्हणून वाढलेला बिस्किटाचा तुकडा तुम्ही सगळाच्या सगळा तोंडात टाकता आणि ती किंचाळते, ई ग बाई! कधी तुम्हाला जेवायचे कळणार? सगळी पोळी काय एकदम खातात वाटतं? तुकडे मोडून खायची!

असा दम त्या चिमुरडीकडून खाता खाताच तुमच्या नकळत तुम्ही त्या भातुकलीत एक्स्पर्ट बनता, जेवून उठल्यावर न चुकता खोट्या खोट्या चुळा भरता आणि बबडीचा गोडसा पापा घेऊनच तिला टाटा करीत खोटे खोटे हपिसला निघता. आणि 'हपिसला निघता' ना वाटेत वहाणा चढवायला विसरत नाही–खोट्या खोट्या वहाणा.

वेळ नकळत भरभर जातो. तुम्ही रगता. स्वत:चे विचार विसरता. चिऊच्या भातुकल्या संसारात काय म्हणजे काय आणि काय कुठे असते ते तुम्हाला अचूक

समजू लागते. आणि मध्येच ते सगळे जगतांना तुमच्या संसाराच्या गृहिणीची जून हाक कोठून तरी येते; जेवायला वाढलेय, चला. नाहीतर मग म्हणाल, उशीर केला म्हणून! आज हपिस आहे म्हटले.

क्षणभर तुम्हाला काहीच कळनासे होते. काय खरे? आताच तर जेवलो की. हपिसला सुद्धा गलो. लुटुपुटीच्या, समजासमजीच्या जगातून बाहेर यायला मन नाराज होते. वाटते, आहे हेच छान आहे-हेच खरे आहे आणि खरे आहे ते खोटे. साफ खोटे!

नकळत एका आभासात तुम्ही मनाने गुतलेले असता आणि नंतर काही वेळ खरे जगतांना हा आभास सारखा तुमच्या मागून मागून येतो. तुम्हाला कळेनासे होते, काय खरं? नि आभास नक्की कोठला?

सत्य आणि आभास यातला हा माणसाला एकेकदा पडणारा संभ्रम प्रतिभाशाली कलावंतांना नेहमीच मोह पाडीत आला आहे. याच सभ्रमावर आधारलेला चित्रपट कार्लो पाँती हा निर्माता आणि मायकेलेंजेलो अँतॉनिआनी हा दिग्दर्शक या दोघांनी तयार केला आहे. मुंबईत मेट्रो सिनेमात तो नुकताच गर्दीशिवाय चालला. या गूढ, गमतीशीर चित्रपटाचे नाव 'ब्लो-अप'

ब्लो-अप म्हणजे छोटया छायाचित्राचे खूप मोठया आकाराचे छायाचित्र. परंतु तुम्ही छायाचित्र-कलेतले जाणते नसलात तर तुमच्या ध्यानात हा संदर्भ प्रथमदर्शनी येणे कठीण. आणि असे मोठ्या आकारातले छायाचित्रच या रंगीत चित्रपटाच्या रहस्याची मेख झाले आहे.

*लंडनमधला एक छायाचित्रकार, तरुण. देखणा. कामसू. स्वच्छंदी.* उभ्या उभ्या चुटक्या वाजवाव्या नाहीतर मान खाजवावी तसा हा छायाचित्रे काढतो. छायाचित्रे काढणे हा याचा छंद नव्हे, देहधर्म झाला आहे. कोणताही विषय याला वर्ज्य नाही. परंतु पैसा भरपूर मिळतो तो तरुण पोरींच्या नखरेबाज शृंगारिक छायाचित्रावर. अशा कैक पोरी याच्या स्टुडिओत पडलेल्या असतात. याची मर्जी प्रसन्न व्हावी म्हणून त्या झुरतात, जीव टाकतात. याच्या मनाला येईल तेव्हा हा त्यातल्या कोणाचा; एरवी कुणाचाही नव्हे. लग्नाच्या बायकोचाही नव्हे. जणू कॅमेऱ्याशीच त्याचे लगीन झाले आहे.

(छायाचित्रकाराचे हे जग दाखवतांना अँतोनिआनीने चित्रपटाच्या रंगीन छायाचित्रणाचा एक वेगळाच देखणा, कलापूर्ण आदर्श पडद्यावर अथपासून इतीपर्यंत मांडला आहे. स्टुडिओतल्या वेगवेगळ्या वस्तु, साधने आणि रंगसंगती यांच्या कल्पक उपयोगाने अँतोनिओनी प्रत्येक दृश्य, दृश्याचा प्रत्येक तुकडा शोभादायक करतो.)

हा छायाचित्रकार एका मोठाल्या पार्कात योगायोगानेच पोचतो. पार्क बव्हंशी निर्मनुष्य आहे. एकीकडच्या टेनिस कोर्टवर कोणीतरी दोन माणसे खेळताहेत.

पार्कमध्ये एक जोडपे त्याला दिसते. त्यांचे एकमेकांशी प्रेमचाळे चालू आहेत. दोघेही मध्यमवयस्क आहेत. छायाचित्रकार सवयीने या भानगडीचे फोटो घेऊ लागतो. फोटो घेऊन तो जाऊ लागतो आणि जोडप्यातली स्त्री त्याच्या मागे धावत येते–ती धावत येतांनाही तिचे फोटो तो झडपतो. ती त्याच्यावर नाराज आहे. फोटो का काढले? तो म्हणतो, आपली मर्जी. आपण छायाचित्रकारच आहोत. ती म्हणते, फोटोज देऊन टाक. तो म्हणतो, प्रिंटस काढल्यावर देऊ. तिला निगेटिव्ह हवी. तो नकार देतो. ती त्याचा माग काढीत नंतर स्टुडियोवर येते. निगेटिव्हसाठी गळयात पडते. तिच्या समजुतीसाठी तिला तो निगेटिव्हची गुंडाळी देतो–पण चुकीची. ती स्त्री जाते. जवळची निगेटिव्ह डेव्हलप करून तो तिचे प्रिंटस काढू लागतो. प्रिंटस पहातांना त्याला संशय येऊ लागतो. प्रिंटसवरून अधिक मोठे प्रिंटस तो काढतो. त्याची शंका बळावते. त्या मध्यमवयस्क जोडप्याच्या एका फोटोच्या 'ब्लो-अप'मध्ये मागल्या झुडपाआडून एक चेहरा चोरून डोकावतो आहे. चेहऱ्याखाली हातही बाहेर आला आहे आणि हातात पिस्तुल आहे. छायाचित्रकार संभ्रमित होतो. आपल्याला खरेच काही सापडते आहे की भास होताहेत? एकदा त्याला वाटते, भास, पुन्हा वाटते, भास नव्हेत, दिसते ते खरे आहे. पण हे कसे शक्य आहे? आणि शक्य असेल तर पुढे काय घडले?

तो खेचल्यासारखा पुन्हा त्या पार्कात पोचतो. रात्रीची वेळ आहे. पार्कात कोणी सुद्धा नाही. तो एकटाच भारल्यासारखा फोटोमधली विशिष्ट जागा धुंडीत त्या जागेशी पोचतो–पहातो, त्या जागेवर, झाडाखाली प्रेत. संध्याकाळच्या त्या जोडप्यापैकी पुरुषाचे प्रेत. तो त्या प्रेताला स्पर्शदेखील करतो. खरेच प्रेत! थंडगार. निष्प्राण. अचेतन प्रेत! फोटोतली पिस्तूल रोखलेल्या हाताची जागाही खरी. भीतीचा काटा अंगावर उभा राहून छायाचित्रकार त्या ठिकाणापासून धावत सुटतो, नको–संबंध नको! आपल्या कानी सात खडे!

पण स्टुडियोत येतो तर फोटोज आणि त्यांचे 'ब्लो-अप्स'–दोन्ही पळाले! इतकेच काय, निगेटिव्ह देखील गायब! तो सैरावैरा शोधतो पण सर्व गेलेले–जणू कधी नव्हतेच! कधी नव्हतेच!

छायाचित्रकाराला आता हे घेरते रहस्य स्वतःपाशी ठेवणे अशक्य होते. तो त्याच्या एजंटला गाठतो. हा एजंट त्याची छायाचित्रे नेहमी खपवून देतो. एजंट चरसाच्या नशेत चरस पिणाऱ्यांच्या पार्टीत तुस्त आणि धुंद पडून आहे. तो छायाचित्रकारालाही आग्रह करतो आणि चरस घेऊन आपले हे हीरोमहाराज जे बेहोष लोळतात ते भल्या सकाळी जागे होतात.

जवळच तो पार्क! पुन्हा तो पार्कमध्ये घुसतो. खेचल्याप्रमाणे त्या जागी येतो. पहातो. तिथे काहीच नाही. प्रेत नाही! प्रेताचा मागमूस नाही. जणू कधी नव्हतेच! सगळा भासच!

एकीकडे निगेटिव्हसकट प्रिंटस स्टुडिओतून अंतर्धान पावलेली; त्यात आता तेरही बेपत्ता! ती बाईही रात्री रस्त्यावरच्या गर्दीत ओसरती पुन्हा दिसली वाटली आणि कसून शोधले तर सापडलीच नाही! जणू ती खरी नव्हतीच, तोही एक भासच होता! सगळा-सगळा भास? स्वप्न? पण ते तरी कसे शक्य आहे? भास इतके खरे कुठे असतात? पाहिले ते तर सर्व सर्व खरे आणि पुरावा म्हणावा तर कांहीच नाही.

चक्करलेल्या छायाचित्रकाराला या संभ्रमित, सुन्न मनःस्थितीत काही तरुण-तरुणींची गँग खिदळत, आरडाओरडा करीत जीपमधून येताना भेटते. वास्तविक चित्रपटाच्या आरंभालाही ही गँग अशीच दंगल माजवीत एका जीपमधून गेली आहे. 'पॅंटोमाइम' नावाच्या शब्दातीत नाटकातल्या पात्रांप्रमाणे तोंडाला पांढरी राख डी फासून प्रत्येकाने चित्रविचित्र वेष केलेला आणि शिवाय हातात भिकेसाठी घ्यावे तसे एकेक डबडे घेतलेले. छायाचित्रकाराच्या अंगावरून ही गँग पार्कमध्ये घुसते. ओसाड टेनिस-कोर्टाशी सगळे आरोळ्या मारीत उतरतात. टेनिसकोर्टकडे धावतात. छायाचित्रकार पहातो आहे.

गँगपैकी एक तरुणी आणि एक तरुण—तोंडाला राखाडी फासून विचित्र पोषाख केलेली—टेनिसचा डाव सुरू करतात. त्याच अवतारातली बाकीची गँग कोर्टाच्या कडेला जाळीला टेकून उभी रहाते आणि खेळ पहाते.

छायाचित्रकार रितमित आहे फोटो घेण्याचेही त्याला सुचत नाही आहे. कारण या डावात रॅकेट्स खोट्या खोट्या नि टेनिसचा चेंडूही खोटाच आहे! फक्त खेळ खरा! खेळाडू जणू खरा चेंडू खऱ्या रॅकेटने उंच टोलवावा, अडवावा, हळूच पलीकडच्या पाटीत 'टपाल' करावा किंवा मारण्याच्या प्रयत्नात हुकावा तसे हुबेहूब आविर्भाव करताहेत. पुढे मागे धावताहेत. आवाज कसलाच नाही. पण वाटते चेंडू हाणटल्याचे, टोलवल्याचे आवाज ऐकू येत आहेत. गँगपैकी बघ्यांच्या नजरा काल्पनिक चेंडूबरोबर चक्क इकडे आणि तिकडे फिरताहेत.

छायाचित्रकाराची ही नजर अभावितपणे चेंडूबरोबर, खेळाबरोबर फिरू लागते. एक खोटा खोटा खेळ, खेळाचा आभास, खरा खेळ होतो आहे. खेळणारे आणि पहाणारे तो खेळ चक्क जगताहेत. निःशब्दपणे.

आणि चेंडू कोर्टबाहेर येऊन पडतो खेळाडू तरुणी खुणावते, प्लीज तेवढा चेंडू टाका. पुन्हा खुणावते. आर्जवाने खुणावते. छायाचित्रकार बेभान उभा आहे. पुन्हा ती खुणावते. प्लीज—टाका ना तेवढा चेंडू. आणि छायाचित्रकार मंत्रमुग्धपणे निघतो. हातचा कॅमेरा गवतात टाकून 'चेंडू' कडे जातो. 'चेंडू' उचलतो. 'चेंडू' खेळाडूकडे उंच उडवून टाकतो. तोंडाला राखाडी फासलेले बघे टेनिस कोर्टाशी उभे राहून पहाताहेत; निस्तब्धपणे.

एका खोट्या खोट्या खेळात खरा छायाचित्रकार आता सहभागीच झाला आहे.

एका आभासात तो स्वतःच पुरता अडकला आहे, कैद झाला आहे. आभासाच्या सीमेवर एका विलक्षण खुनाचा किंवा खुनाच्या आभासाचा एकमेव साक्षीदार झालेला तो, आता आभासाचा कृतीने भागीदार झाला आहे. सत्य कोणते? भास कोणता?

एकटाच छायाचित्रकार पार्कच्या पडद्यावर गर्द हिरवळीत स्वतःला हरवून उभा आहे, आपल्यापासून लांब लांब जातो आहे. आणि अखेर तो पुसूनच जातो, ती हिरवळ काय ती दिसत रहाते. हिरवा पोपटी समुद्र. आणि अखेर-स-मा-प्त.

सत्य आणि आभास यातल्या पुसट सीमारेषेचा 'ब्लो-अप' आणि त्यात हरवलेला एक छायाचित्रकार.

केवळ छायाचित्रकारच नव्हे, प्रेक्षकदेखील. निदान प्रेक्षकाने काही वेळ असे हरवावे अशी दिग्दर्शकाची इच्छा आहे, यत्नही आहे. या यत्नात एक कुशल छायाचित्रकार त्याला सोबतीला मिळाला आहे. दोघांनी मिळून या चित्रपटाला शब्दांपलीकडचे आणि कोठे कोठे ध्वनीपलीकडचेही निव्वळ दृश्य सामर्थ्य दिले आहे. मिनिटे मिनिटे निःस्तब्धपणे जातात. कसला म्हणून आवाजच नाही. फक्त दृश्य. क्वचित झाडांची आणि वाऱ्याची सळसळ. एखाद्या पक्षाची दूरवरची फडफड. श्वासोच्छ्वास. बस्स. याउलट काही दृश्यांतून बोलणे, बडबडणे, वेगवेगळे ध्वनी, यांचा एकच कोलाहल; प्रसंगी कर्कश. हा कोलाहल आणि निव्वळ स्तब्धता यांची जणू एक अनियमीत परंतु सहेतुक आणि तीव्र वीणच या चित्रपटात विणली आहे आणि पडद्यावरच्या स्वप्न नि वास्तव या दरम्यान फिरणाऱ्या खुबीदार रंगीत दृश्यांनी नि रहस्यपूर्ण प्रसंगांनी या विणीचा उपयोग करून घेऊन एक मंत्र प्रेक्षकावर घालण्याचा, चित्रपटाच्या नायकाप्रमाणे त्यालाही सत्याभासाच्या खेळात थोडा वेळ ओढण्याचा आणि कोंडण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा प्रकारच्या चित्रपटाची गंमत घ्यायची तर प्रेक्षकाच्या बाजूनेही सहकार्य हवे. जादूच्या प्रयोगात ते लागते, मोहिनी विद्येच्या प्रयोगात लागते तसे अशा चित्रपटातही लागते. घटकाभर बिनशर्त चित्रपटाधीन होण्याची तयारी हवी. चांगल्या चित्रपटापुरती ती आपोआप असतेच आणि हा एक चांगला चित्रपट आहे. हा चांगला खेळ आहे. म्हटले तर आपल्या एखाद्या अनुभवाची ओळख देणारा. म्हटला तर एका आगळ्या, विलक्षण अनुभवात आपल्याला सहभागी करणारा. आणि अखेर, जे घडले ते खरे की खोटे अशा संभ्रमात आपल्याला सोडून देणारा.

एवढे नक्की की हा नेहमीसारखा नाही.

## मुक्ताफळे

### किती गांधींच्या, किती लफंग्या?

अजून येतो वास फुलांना
अजून माती लाल चमकते
खुरट्या बुंध्यावरी चढून
अजून बकरी पाला खाते

मर्ढेकर हे आपल्या एका कवितेची सुरुवात अशी करतात. मर्ढेकर गेले. त्यांना जाऊनही खूप दिवस झाले. अजून फुलांना फक्त वास येतो. माती लाल चमकते आणि खुरट्या बुंध्यावर चढून अजून बकरीच पाला खाते. ज्ञानेश्वरांपासून मर्ढेकरां-पर्यंत सर्व कवींनी हे पाहिलेले आहे. जे न देखे रवि ते देखे कवी – अशा कवींना फक्त एवढेच पहाण्याचे भाग्य लाभले.

परंतु मंडळी आता यातले काही थोडे बदलणार आहे. यापुढेही आपल्याला फुलांचा फक्त वासच घेता येईल. माती खाण्याचे प्रसंग फक्त काही पहिलवानांनाच येतील. बाकी, मातीही पायाखालीच चुरडली जाईल. पाला खाण्याचा मक्ता मात्र यापुढे फक्त बकरीकडे रहाणार नाही! पालाच काय, झाडाचे बुंधे-फांद्या-मुळे हे सर्व आता आपण खाणार आहोत.

तसा शोधच लागलेला आहे! मद्रास विश्वविद्यालयाच्या एका केंद्राचे डायरे-क्टर प्रोफेसर रामचंद्रन यांनी नुकताच हा शोध जाहीर केला आहे. आजच्या पाल्यापासून, मुळांपासून, फांद्यापासून, बुंध्यापासून आता अन्न तयार करता येईल, असा शोध त्यांनी लावला असून, आता लवकरच हा 'झाडपाला-प्रकल्प' भारतात सुरू होणार आहे.

आपण 'स्टार्च' हा रासायनिक पदार्थ पचवू शकतो. परंतु 'सेल्युलोज' हा रासायनिक पदार्थ माणसाला पचत नाही. पालेभाज्या आणि फळातून आपण खातो तो 'स्टार्च.' पाना-फुलात-फांद्यात ठेचून भरलेला असतो तो 'सेल्युलोज.' प्रो. रामचंद्रन यांनी 'सेल्युलोज'चा 'स्टार्च' करण्याची क्रिया शोधून काढून, भारता-वर मोठेच उपकार केले आहेत. वस्तुत: हे जग निर्माण केले तेव्हा परमेश्वराची इच्छा अशीच होती की माणसाने गवत, झाडपाला वगैरे डायरेक्ट खावा! परंतु माणसाला गवत, झाडपाला, कोवळ्या कोवळ्या फांद्या या गोष्टी देखिल पचवता येईनात. परमेश्वर पंचायतीत पडला. मग उपाय म्हणून त्याने बकरी, मेंढ्या

निर्माण केल्या. हेतू हा की बकरी, बोकड, गाय व मेंढ्या झाडपाला-गवत वगैरे खातील आणि त्यांच्या पोटात रासायनिक क्रिया झाल्यावर माणसांनी बोकड, बकऱ्या व मेंढया खाव्या! म्हणून तर बहुसंख्य लोक बोकडाचे मटण खातात. कोंबड्या खातात. ससे खातात. गाई खातात.

सर्व 'नॉनव्हेजिटेरियन' अन्न हे मुळात असे 'स्ट्रिक्टली व्हेजिटेरियन' प्रकरण आहे. परमेश्वराचा हेतू साध्य झाला, परंतु इच्छा पुरी होण्याचा योग प्रो. रामचंद्रप्रभूंनी आता आणलेला आहे.

एकदा का हा 'झाडपाला प्रकल्प' सुरू झाला की भारतात प्रोटीनची इतकी रेलचेल होणार आहे की विचारू नका. परदेशी धान्याची आयात यामुळे बंद होणार. अमेरिकेची यापुढे मिजास चालणार नाही. अरे नका देऊ गहू—! आम्हीच तुम्हाला बोटी भरभरून 'झाडपाला व्हिटॅमिन' पाठवू. हरित क्रांती केव्हा व्हायची तेव्हा होईलच, परतु तूर्त सर्व भारतीयांनी 'झाडे लावा' ही मोहीम हाती घेणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या दारासमोर जास्तीत जास्त झाडे लावावी. फक्त घरासमोर रस्ता नाहीना हे पहावे हो! नाहीतर रस्त्यातील देवळे आणि मशिदी हलवण्याच्या उद्योगांप्रमाणे, रस्त्यातील झाडे उपटण्याचे काम सरकारला करावे लागेल. जर झाडे लावली नाहीत तर 'झाडपाला-प्रकल्प' उभा झाला, तरी आपल्याला 'झाडे आणि पाला'च आयात करावा लागायचा!

झाडपाल्यावर जो रासायनिक क्रिया करणारी द्रव्ये आहेत, ती जर माणसाच्या शरीरात टोचण्याची सोय करता आली, तर सर्व भारतीयांच्या गरीब बकऱ्या-मेंढया व्हायला वेळ लागायचा नाही. गांधीजींची शेळी मग खरी प्रातिनिधिक शेळी होईल!

अयोध्येत राज्य करून गेलेल्या प्रभु रामचंद्रावर दाक्षिणात्यांचा फार राग आहे. दक्षिणेतील रावणाची नवझलाईट चळवळ, रामाने मोडून काढल्यामुळे तिथे शेतकरी-कामकरी मंडळीचा उद्धार होऊ शकला नाही असे नवे संशोधन झालेले आहे. असे असले तरी दक्षिणेत निर्माण झालेल्या या प्रो. रामचंद्रप्रभूंचे उत्तर भारतातही प्रचंड स्वागत होईल. कारण एकदा का पुरुष मंडळी झाडपाला खाऊ लागली की बायकांना स्वैपाकाची फारशी कटकट उरणार नाही. मंडई-बिंडई कसली करता! भूक लागली की चढला झाडावर! सकाळी फिरायला गेलेला पेन्शनर दुसऱ्याच्या कंपाऊंडमधली फुले वेचणार नाही — तो फुले खाऊन भरल्या पोटाने घरी येईल. तरुण सौभाग्यवती स्त्रियांना उद्योग फारसा उरणार नाही. सकाळी केशरचना, नतर झाडपाला खाऊन झोप येईपर्यंत 'जाऊबाई', 'वत्स' वगैरे स्त्रियांना वाहिलेली मासिके वाचणे. झोपेनतर कपच्या फुलाचे वर्ग — कारण तोपर्यंत डोक्यात घालण्य करता फक्त हीच फुले मिळू लागलेली असतील. झेंडूच्या फुलांची भाजी, मोगऱ्याची भाजी, गुलाबाची भाजी, मोतियाची कोशिबीर होऊ

लागली की फुलांच्या वेण्या मिळणार कशा ? तेव्हा दुपारी क्रेपच्या फुलांचे वर्ग आणि संध्याकाळी केशरचना स्पर्धा, नवे पदार्थ प्रदर्शन. वगैरे.

पुढल्या मर्ढेकरांना, खुरट्या बुंध्यावर चढून पाला खाणाऱ्या चुकार बकरीचे मूळीच अप्रूप रहाणार नाही त्यांच्या तोंडून सहजोद्गार निघतील—

मी एक शेळी, ही एक शेळी
तो एक मेंढा, तू एक मेंढी
ही एक बकरी, ती एक बकरी
पाच पांढऱ्या पाच केशरी
सहस्र जमल्या लक्ष कोटिही
अब्ज अब्ज अन् निखर्व शेळ्या
अनंत अगणित साऱ्या जमल्या
किती गाईंच्या किती लफग्या !
व्रतस्थ बसती पाला चावित
कुणी कुणी देती 'ढुसण्या' इतरां
जन्म कठती, आळवित कुणि अन्
सम्राज्ञीला प्रसन्न चतुरा !
या शेळ्यातील एकेकीला
बनेल खाऊनि राजा कोण ?
भारतवर्षा कोटिकोटिचे
वर्षोवर्षी देईल 'लोन ?'

—ग्यानबा

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

# माणूस म्हणजे यंत्र आहे का ?

ज. शा. देशपांडे

हल्ली बरेच पाश्चिमात्य यंत्रज्ञ मनुष्य म्हणजे जवळजवळ यंत्र आहे असा सिद्धांत मांडू पाहात आहेत. मनुष्य हा संपूर्णपणे यत्र आहे असे मात्र त्यांना अजून म्हणता येत नाही. हा सिद्धांत फार महत्त्वाचा आहे व त्याची या लेखात चर्चा केली आहे.

## पेशींचे अद्भुत कार्य

माणसाच्या शरीराबद्दल दिवसेदिवस खूप शास्त्रीय ज्ञान उपलब्ध होत आहे. जीवशास्त्रात नेत्रदीपक शोध लागत आहेत, परंतु जीवशास्त्र हे पैसा देणारे शास्त्र नसल्याने ते लोकांच्या नजरेसमोर ठळकपणे येत नाही. माणसाचे शरीर हा प्रचंड कारखाना असून रसायनशास्त्राच्या किमयेवर तो चालतो हे आता स्पष्ट दिसते. माणसाचे शरीर पेशीपासून बनते व पेशीत न्युक्लिक अ‍ॅसिडचे प्रचंड रेणु (Molecules) सर्व कारभार चालवतात. त्यांच्या मूळ रचनेतच पुढे प्राणी कसा होणार याचे जणु आज्ञापत्रक लिहून ठेवले असते. हे रेणु सगळ्या गोष्टींचे शिल्पी असतात. रोग निर्माण करणाऱ्या Viruses न्युक्लिक अ‍ॅसिडचे रेणु असतात असे आढळून आले आहे. प्रत्येक पेशी एक मोठा कारखाना असतो व तीत हजारो रासायनिक क्रिया एका वेळी चालतात हा चमत्कार आहे. आरंभी एका पेशीपासून दुसरी तशीच पेशी होते पण पुढे पुढे अन्य रसायनादी गोष्टींचा परिणाम होऊन निराळ्या पेशी होतात. पेशीत एक अगदी आपल्या वर्कशॉपसारखा एक भाग असतो. त्याचा विशेष म्हणजे तो आकार कमीजास्त करू शकतो. पेशीत Enzymes

सारखी द्रव्ये होतात व निरनिराळ्या रासायनिक क्रिया होऊ लागतात. गर्भाच्या सुरुवातीला शेपटीच्या भागाकडल्या पेशी डोक्यात घातल्या तर डोक्यातल्या पेशी होतात, पण पुढेपुढे तसे होत नाही. कारण निरनिराळ्या भागातल्या पेशीचे विशेषीकरण होत जाते, व निरनिराळे अवयव होऊन निरनिराळे प्राणी होतात.

## मज्जातंतूंच्या पेशी व बुद्धिमत्ता

शरीरात दुसरी महत्त्वाची गोष्ट मज्जातंतूच्या पेशी. त्याना 'न्यूरॉन्स' म्हणतात. त्या लक्षावधी असतात. त्यांना तारेसारखा जोडभाग असतो. हे संदेशवाहक कामे करतात व त्यांचे जाळे असते. मज्जातंतूचे संदेशवाहनाचे काम विद्युत्शक्तीच्या लहरींनी होते व शरीरात आपल्या यंत्रांच्या तारांच्या रेखाकृती (Wiring diagram) सारख्या आकृतीचे त्याचे जाळे असते. या व्यवस्थेमुळे तात्कालिक क्रिया आपोआप होतात. त्याना प्रतिक्षेप क्रिया (reflex actions) म्हणतात. आपण पुष्कळ वेळा ज्याला बुद्धिमत्ता समजतो ती केवळ प्रतिक्षेप क्रिया असते असे आढळून येते. गांडुळाला डोक्यात उजेडाला संवेदनशील असे संग्राहक (Recepter) मज्जातंतू असतात. त्यामुळे तो बिळात पळून जाऊन शत्रूपासून बचाव पावतो. पण हे यांत्रिक रीत्या घडते व एकाच वेळी दोन बाजूने प्रकाशाचे झोत सोडले तर त्याचा गोंधळ होतो. एक पक्षी अंड्यातून धडपड करून वर येतो व नंतर दुसरी हालचाल करून छायेत जातो; पण त्याला परत अंड्याच्या पसाऱ्यात घातले की त्याला काही करता येत नाही. यावरून हे दिसते की या क्रिया बुद्धिमत्तेवर आधारित नसून त्या मज्जातंतूच्या आकृतीच्या विरचनेतच रचलेल्या (built in) आहेत. काही क्रिया अशा रचनेत अंतर्भूत नसतात व त्या शिकता येतात. माणसाच्या शरीरात प्रत्यही हजारो संदेशाची ये जा चालू असते व त्यावर त्याचे सर्व वैशिष्ट्य अवलंबून असते.

## गणक यंत्रे

आता गणकयंत्रे (Computers) पुढे येत आहेत. त्याच्यात मुख्य गोष्ट परिचालन क्रिया (Switching operations) आहेत. गणकयंत्रे व माणसाचा मेंदू यात फार साम्य आहे. गणकयंत्रे भाषांतरे करतात, प्रश्न सोडवतात व खेळही खेळतात. I B M च्या एका यंत्रज्ञाने चेकर्सचा डाव खेळणारे यंत्र केले. ते प्रथम मठ्ठ होते पण शिकून शेवटी त्याने एका नावाजलेल्या विजेत्याला हरवले. रशियात बुद्धिबळे खेळणारे यंत्र केले गेले. तेथील दुसऱ्या एका यंत्राला प्रश्न विचारण्याचे ठरवले. लोक प्रश्न विचारण्यास सुरुवात करणार इतक्यात यंत्राचा दिवा लागला व त्यातूनच प्रश्न आला "माणसाला विचार करता येतो का ?" प्रश्न किती मार्मिक आहे ? गणकयंत्राच्या मानाने मेंदू हे यंत्र फारच गुतागुंतीचे आहे.

## मेंदूचे यांत्रिक स्वरूप

कॅलिफोर्नियामधील एका शास्त्रज्ञाला असे आढळले की जुना मेंदू ज्या भागाला म्हणतात त्यात न्यूरॉन्सचे एकाद्या स्विचसारखं जाळे असते व तिथून तारांचे जाळे इकडेतिकडे जाते. सर्व संदेशांची जा ये या स्विचमधून होते. ती बंद झाली तर जागृती बंद होते. cerebral cortex या मेंदूच्या भागाला विजेचा स्पर्श केला तर तो विशिष्ट भाग ज्या चामडीशी संबंधित आहे तिला स्पर्श केला असे वाटते. अशीच ऐकण्याची, पहाण्याची, भुकेची मेंदूत केंद्रे आहेत. त्यावर विजेचे प्रयोग करून त्या संवेदना कमीजास्त करता येतात. पोटात अपचन पण मेंदूमुळे भूक व पोटात भूक पण अन्न खाववत नाही असे प्रयोग करता येतात. सुख-दुःखाचीही केंद्रे आहेत व त्यानी भावना कमीजास्त होतात. वानराच्या जुन्या मेंदूच्या विशिष्ट भागाला विद्युत्स्पर्श केला की तो चिडतो. एका रोग्याच्या मेंदूला विद्युत्स्पर्श केल्याबरोबर त्याला लहानपणचे सर्व आठवून तो प्रत्यक्ष मनाने त्यात वावरू लागला व त्याच वेळी तो पूर्ण जागृतही होता. यावरून मेंदूत टेपरेकॉर्डरप्रमाणे आठवणी साठवण्याची काहीतरी योजना असावी असे वाटते.

## व्यक्तिमत्त्व व यांत्रिक स्वरूप

एका अमेरिकन शास्त्रज्ञाने मनोरंजक प्रयोग केला. मेंदूचे डावा व उजवा असे साधारण सारखे भाग असतात. व त्यांचे एकमेकांशी संबंध असतात. माकड एरवी सापाला फार भिते. माकडावर एक मेंदूची विशिष्ट शस्त्रक्रिया केली तर ते शांत होते व सापाला भीत नाही. या शास्त्रज्ञाने माकडाच्या उजव्या बाजूच्या डोळ्याच्या मज्जातंतू (optic nerve) चा संबंध फक्त उजव्या भागाशी व डावीचा डाव्या भागाशी असे केले व मग मेंदूच्या एका भागावर ही विशिष्ट शस्त्रक्रिया केली. नंतर ज्या भागावर शस्त्रक्रिया केली त्या डोळ्यासमोर साप आणला व दुसरा डोळा बंद ठेवला. तेव्हा माकड शांत राहिले. तोच प्रयोग दुसऱ्या भागावर केला तेव्हा माकड घाबरले. दोन व्यक्तिमत्त्वे माकडात आली का? या शास्त्रज्ञाचे असे म्हणणे आहे की प्रत्येक माणसाच्या मेंदूत दोन जागृतिकेंद्रे असतात. यामुळे फार गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होणार. समजा उद्या अ चा अर्धा मेंदू व ब चा अर्धा मेंदू याची अदलाबदल शक्य झाली तर काय होईल? दोन व्यक्तिमत्त्वे एका मेंदूत राहतील का?

व्यक्तिमत्त्व म्हणजे तरी काय आहे? आपले शरीर हे अगदी यंत्र आहे. त्याच्या पेशी नेहमी बदलत असतात. तरीपण 'मी' तोच आहे असे वाटते. माणूस मरतो तेव्हा तो कुठे जातो असा आपण प्रश्न करतो. ज्योत विझते तेव्हा ती कुठे जाते? हा प्रश्न निरर्थक आहे कारण ज्योत ही विशिष्ट परिस्थितीत उद्भूत होणारी घटना आहे. ती परिस्थिती गेल्यावर घटनाही संपते. तसेच जागृतीचे आहे. विशिष्ट परिस्थितीत ती निदर्शनास येते. ती दृश्यमान होण्यास द्रव्याचा (matter) आधार

लागतो. व्यक्तिमत्त्वाबद्दल बोलायचे तर उद्या जर अच्या मेंदूतली मज्जातंतूंची विरचना व सारखी करता येईल तर व्यक्तिमत्त्वेही बदलता येतील. 'व्यक्तिमत्त्व' 'मी' या गोष्टी विजेच्या स्विचसारख्या आहेत. जन्म, मृत्यू असे निराळे काही नाही. तसेच पाहिले तर दर क्षणाला जन्म मृत्यू होत असतो.

माणसाचे यांत्रिक स्वरूप लक्षात घेतले तर आपल्याला पुष्कळ कल्पना बदलाव्या लागतील. गुन्हेगार गुन्हे का करतो हे लक्षात घेतले म्हणजे शिक्षेचे स्वरूप बदलावे लागेल. पाप, पुण्य व नीती याकडे निराळ्या दृष्टीने पाहावे लागेल व अनेक पूर्वग्रह टाकून द्यावे लागतील.

### माणूस म्हणजे सर्वस्वी यंत्र आहे का ?

माणसाचे शरीर यंत्र आहे या कल्पनेतून पाहिले तर इथपर्यंत ठीक आहे. पण प्रश्न असा आहे की माणूस म्हणजे फक्त शरीर का ? माणूस संपूर्णपणे केवळ यंत्र आहे. का ? पाश्चिमात्य यंत्रशही असे स्पष्ट सांगण्यास कचरतात. गणकयंत्रे व मेंदू यात साम्य आहे हे ठीक आहे. पण गणकयंत्राला मर्यादा असते. बुद्धिबळ खेळणाऱ्या गणकयंत्राला पेकर्स खेळता येणार नाही. माणूस वाटेल ते शिकू शकतो. माणसाच्या मेंदूसारखे गणकयंत्र करणे ही जवळजवळ दुरापास्त गोष्ट आहे. प्रयोगशाळेत आज नाही उद्या माणूस तयार होण्याची शक्यता फार आहे. तथापि हे तो निसर्गात ज्या रासायनिक प्रक्रियेतून होतो त्याच क्रियेतून होईल. गणकयंत्रासारखा माणूस व हाडामासाचा निसर्गातून होणारा माणूस यात एक मोठा फरक राहतो. माणसाला इच्छाशक्ती (Free will) असते व कुठल्याही परिस्थितीत काय करावे हे ठरवण्यास त्याला मार्ग मर्यादित नसतात. गणकयंत्रात सर्व गोष्टी मर्यादित असतात. माणसाच्या भावना काही प्रमाणात यांत्रिक असतात पण त्या सर्वस्वी यांत्रिक असतात का हा प्रश्नच आहे व यंत्रात मनुष्यासारख्या भावना

---


# मुजऱ्याचे मानकरी

ब. मो. पुरंदरे

तीन रुपये

राजहंस प्रकाशन


---

येथे ही गोष्ट शक्य वाटत नाही. माणसात यंत्रापेक्षा काहीतरी जास्त आहे ही गोष्ट उघड दिसते. पाश्चिमात्यांच्यात विशेषतः यंत्रज्ञांचा कल माणूस म्हणजे निव्वळ यंत्र आहे असे मानण्याकडे आहे. परंतु जे खरे शास्त्रज्ञ आहेत ते असे म्हणत नाहीत.

## आधुनिक काळातली दुःखान्तिका

माणूस केवळ यंत्र आहे असे म्हणणारे अधिभौतिकवादी व माणसात यंत्रापेक्षा काहीतरी मोठे वैशिष्ट्य आहे असे म्हणणारे अध्यात्मवादी यांच्यातला फरक शास्त्रीय प्रगतीमुळे सूक्ष्म झाला आहे ही गोष्ट लक्षात आणली पाहिजे. शास्त्राने नुसते शरीर हे एक यंत्र कसे आहे हे स्पष्ट दाखवले असून यंत्रवादीही 'मी' असे काही नाही, जन्ममृत्यू असे निराळे काही नाही असे म्हणण्यापर्यंत पोचले आहेत. तरीपण मीपणा माणसाला का सोडीत नाही याचा त्यांनी नीट विचार केलेला नाही व त्याचे उत्तर ते देऊ शकणार नाहीत. लक्षावधी वर्षांच्या प्रयोगानंतर सृष्टीने माणसाला सारासार विचारशक्ती देऊन त्याला सृष्टीतला परमोच्च घटक केला. परंतु विचारशक्ती हे दुधारी हत्यार ठरले. ते नीट वापरले तर ठीक, ते योग्य समजेने वापरण्याची शक्ती कमी होत चालली असून माणूस आपणच निर्माण केलेल्या यंत्रात गुरफटला जाऊन त्यांचा दास बनल्याने तो स्वतःच एक विचारशक्तिहीन यंत्र होऊ घातला आहे. त्याचा परिपाक यंत्राजवळ नसलेल्या स्वार्थाच्या उद्रेकात होत असून आधिक चैनीसाठी अधिक पैसा वाटेल त्या मार्गानी मिळवा हे आधुनिक समाजाचे सूत्र झालेले दिसते. त्यामुळे जीवन म्हणजे नुसती पैसा, अधिकार इत्यादि-साठी धावाधाव होऊन विचाराला वेळ नसतो व विशेषतः शहरात माणसाच्या हालचाली यंत्रासारख्या होतात. असा समाज दया व विध्वंसही यंत्रासारख्या करतो. आगगाड्या, मोटारी यांच्याखाली छिन्नभिन्न झालेली माणसे, रस्त्यावर भुकेने तडफडत पडलेले लोक असली दृश्ये हा समाज निर्विकार चित्ताने पाहू शकतो. मेंदूच्या जागी गणकयंत्र बसवलेला यांत्रिक माणूस असाच वागेल. खरे शास्त्रज्ञ - यंत्रज्ञ नव्हे—जडवाद सोडून देत असून सर्व सृष्टीत भरून राहिलेली चेतना माणसात विशेष स्वरूपात प्रगट होते हे मान्य करू लागले आहेत. इथे अध्यात्माशी गाठ येते व शास्त्राचा अपुरेपणा जाणवतो. ही गोष्ट आइनस्टीन, मॅक्स प्लँकसारख्या थोर शास्त्रज्ञांनी ओळखली होती. आपल्या प्राचीन विचारवंतांनी हजारो वर्षांपूर्वी या गोष्टी नुसत्या चिंतनाने जाणल्या होत्या. पण त्यांचे विचार अंधारात जाऊन आजची संस्कृती झपाट्याने यंत्रवादी व स्वार्थी होत आहे. त्याच्यात माणसाला सुख न मिळता दुःखच प्राप्त होणार व संस्कृती मात्र विनाशाकडे खेचली जाणार अशी जगभर भीती वाटू लागली आहे. शास्त्राच्या वेगवान प्रगतीने मानवी संस्कृती विकसित होण्याऐवजी ती उध्वस्त होऊ पाहात आहे हीच आधुनिक काळाची दुःखान्तिका आहे.

■ ■ ■

# एक पारदर्शक चेहरा

प्रभाकर पेंढारकर

स्मित मुद्रेने डॉ. राजेंद्रप्रसाद उभे आहेत.

त्यांच्यापासून थोड्याच अंतरावर सफेद पगडी आणि शुभ्र वेषात डॉ. राधाकृष्णन्.

त्यांच्या डाव्या बाजूस काळसर काचांचा जाड चष्मा लावून डॉ. झाकिर हुसेन !

आणि शेजारीच हसत उभे आहेत श्री. गिरी !

सर्वांचे चेहरे प्रसन्न आहेत, उत्फुल्ल आहेत, ओठांवर शब्द आहे "अभिनंदन !"

हसऱ्या, काहीशा संकोचलेल्या, विजयाचा प्रसन्न आनंद चेहऱ्यावरून ओसंडत असलेल्या आणि तरीही विनम्र सुलोचनाबाई ह्या सर्व राष्ट्रपतींच्यापुढे उभ्या आहेत. किंचित पुढे झुकून कृतज्ञतेनं पारितोषिक स्वीकारत आहेत–उत्कृष्ट चित्रातल्या अभिनयाचं !

चार राष्ट्रपती.

पंचवीस वर्षे.

दोनशे चित्रे.

आणि तरीही पाहिले पारितोषिक स्वीकारताना चेहऱ्यावर असलेली शालीनता टिकून आहे. तोच नम्र प्रसन्न भाव, तीच सोज्वळ मुद्रा !

राष्ट्रानं त्यांच्या कलागुणांचा केलेला हा सन्मान'

त्याची ही चार क्षणचित्रे ?

बैठकीच्या खोलीत भिंतीवर लावलेली.

गिरी देत असलेलं पारितोषिक 'एकटी'बद्दलचं !

हे चित्र मीनाकुमारीनं पाहिलं "ही भूमिका मला अशीच करता आली तर मी स्वत:ला धन्य समजेन !" हे तिचे उद्गार ! ह्या मागं 'वहिनीच्या बांगड्या'चा अनुभव होता. मराठीतील ही वहिनी, हिंदीत आपल्याला भाभीच्या रूपानं तशीच उभी करता आली नाही हे तिनं खिलाडू वृत्तीनं कबूल केलं होतं.

ह्या फोटोच्या खाली 'सरस्वती चंद्रा'च्या सुवर्ण महोत्सवाची भेट आहे–स्त्रीचा एक पूर्णाकृती पुतळा !



त्याजवळच ‘ मेहरबान, ’ त्यापलीकडे, ‘ प्रपंच ’, गोराकुंभार, ’ ‘ मोलकरण ’ ‘ साधी माणसं ’ ..

कांचन सांगते आहे, ‘ ते ना मागच्या खेपो तुम्ही पाहिलंत ते. ते ‘ आये दिन बहारके ’बद्दलचं ! आता आत कपाटांत ठेवलंय्. फार गर्दी झालीय ना हॉलमध्ये ! ”

ह्या झगमगत्या भेटीमध्येच एक छोटासा सोनेरी करंडा आहे. हा एका वृद्ध स्त्रीनं एका सत्काराच्या वेळी स्वतःहून दिलेला !

ही छोटी छोटी प्रतीकं !

स्मृतिचिन्हे ! भेटी, पारितोषिके, चकाकते सन्मान !

रुपेरी आठवणी, सोनेरी गौरव, सुखावणारी कौतुके !
वेगवेगळया चित्रातल्या वेगवेगळया भूमिकाबद्दलची !
अभिनय कलेतील प्रावीण्याबद्दल मिळालेली !
जे आपण नाही ते चेहऱ्यावर दाखवायचे !

कुणाचा तरी मुलगा आपला म्हणायचा. त्याच्याकरिता जीव ओवाळून टाकायचा. याची पत्नी आपली सून म्हणून तिच कौतुक करायचं, तिचीही आई होण्याचा यत्न करायचा. तिनं लाथाडलं तरी स्वतःचा मान जपत प्रेमच देत रहायचं. कापरासारखं, उदबत्तीसारख एक दिवस संपून जायचं !

हे सर्व खोटं खोटं ! पण तेवढया वेळेपुरता प्रेक्षकांना विसर पडला पाहिजे. पडद्यावर सर्वच खोट खोट घडत आहे ह्याची जाणीव असताही त्याच्या बुद्धीला फसवून डोळयानी अश्रु ढाळले पाहिजेत.

अवघड आहे !

आजच्या जगात कुणाच्या डोळयातले खरे अश्रु पाहून पाहणाऱ्याच्या डोळयात अश्रु उभे राहत नाहीत कुणी भुकेने मरतो आहे, कुणी मुलासाठी तडफडतो आहे, कुणी कुणाच्या निरपेक्ष भावाने खस्ता खात आहे, ह्या घटनानी लोकाच्या पोटात तुटत नाही. पण पडद्यावर त्या पाहताना प्रेक्षकाच्या मनात कालवाकालव होते. 'बाई थकली. आता पुरं होऊन ते शिवायच मशीन आपण थांबवावं' असं वाटण्याइतपत माणसं अस्वस्थ करायची !

अवघड आहे !

बरच अवघड आहे !

तरीही अगदोच अशक्य नाही ! मदतीला लोक आहेत. संगीत दिग्दर्शक मागे सतारीचे करुण स्वर छेडतो आहे छायालेखकान प्रकाशयोजनेमुळं अर्धा 'मूड' आणलेला आहे. चुकल तर सागायला दिग्दर्शक आहे. गुदमरलेला हुंदकाही बरोबर रेकॉर्ड होईल हे रेकॉर्डीस्ट पाहतो आहे. आणि ह्या सर्वांच्या जोडीला समर्थ लेखणी पाठीशी आहे. प्रक्षकाच्या हृदयाला भिडतील असे वेचक शब्द लेखकानं आपल्या- साठी अगोदरच लिहून ठेवले आहेत तेव्हा तस हे फारसं अवघड नाही.

अवघड तेव्हा आहे जेव्हा ह्यातली कोणतीही सोय उपलब्ध नसते स्वत.चे सवाद कोणी लिहिलेले नाहीत. काही चुकलंच तर रिटेक्स घेता येण्याची शक्यता अजिबात नाही. ज बोलायच ते पाठ केल्याशिवाय तसंच उत्स्फूर्त बोलायचं आहे.

हे अवघड आहे. फार अवघड आहे.

वाटतं त्यापेक्षा बरंच कठीण आहे.

पडद्यावर शब्दाशब्दाला हास्याची कारंजी उडवणारा विनोदी नट रोजच्या जीवनात कित्येक वेळा, मोठा कटाळा आणणारा प्राणी असतो. रणागणावर समशेर गाजवणारा बेदरकार योद्धा प्रत्यक्षात लाकडी घोडयावर बसायला भीत असतो

आणि त्यागाचा व देशभक्तीचा आक्रोश पडद्यावर करणारा नायक पडद्यामागे लाखो रुपयाचा ब्लॅकमनी घेऊनही गाडीच्या पेट्रोलच्या पैशासाठी अडून बसतो.

पडद्यावरची सोज्वळ, सात्त्विक भूमिका जीवनातही तेवढ्या खऱ्या अर्थाने वठवणे खरंच अवघड आहे.

ती अवघड अशासाठी की त्याकरिता खरेखुरे अंतःकरण लागते. विलक्षण संवेदनाक्षम, तरळ, दुसऱ्याच्या दुःखाच्या स्पंदनाने कंप पावणारे–

तस नसेल तर काही वेळ प्रेक्षकांना अभिनयाने भुलवता येईल. सौंदर्याने खिळवता येईल. आणखीन काही क्षण बुद्धिचातुर्याने गुंगवता येईल. पण ते तेवढेच ! ती त्याची फसवणूक ! स्वतःचीही ! ह्या आटयापाटयाचा अथवा लंपडवाचा त्यालाही कटाळा येईल. आणि आपल्याही !

मग उरेल ते रितेपण ! एकाकीपण ! खरोखरच एकटीचं आयुष्य ! पैसा, नाव, सम्पत्ती, सरकारी गौरव, अमाप लोकप्रियता मिळूनही कलावंत असा एकाकी राहू शकतो.

स्वतःतच. गुरफटलेला ! स्वतःच्या यशाची धुंदी चढलेला आणि त्यामुळं झपाट्यानं खाली घसरू लागलेला !

आपलं रूप प्रेक्षकांच्या नजरेत तसच टिकावं म्हणून प्रेक्षकांपासून लांब पळणारा !

मुखवटे लावून जगणारा !

सुलोचनाबाईंकडे असे मुखवटे नाहीत. गेली पंचवीस वर्षे मी त्यांना पहातो आहे. मला तरी ते दिसलेले नाहीत.

त्यांना 'मेकअप'ची गरजच नाही. जे आहे ते 'पारदर्शक' आहे. खरंखुरं आहे. जिवंत आहे.

साधाच प्रसग. अनेक वर्षांपूर्वीचा. सुलोचनाबाईंनी माझ्या हातात एक पेन दिलं – सहसा न आवळणाऱ्या भगव्या रंगाचं !

'कस आहे ?'

'सुंदर !'

'आवडल ?'

'हो !'

'तुमच्यासाठी मी आणलं. मद्रासला मी एकाकडं पाहिलं. मला रंग आवडला. तुम्हाला आवडेल असं वाटलं. मी बाजारात जाऊन पत्ता शोधून घेऊन आले !'

का ?

माझा वाढदिवस नव्हता ! मी कुठला फड जिंकला नव्हता. माझ्या चित्रास पारितोषिक जाहीर झालेले नव्हते.

–ही वृत्तीच ! दुसऱ्याचा आनंद पाहून आपण आनंदीत व्हायची !

स्त्रिया मत्सरी असतात. एक अभिनेत्री दुसऱ्या अभिनेत्रीबद्दल सहसा चांगलं बोलणं कठीण! आणि बोललीच तर त्यामागं काही हातचं राखून ठेवलेलं असायचं.

'तुम्ही माझ्या घरी याल, पहाला! सहजच!

मला तुमचं काम आवडलं म्हणून सांगायला आत आले!'

असं जेव्हा सुलोचनाबाई रसनाला 'भाव तोचि देव' ह्या नाटकातलं काम पाहून सांगतात तेव्हा त्या आपण स्त्री आहोत हे विसरलेल्या असतात. आणि हे नुसतं तोडदेखल सांगून त्यांचं समाधान होत नाही, त्या रसनाला आपल्या घरी नेतात, खाऊ घालतात. तिचं कौतुक करतात. म्हणतात, 'तुझं काम पाहून मला काही नवीन शिकायला मिळालं!'

ती बिचारी संकोचानं चूर होऊन जाते.

सुलोचनाबाईंना कृतार्थ वाटलेलं असतं!

ह्याच कारणानं मधु आपटेंचा वाढदिवस सुलोचनाबाईंच्या घरी मंग्याच्या थाटानं साजरा होतो. मराठी चित्रपटसृष्टीतल्या कलावंत, तंत्रज्ञांच हे घर सावली झालं आहे. एखाद्या मंगल-कार्यालयापेक्षाही हे घर वाढदिवस, साखरपुडे, लग्न-समारंभ, ह्यांनी गजबजलेलं असतं. स्वत: सुलोचनाबाई आग्रह करून वाढत असतात. गृहिणीच्या अगत्यानं आल्यागेल्याची चौकशी करत असतात.

ह्याला तर्कशास्त्रात दुसरं उत्तर नाही. ही वृत्तीच!

दुसऱ्याचं सुख पाहून स्वत: आनंदून जाण्याची! खराखुरा कलावंत तो की जो दुसऱ्याचे गुण पाहून रसिकतेत स्वत:लाच हरवून जातो.

ह्या धीरगंभीर प्रसन्न व्यक्तिमत्त्वाला एक सुरेख झालर आहे. आजवर ती नेहमीच कॅमेऱ्याच्या फ्रेमबाहेर राहिली आहे. बाई कमालीच्या मिस्कील आहेत. केवळ वरवर परिचय असणाऱ्याच्या लक्षातही येणार नाही इतकं खोचक, विनोदी, तरीही दुसऱ्याला न दुखवणारं, त्या चेहऱ्यावरचा सोज्वळ भाव कायम ठेवून जाता जाता बोलून जातात.

सहजच आठवलं. मीठ-भाकरचं शूटिंग चाललं होतं. चंद्रकांत, अंजनी, सरोज-माझी बहिण आणि मी – आम्ही हातावर कोरभर भाकरी घेऊन खात आहोत. वाढत आहेत सुलोचनाबाई. शुटींग खूप लांबलं. रात्रीचे दहा वाजून गेले. खूप भूक लागलेली. पण बाबांच्या समोर कोण बोलणार? भाकर हातात, पण तोंडापर्यंत पोहोचू शकत नव्हतो. प्रत्येक खेपी ट्रायलकरिता सुलोचनाबाई भाकरी आमच्या हाती द्यायच्या, आम्ही घास तोंडापर्यंत न्यायचा; आणि तसाच खाली आणायचा. खरोखरच आम्ही केविलवाणे दिसत असणार.

शॉट सुरू होणार इतक्यात लाईटस् गेले. स्टुडिओत अंधार झाला. त्या अंधारात सुलोचनाबाईंनी भाकरी आमच्या हाती दिली आणि हलकेच त्या म्हणाल्या,

'खाऊन टाका !' अंधार असूनही घास भुकेमुळे बरोबर तोंडातच गेले. दिवे आले तेव्हा टोपलीतली सगळी भाकरी संपली होती. रिकामी टोपली सुलोचनाबाईंचे हाती होती. त्याकडे पहात सुलोचनाबाई आश्चर्याने म्हणाल्या, 'अगबाई, ह्यातली भाकरी काय झाली?' बाबा समजले. हसले! परत भाकऱ्या करून आणल्या, शूटींग सुरू झाले.

माणसाचं शिक्षण कितीही-कमी असलं तरी पैशाचं गणित त्याला फार लवकर समजत. विशेषत: चारही बाजूंनी आपणहून पैसा येऊ लागतो तेव्हा तर स्वत:ची वाढत जाणारी किंमत त्याच्या फार लवकर लक्षात येते. अशी मंडळी फार लवकर ह्या दरिद्री मराठी चित्रपटसृष्टीपासून दूर झालेली आहेत.

हिंदीमध्ये चित्रपटांना तारखा द्यायला वेळ नाही तरीही सुलोचनाबाई मराठी चित्रात काम करतात. हिंदीमध्ये एका दिवसाच्या कामाचे त्यांना मराठीच्या साऱ्या चित्राएवढे पैसे मिळत असताही त्या अद्याप मराठीला दुरावलेल्या नाहीत.

हे आपल्या 'मातीचं' न परवडणारं प्रेम त्यांच्यात कोठून आलं? त्याचं कारण–हे अकृत्रिम, प्रामाणिक आणि सहृदय अंत:करणच!

अशा अंत:करणाला मिळणारा अमाप पैसा हे कुपथ्य आहे. फार लवकर गंज चढतो त्यावर! हिंदीच्या ऐश्वर्याने हृदय बहुतेक वेळा 'हलकं' बनतं. पण इथे ते शाबूत आहे. नुसतं शाबूत नाही तर सुपाएवढं आहे. रोजी वाढतच आहे.

थांबतो! ह्या न संपणारा विषय आहे. गेल्या पंचवीस वर्षांत सुलोचनाबाईंच्या स्वभावाचे विविध अविष्कार ह्या एवढ्या पानात उतरवता येणार नाहीत. ती इच्छाही नाही.

टबलवर एक आमंत्रणपत्रिका आहे.

"सुप्रसिद्ध अभिनेत्री सुलोचना

ह्यांच्या श्री. वसंत भालकर ह्यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथाचा प्रकाशन समारंभ पाच एप्रिल रोजी आहे.

सुप्रसिद्ध अभिनेत्री सुलोचना ह्यांच्या अभिनयगुणाबद्दल पाच तारखेला संध्याकाळी बोलले जाईल. त्यांच्या विविध भूमिकाबद्दल त्यांना सन्मानले जाईल.

ह्या सुप्रसिद्ध अभिनेत्री सुलोचनाबाईंना लोक ओळखतातच. त्यांच्याबद्दल लोकांना आणखीन काही माहिती होईल. गेली पंचवीस वर्षे अक्षय वाढत असलेली त्यांची कीर्त अशीच आणखीन वाढतच रहाणार आहे.

- ती वाढो!

मला मात्र वाटतं, त्या अभिनयगुणाहून कितीतरी पटींनी श्रेष्ठ असलेल्या आमच्या दिदींच्या, अक्कांच्या पडद्यापलीकडील वैयक्तिक जीवनाचाही एक दिवस असाच मोठा गौरव व्हावा.

□ □ □

माझं नाव पंडित बाळूभाई खासबागकर. पण मला लोक गेली चाळीस वर्षे बाळूभाई याच नावाने ओळखतात. उस्ताद कल्लूखाँ यांचेकडे मी तबला शिकलो. आज या पंचक्रोशीत मला फार मोठा बजवय्या म्हणून ओळखतात. शरीर थकत चाललंय पण मनाची रग अजून कमी झाली नाही महाराजा. हाँ, मणिपूर दरबारचा मी मानकरी. कित्येक गायकांची साथ केलीय आम्ही. गेले ते दिवस महाराजा! काय तो थाट, अन् काय दरबार! आता नुसतं चघळीत बसायचं त्या आठवणी. संस्थानं खालसा झाली आणि आम्ही खलास झालो. दुःख होतंय ते आर्थिक स्थितीचं नव्हे तर त्या मैफिली संपल्याचं!

कलंदरपणात आयुष्य गेलं म्हणून आनंद वाटतो, दुःखही होतं. पण अजून समाधान एवढंच की या वयात हात काम करताताहेत आणि जिद्द टिकून आहे. नाहीतर या मंदिरात कशाला आलो असतो कडमडायला? महाराजा, या आमच्या कलंदर वृत्तीमुळंच आमचं आणि आमच्या चिरंजीवांचं कधीच जुळलं नाही. बेटा इंजिनियर झाला आहे ना? त्याला वाटतं आपल्या बापानं असला कनिष्ठ व्यव-



साय का करावा ? रोज आयुष्यातील ३।४ तास व्यर्थ का दवडावेत ? त्यातून आर्थिक लाभ काही आहे का ? छे ! सुखानं दिवस व्यतीत करावेत. हवे तर नातवंडाना धा धिं धिं धा चे बोल ऐकवावेत, शिकवावेत. असे त्याचे विचार. काय चुकलं म्हणा त्याचं ? पण नाही. त्याची आणि आमची कधी एकवाक्यता झालीच नाही, होणारही नाही. अहो कशी होणार ? तो साहेब आणि मी वजवय्या ना ? त्याला काय माहित तो करुण रसात भिजलेला जोगिया, धीरगंभीर अहीर भैरव ? त्याला एकच माहित, दगड, वाळू, सिमेंट आणि पैसा ! आणि म्हणूनच आम्हा पितापुत्रांच्या तारा जुळत नाहीत. बरं आहे म्हणा एका अर्थानं ते. आमचा कलंदरपणाच आम्हाला आनंद देतोय. त्याचं त्याला काय ? परवाचंच पहाना ! गेली चाळीस वर्षे साथ करतोय. पण कधी हात थंड पडला नाही. पण त्या दिवशी काय घडलं हे मला अद्याप कोडं उलगडत नाही. रोज नियमानं ५।। च्या घंटेला पुजारी काकड आरती म्हणू लागले की आमची साथ सुरू व्हायची ती ८।।/९ पर्यंत चालायची. भैरवी संपायला आणि ९ वाजता होणारी नारोशंकराची घंटा घणघणून अंबाईची आरतीची

# तोडी

दत्तात्रय जोशी

वेळ झाली म्हणून याद यायला गाठ पडायची. संस्थानं विलीन झाल्यापासून जवळजवळ १५ वर्ष यात खंड पडल्याचं आठवत नाही. सम चुकली असं घडलंच नाही पण...

पण त्या दिवशी तसं घडलं हे खरं.

आमची सम चुकली !

आम्हाला त्याचं दुःख नाही, दुःख आहे ते निराळ्याच गोष्टीचं. दुःख आहे ते शापाचं ! कुणी दिलाय तो शाप ! कुणाला ठावे ? पण तो खरा ठरतोय हेच दुःख आहे. नाहीपेक्षा असं घडतंच का ? आम्हाला खंत आहे त्या शापाची ! इतर वेळी सम चुकली असती तर आम्ही आत्महत्या केली असती. बाळूभाई सम चुकणार नाहीत. तालाला पक्के हे साऱ्या भारतभर प्रसिद्ध आणि असं असताना, महाराजा,

आम्ही सम चुकलो म्हणून नाक घासायला तयार आहोत. छे छे! तो प्रसंग अजून डोळ्यासमोर उभा राहतोय...

हेच अंबाईचे मंदिर, मी जिथं ४० वर्षे तबल्याची साथ करतोय. तोच धी, तेच गाणे सरावलेले कान. मंदिरात नियमित येणाऱ्या व्यक्तीही त्याच. तोच सभा-मंडप. येणाऱ्या जाणाऱ्या भाविकांची तीच वर्दळ. पण यात एकच बदल झालाय आज! बुवांच्या शेजारी मात्र कुणीतरी नवखा दिसतोय. तरतरीत डोळे, सतेज कांती, लांबसर नाक आणि मागे टाकलेले काळेभोर केस, वाढलेली पण चेहऱ्याचं सौंदर्य वाढवणारी दाढी. नाकाच्या थोडे वर कपाळावर अष्टगंध. अत्यंत सैल अंग-रखा. अंगरखा कसला लखनवी कमीज हवेतर म्हणा. पांढरं शुभ्र पायघोळ धोतर. आणि डोळे मिटून स्वस्थ पहाटेच्या वेळी आसमंतात स्रवणारं जीवनपुरीचं स्वर-माधुर्य चाखणारा तो नवखा युवक. युवा म्हणावे तर तसं दिसत नव्हतं. गृहस्थ म्हणावे तर तसा भास होत नव्हता. ३०/३२ च्या दरम्यान वय असावं त्याचं पण त्या अगदी नवख्या माणसाला तू कोण असा प्रश्न करावासा वाटेना. परिचित या नवागताकडं काहीशा उत्सुकतेनं पहात. त्याला त्याची दादही नव्हती. आपल्याच तंद्रीत तो स्वस्थ होता. त्याच स्वस्थपण मला अस्वस्थ करीत होतं.

आमच्या बुवांनी तानपुरा जुळवून षड्ज लावला मात्र आणि त्या नवागतानं अंबाईला नमस्कार केल्याच मला चांगलं आठवतय. तानपुऱ्याची जवारीही आज छान लागली होती. तबला जुळवायला मला कधी प्रयास पडतच नसत. बुवांची पट्टी ठरलेली असायची. ते यायच्या आत आम्ही जवळजवळ तबला लावून ठेवलेला असायचा. उगीच बुवाना काही वाटायला नको म्हणून थोडीफार ठाकठूक करीत असे. बुवांनी कधी तक्रार केलीय हेसुद्धा मला आठवत नाही. जवळजवळ यांत्रिकपणे आम्ही गेली १० वर्षे काम करीत आहोत. रोज नियमानं तोच राग गायचा नाही हा एवढा संकेत. आज अहिर भैरव, तर उद्या आसावरी, परवा जोगिया तर कधी देसकार साधारणत: हे अस चाले अन् त्यामुळे कधी काही खटकलंय असं व्हायचं नाहीच. हातानं बोल घुमवीत असतानाच डोळ्याना परिचितांचे नमस्कार स्वीकार-ण्याचा, त्यांना हेरण्याचा चाळा लागून राहिलाय. अन् जेव्हा एखादा अपरिचित दिसे तेव्हा डोळे मिलमिले करून त्या अपरिचिताचा काही शोध लागतो का हे पाहण्याचं काम सुरू होई. हात यांत्रिकपणे बोल वाजवीत असत. कधी काळी पत्ता नाही लागला तर खंतही नसे आणि समजा दिर्घकाळानंतर अपरिचित परिचित झाला तरी हर्ष नसे आणि यामुळं काय व्हायच माहित आहे? परिचित आले नाहीत की चुकल्यासारखं व्हायच, हो, क्षणभरच हं! आणि अपरिचित दिसला की डोळे बारीक व्हायचे. एवढाच बदल. हात बोल वाजवायच काम करताहेतच. ते चालूच असायचं आणि म्हणून त्या दिवशी बुवाशेजारी बसलेल्या त्या नवगताला पाहताच हृदयातला कुठलातरी एक ठोका चुकलाच. स्मरणशक्तीला ताण देऊन पाहिला पण

काही आठवेना. बुवांनी अंतरा संपल्यानंतर त्यांना खुणेनेच विचारले 'कोण ?' त्या नवागताकडे पहात केलेला हा नेत्रप्रश्न बुवांनी डोळ्यांनी ऐकला आणि माझ्याच भाषेत 'माहित नाही' असं उत्तर दिलं. झाल. आम्ही अधिकच बुचकळ्यात पडलो. साधारणत: एक राग संपल्यानतर अंबाईची गीतं रागदारीत म्हणण्याचा प्रघात दरबारात असल्यापासून पडलेला. त्यामुळ, मध्ये मिळणाऱ्या एकदोन क्षणामध्ये अथवा जवारी पुन: लावण्यात किवा तबला चढवण्यात, उतरवण्यात आम्ही प्रत्यक्ष कधी बोलल्याचं आठवत नाही. सारं कसं नेत्रांनी बोलायचं असं ठरलेलं. त्यामुळं व्हायचं काय, तर सेवा सपल्यानतरही आम्ही फारच थोडे बोलत असू. आणि म्हणूनच त्या नवागताबद्दल अधिक विचारता येईना आणि मन स्वस्थ बसू देईना. कधीही अस्वस्थ न होणारे आम्ही त्यादिवशी अस्वस्थ झालो आणि सम गमावून बसलो. बुवानी आपली सेवा संपवली आणि तानपुरा खाली ठेवला. आजपर्यंत सामान्यत: असं कधी घडलं नव्हतं. तानपुऱ्याची गवसणी तंबोरा उभा धरूनच घालण्याची बुवांची पद्धत माझ्या परिचयाची होती. बुवाही आज अस्वस्थ होते. कारण काय ते नेमके माहित नव्हते. ते अस्वस्थ अन् आम्हीही तसेच.

सेवा सपताच स्वस्थपणे १५–२० मिनिटे इकडल्या तिकडल्या गप्पा मारण्याचा आमचा प्रघात. त्यामुळे आम्ही तबल्याला उतरावयाच्या नादात होतो. एकदम तो नवागत म्हणाला.

"पंडतजी, इजाजत हो, तो एक अर्ज पेश करूं ?"


इतका वेळ डोळे मिटून स्वस्थ असणारा हा प्राणी मुका असावा असा जो माझा समज झाला होता तो एकदम बदलला. पंडितजी म्हणून त्यान आम्हाला संबोधिलं की बुवांना हा प्रश्न आम्हाला पडलाच. पण बुवा काय म्हणतात हे पाहून नंतर आपण उत्तर द्यावं म्हणून आम्ही स्वस्थ बसलो. बुवाही या एकदम अपरिचित असणाऱ्या माणसानं प्रश्न केल्याने आश्चर्यचकीत झाले होते.

"हा, हां, शौकसे" असं बुवांनी म्हणताच तो म्हणाला, "अगर इजाजत हो, तो माताजीकी कुछ सेवा करना चाहता हूं, आखिर आप बुजुर्ग है न ?"

बुवांना आश्चर्य वाटलं, त्याला नेमकं काय म्हणायच हे नीट समजलं नसताही. ते म्हणाले "क्यो नही, खुशीसे कीजीयेगा" त्या नवोदितानं अत्यत आदबीनं तानपुरा उचलला. गवसणी घातली नव्हतीच. बुवाना कुर्निसात केला आणि तारा पुन: जुळवल्या. तारा जुळवण्याची ती शैली पाहून मी स्तभीतच झालो. आजपर्यंत अबदुल करीमखाँ, अल्लादियाँ खाँ, बाळकृष्णबुवा, भास्करबुवा यांच्याबद्दल आख्यायिका ऐकल्या होत्या. आज काहीतरी अद्‌भुत पाहात होतो. खुट्याची पिरटणावळ नव्हती की काही नव्हते. एकदाच खुटी हलवली आणि तारा जुळवल्या असं घडलं. जवारी लावायलासुद्धा प्रयास नाहीत. आम्ही हे सारं अवाक् होऊन पहात होतो. जवारी जुळून त्यातून गंधार बाहेर पडल्यावर 'वाह' म्हणून बुवानी पसंतीची

पावती दिली मात्र आणि आम्ही भानावर आलो या अवलियाबरोबर साथ करण आवश्यक आहे याची जाणीव झाली आणि उतरविलेला तबला जुळवला. "काय ठीक आहे ना?" असा नेत्रसकेत करून बुवाना प्रश्न केला. त्यानाही ठीक म्हणून म्हणताच आम्ही उगीचच तबल्यावर हात टाकला. तबोऱ्याचा षड्जातून जवारीचा गजार निघत असताना डोळे मिटून नादब्रह्मात गुग असणारा हा अवलिया स्वप्न सृष्टीतून किंवा हव तर स्वरसृष्टीतून एकदम भानावर आला. इतकावेळ मिटलेले डोळे किंचित उघडून तेवढयाच नम्रतेने म्हणाला "उस्तादजी, हमे सम्हाल लीजियेगा! हम कल तो के बच्चे है।" आणि आम्ही मानेनेच होकार देताच बुवाना वदन करून आणि अबाईपुढ एकवार प्रदीर्घवेळ नतमस्तक राहून डोळे मिटून त्यान षड्ज लावला. तुपात भिजवलेल्या फुलवातीत जो स्निग्धपणा असतो अगदी तसाच स्निग्धपणा त्याच्या सुरात होता. नीरांजन तुपानं भरून फुलवात लागल्यानतर जसा आल्हाददायक सौम्य परतु नेत्रसुखकारक प्रकाश पसरतो अगदी तसच त्याचा गंधारयुक्त जवारीचा षड्ज आसमताव स्वरमाधुर्य पसरवीत होता. त्याचे डोळे त्यान उघडले होते ते केवळ विनवणी करण्यामाठीच. आताही तो गात होता डोळे मिटूनच या जगाची त्याला विस्मृती पडली होती. नादब्रह्म आणि त्याच स्वरविश्व यामध्ये तो वावरत होता. आम्ही मात्र काय घडतंय इकडं लक्ष देत होतो.

आमच्याशी गप्पा मारणारे परिचितही स्तब्ध झाले होते आज तेही या नवीन गायकाला पाहायला, ऐकायला थांबले. हळू हळू वातावरण भारू लागले. स्त्रवणारा स्वरगंगेचा ओघ लोकाना मोहित करू लागला. धीरगभीर आवाज. अतःकरणपूर्वक गायन आणि कुठतरी असणारी वेदना यामुळं एकदरीत या सिनेसगीताच्या युगातसुद्धा काही दोनचार कॉलेजकुमारांची टाळकी भारून गेल्याचं आम्हाला दिसलं. गायकापुढ गर्दी वाढू लागली. देवीच्या दर्शनाला येणारा क्षणभर का होईना तिथं थावू लागला. कुणी औत्सुक्यानं, कुणी कौतुकानं तर कुणी भारावून तिथ थावू लागला या नवागताला यातलं काही काही माहीत नव्हत. त्याचं भावविश्व निराळच होतं. त्याच स्वरविश्व निराळं होतं. तो, त्याचे स्वर, त्याची आर्त भावना एवढयाच गोष्टीचा त्याला पत्ता होता. त्याच्यापुढ नानाप्रकारच्या लोकांची गर्दी उभी आहे, त्यात एक अपत्यवत्सल गृहिणी आहे याच त्याला भान नव्हत. त्या समिश्र गर्दीतून हळू हळू ४।५ वर्षाच एक बालक पुढ येत असलेल आम्हाला दिसल. त्या बालकाचा हात धरून पुढ येणारी ती गृहिणी आम्हाला आठवतेय. क्षणभर ती भारावून गेलीय. तिचा बालकाचा धरलेला हात सुटल्याचं दिसतय. आवेगाने तिनं आपल्या मुलाला उचलून घेतल्याच आम्ही दोघानी—बुवांनी आणि आम्हा—पाहिलय. आता ती गृहिणी राहिली नाही. कडेवर अपत्यास घेऊन ती निश्चल उभी असणारी पुतळा झाली आहे. सभोवार काय घडतय याच तिला भान नाहोय.




## घडीघडीला जमते रंगत, कोका-कोलाची जरा संगत

फुरसतीचा वेळ गंमतीजंमतीचा वेळ! शिवाय कोका - कोलाची संगत...म्हणजे क्षणाक्षणाला एक नवीच रंगत! कोका-कोलाचा स्वाद असा रुचकर नि उत्साहदायक असतो की, पुन्हा पुन्हा कोका-कोलाच प्यावासा वाटतो. जगभर कुठेहि पहा, केव्हाहि पहा, कोका-कोला पिणाऱ्यांची संख्या वाढतेच आहे. वाहवा! कोका-कोला, अशी लज्जत एरवी कुठून मिळणार?

Enjoy Coca-Cola

कोका-कोला, हा कोका-कोला कंपनीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे.

CMCC-15-162 MR

एका हाताने अपत्याला सांभाळीत तिची दृष्टी कुठंतरी वर खिळलेली दिसतेय. चित्रात असणाऱ्या निर्जीव वृत्तीसारखी तिची अवस्था झालीय. अज्ञाताचा वेध घेत ती एकदा गायकाकडे तर एकदा आढ्याकडे पाहतेय. आणि अस्ताई सपून अतरा चालू होताच, तिच्या भावनांना तिला बांध घालता आला नाही असं दृश्य आम्ही पाहतोय. सथ गतीत असणारी अस्ताई सपून किंचित द्रुत लयीकडे झुकणारा अतरा शुरू होताच तिच्या डोळ्यांतून धारा झरताता आम्हाला दिसल्या. काही प्रेक्षकांना हा प्रकार नवीन होता. आम्हाला तो अद्भुत वाटला. आम्ही बुवांकडे अन् बुवा आमच्याकडे नेत्रपद्धतीने प्रश्न विचारताहेत. कोडं गुंतागुतीचं होतंय एवढंच समजतेय. आणि एक अनावर हुंदका गळ्याबाहेर पडताच आमची सम चुकली.

नवोदित गायकही चपापला.

लोकांना ही गृहिणी हुदका का देतेय हे समजेना. म्हणून ते आश्चर्यचकित.

आम्ही सम चुकली म्हणून अवाक्.

बुवांना हा कोण हे कोडे !

आम्हीच स्वत:ला सांभाळले. आणि गायकानं किंचित् डोळे उघडताच दिलगिरी व्यक्त करून समोर पहा म्हणून खुणविलं.

समोर एक गृहिणी आपल्या अपत्यास घेऊन त्याला कुरवाळीत कुरवाळीत अश्रु ढाळतेय हे त्यानं पाहिलं आणि त्यानं तिथंच गायन बंद केलं.

आणि आम्ही दुसऱ्या खेपेस सम चुकलो.

गायकान बराच वेळ डोकं टेकून देवीची क्षमायाचना केली असावी. कारण त्याने जेव्हा मस्तक वर उचलल तेव्हा त्याच्याही डोळ्यातून धारा वाहात असल्याचं आम्हाला दिसलं.

गायन बद होताच गर्दी ओसरू लागली. पण कुतूहल असणारे इकडेतिकडे उभेच होते. सर्वांनाच हे सारं नवोन होतं.

९ वाजता होणाऱ्या नारोशंकराच्या घटेच्या आवाजाबरोबर आरतीत सामील असणारे आम्ही नेमके गायन ऐकत होतो.

हा नवा गायक कोण ही काही जणांची शका.

आणि विशेष म्हणजे गायन चालू असता हुदके देणारी ही गृहिणी आणि आपल्या अपत्याला थोपटीत अश्रुपात करण्याची तिची ही कृती.

सार सार गढ होतं.

कुणीही काहीही बोलायचं नाही हा संकेत. अन् म्हणूनच गर्दी जशी जमली तशी हळूहळू लोपली.

आम्ही, बुवा आणि गायक एवढेच उरलो.

आमची हत्यारं व्यवस्थित लावून ठेवली. खोलीला कुलूप लावलं आणि तिघेही अंबाईचे दर्शन घेऊन बाहेर पडलो.

पुष्कळ वेळ आम्हीं तिथे स्तब्धच होतो.

शेवटी न राहवल्यानं मीच प्रश्न केला.

" सुनिये. अं.. अं. आप .."

आमच्या प्रश्नाचा रोख कळल्यानं गायकानं आम्हाला काहीच उत्तर दिलं नाही. पण एक दीर्घ निश्वास टाकला आणि तुटकपणं म्हणाला.

" बहोत बहुत शुक्रिया. आपका एहसान कभी भूलूंगा नही !"

अगदी तऱ्हेवाईकपणे जसा आला तसा तो निघूनही गेला. इतक्या झपाटयाने तो गेला की आम्ही त्याचा पत्तासुद्धा विचारूं शकलो नाही. आणि समजा विचारला असता तरी त्यानं तो सांगितला असता असंही नव्हतं.

दोन दिवस असेच अस्वस्थतेत गेले. तो कोण, इथं एकाएकी का आला, गायनसुद्धा अर्धवटच का गायिलं याचा सारखा मनाला त्रास होऊं लागला.

आणि आज आम्ही सम चुकलो म्हणून वाईट वाटून घेतनाही दोन दिवसानंतर बुवांनीच बातमी सांगितली.

त्यांना तरी कुठ चैन पडत होत. सारं कलापूर धुंडून त्यांनी कोडं उलगविण्याचा प्रयत्न केला होता.

अर्धवट अर्धवट एवढच कळलं की, तो जवळच असणाऱ्या शिवपूर येथील दामू मास्तरांचा मुलगा. हल्ली लखनौला असतोय. एक तपापूर्वी गेलाय घरातून' तो परवा आला होता अन् दुसरे दिवशीच निघून गेलाय. सारं सारं आठवलं आम्हाला.

हा दामू मास्तरांचा मुलगा. अत्यंत गोड, सुरीत्या गळयाचा गायक म्हणून संगीत स्पर्धेत बक्षिसं पटकावणारा पोर. शाळा सोडून संगीताच्या मागं धावणारा, प्रत्येक गायक ऐकणारा, मैफल न चुकवणारा आणि तेवढयाच तन्मयतेनं त्यांचं गाणं गळयात साठवणारा नूतन गंधर्व. कलापूरला यांचं बिऱ्हाड होतंच. त्यानं तिथं गायनाच्या शिकवण्या केल्या आणि त्यांतच फसला. लोक काहीसे म्हणत होते खरे असं. आणि ही त्याची शिष्या. दोघांनी विवाहबद्ध होण्याचा मनसुबा रचला. मित्रांनी संमती दिली. गुप्त मसलती झाल्या आणि बरोबर कार्तिक महिन्यातल्या एकादशीच्या दिवशी दोघांनी पळून जायचा बेत आखला. तो त्याचे मित्र रात्री १० पासून तिच्या घरापासून थोडया अंतरावर तिची वाट पहात उभे होते. ती चुपचूप येणार होती. आणि त्यांनी संसार थाटायचा म्हणून ठरवलं होतं....

रात्रीचे बारा वाजून गेले तरी तिचा पत्ता नसल्याने ते व्याकुळ झाले. आणि दबकत दबकत तिच्या घरासमोर आले. त्याच्या मित्रास आणि त्याला धक्काच बसला. कारण घराला कुलूप होते. सायंकाळी ७ पावेतो घरात वर्दळ होती आणि आता एकदम ४ तासात अशी परिस्थिती !

दुसरे दिवशी मित्रांनी चौकशी करताच रात्री ८ वाजता सगळे परगावी गेल्याचे कळले आणि पुन: काही दिवसानी वृत्त येऊन थडकलं! तिचा विवाह झाल्याचे. त्यांना गायक जावई पसत नव्हता. दामू मास्तरांचा मुलगा बोलेना .खाईना, पिईना,

गाणं बंद झालं. आणि एक दिवशी दामू मास्तरांचा मधू लखनौस गेल्याचं वृत्त पसरलं. मित्राला तरं त्यानं पत्र लिहिलं होतं म्हणे. दामू मास्तर खंगले. त्यांनी त्याला पत्रं लिहिली. पण तो आला नाही. दामू मास्तर आता नाहीत. मधूही इकडे आला नाही.

काल अचानक आला तो कोण हे कुणालाच कळलं नाही. कदाचित मालतीला माहित नसेल तो आलाय म्हणून

तो आपल्यामुळं पागलदा झालाय एवढंच तिला माहित. परवा अचानक तिनं त्याचं गाणं एकलं मात्र, तिला सूर ओळखीचे वाटले. पावलं न कळत वळली आणि अनर्थ करून बसली. तिच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या.


आम्ही ते पाहिलं. तिच्या हुंदक्यानं आमची सम चुकली.

चाळीस वर्षात असं घडलं नव्हतं. पण त्यादिवशी तसं घडलं हे खरं.

दामू मास्तरांच्या मधूनं ओळख का दिली नाही हे आता कळतंय. त्याला खाली काढायची इच्छा नव्हती पण तो तसं इच्छित असूनही काय उपयोग ?

परवा टिपरी पौर्णिमा. जखमेवर टिपरी टाकून गेलीय भळभळा रक्त वाहणार आहे.

त्याचं, तिचं आणि माझंही !

# मंत्रमुग्धा

सुहास भालचंद्र बापट

कलावंत, निदान प्रसिद्धीच्या प्रकाशात असलेला कलावंत आणि त्याची कलाकृती याबद्दल सर्वसाधारणपणे सगळ्यांनाच कुतूहल वाटते. त्या कलावंताचे खासगी जीवन, त्याच्या आवडीनिवडी, लकबी या बाबतीतील कुतूहल हे थोडे साधारण पातळीवरचे म्हणता येईल. पण यापेक्षाही खास वेगळे असे कुतूहल म्हणजे एखादी कलाकृती निर्माण कशी होते यासंबंधीचे. लेखकाच्याच बाबतीत बोलावयाचे झाले तर त्याची एखादी कथा, कविता, कादंबरी कशी निर्माण होते, त्यातले खरे किती, कल्पनेतले किती, कोणत्या लेखकाला कोणती परिस्थिती अनुकूल ठरते, खुद्द लेखकाचे त्याच्या लेखनाबद्दल मत काय, असे अनेक प्रश्न या कुतूहलापोटी संभवतात. या कुतूहलातून लेखकाशी जवळीक साधू पहाणारे लोक कितीतरी आढळतात.

अरविंद गोखले यांचा 'मंत्रमुग्धा' हा कथासंग्रह अशा प्रकारचे कुतूहल पुरविणारा आहे. त्यांचा हा एकविसावा कथासंग्रह. इतक्या प्रदीर्घ लेखनानंतर लेखनात तोचतोचपणा येणे सहज संभवते. किंबहुना मर्यादित जीवनक्षेत्र असलेले आपले मराठी लेखक 'लेखक' म्हणून लवकर 'संपतात' हे सर्वांच्या परिचयाचे आहे. तेव्हा नुसते 'टिकून रहाणे' ही सुद्धा गोखले यांच्या लेखनाची जमेची एक बाजू. पण त्यापेक्षाही महत्त्वाची अशी त्यांच्या जमेची दुसरी बाजू म्हणजे त्यांची प्रयोगशीलता. त्यांच्या 'अनामिका' या संग्रहाने जसा त्यांच्यातील ताजेपणाचा प्रत्यय दिला तसाच त्यांचा 'मंत्रमुग्धा' हा संग्रहही तोच प्रत्यय पुन्हा देईल.

या संग्रहातील जग हे इतर कथाजगापेक्षा वेगळे आहे. 'मंत्रमुग्धा' हे मराठी लेखकांचे जग आहे. त्या लेखकात कवी आहेत, कथाकार आहेत, कादंबरीकार आहेत, नाटककार आहेत, खलनायक म्हणून टीकाकारही आहेत, लेखनाला प्रसिद्धीची वाट दाखविणारे संपादक आहेत, प्रकाशक आहेत, आणि या सर्वांबरोबर समाजातील वेगवेगळ्या व्यक्ती आहेत. येथील जगाचे वर्तुळ या सर्वांच्या माध्यमातून पूर्ण होते.

नेहमीच्या कथेत एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या अंतर्मनातील घडामोडीला किंवा कदाचित तितकेच बाह्य जगातील घडण्याला महत्त्व असते. पण लेखकांच्या जगातील

घटनांचे स्वरूप या दोन्हीपेक्षा वेगळे आहे. येथे जास्ती महत्त्व आहे लेखकाच्या मनाच्या गूढ धदंगार गाभाऱ्याला. या गाभाऱ्यात कधीतरी नेणिवेची ज्योत प्रज्वलित होऊन समोर भासणारी अव्यक्त निर्मितीमूर्ती गोचर होणार आहे. पण हे इतक्या सहजासहजी घडत नाही. त्यासाठी विलक्षण सायास आहेत. मनाचे तडफडणे आहे, अंधारात ठेचाळत फिरणे आहे, आणि एखाद्या क्षणी जेव्हा मूर्ती उजळते तेव्हा या मनोमंदिराबाहेरची सश्रद्ध अश्रद्ध रसिक भाविकांची भाबडी गर्दी या अनुभवाचे रूप शबल करण्यास हातभार लावणार आहे. मग पुन्हा साधकाची आंतरिक तडफड सुरू होते. हे शबल रूप त्याला अस्वस्थ करते. प्रत्येक निर्मितीतील अनामिक अपुरेपणा त्याला टोचू लागतो. मग पुन्हा असेच सुरू होते. स्वत:कडे रोखून पहाणे एखाद्या क्षणी स्वत:च्याच निर्मितीवर फिदा होणारा 'नार्सिसस' आणि दुसऱ्याच क्षणी अस्वस्थतेचे वरदान मिळालेला 'अश्वत्थामा' ही लेखकाची दोन रूपे या कथांमध्ये अनेक ठिकाणी दिसतात. इतर कथांमधील बाह्य आणि आतरिक घडणे क्रिया-प्रतिक्रिया स्वरूपाचे असते. तसे ते येथेही आहेच. पण त्याबरोबरच बाह्य जगातील अनेक गोष्टींचे उपयोजन सयोजन यांना येथे जास्त महत्त्व आहे. कारण येथे मन आहे लेखकाचे.

## मानसिक द्वंद्वाचे चित्रण

अशा या लेखकाच्या कथा; साधकांच्या कथा. एखाद्या अनामिक स्त्रीच्या दर्शनाने एखादा क्षण फुलून येऊन येथे प्रतिभा जागृत होते. तो क्षण आणि ती स्त्री यामधील हे अतार्किक गणित. ते पुन्हा दुसऱ्या क्षणाला उपयोगी पडत नाही. आणि मग निर्मितिक्षम मनाची तडफड सुरू होते. (मंत्रमुग्धा); कलेसाठी मुक्त बेबंद जगू पहाणाऱ्या बबनला क्षणोक्षणी पैशाचे पाश करकचून आवळतात आणि त्याच्या लेखनाला प्रॉमिसरी नोटेची कळा येते (मुक्त, मस्त); कोठे एखाद्या विश्वास रत्नपारखीची पहिलीच कादंबरी अमाप प्रसिद्धी मिळवून बसते आणि त्या यशाचा प्रखर झगमगाट पुढच्या निर्मितीवर एक जीवघेणे दडपण आणतो; एखाद्या ससारात कलानिर्मितीचा निर्भर आनंद भोगणारी 'ती' आहे आणि या आनंदानेच तिला बाकीच्या जगापासून एकटी बनविले आहे. 'अंजन कांचन...' सारख्या कथेत एक वेगळाच लेखक भेटतो. सामान्य विनोदी लेखनावर मिळविलेल्या यशाने त्याचे अस्सल कलानुभव हरवून गेले आहेत. तरीही मोह पडतो तो यशाचाच. आणखी एका कथेत एक अनामिक पण प्रसिद्ध लेखक यापुढे लेखनाला प्रसिद्धी द्यावयाची की नाही या भोवऱ्यात सापडून हॅम्लेट बनलेला दिसतो. अशा रीतीने या कथा, लेखकाच्या मनाचे कंगोरे उजेडात आणून त्यांच्या मानसिक द्वंद्वांचे चित्रण करतात. या चित्रणात भावना, संवेदना, वेदना, अपेक्षा, उर्मी इत्यादीचे रसायन आहे. या रसायनात कोणती तरी एक जाणीव जोर धरते आणि इतरांशी वैर मांडते. संघर्ष सुरू होतो आणि कथेला व्यापून रहातो.

'कलंदर,' 'एका लेखकाची मुलाखत' या दोन कथा जरा वेगळ्या आहेत. पहिलीमध्ये मानसिक संघर्षाबरोबरच खराखुरा जीवनसंघर्ष आहे. या जीवनसंघर्षाचा नायक आहे दारिद्र्याने पोळलेला कवी. ज्या समाजात कलेला वस्तुतः स्वावलंबी स्थान नसते तेथे नुसत्या कलेच्या आधाराने कलावंताला जगता येत नाही. याविरुद्ध झगडू पाहणारा, या झगड्यात अखेर आपल्या पत्नीला वेगळ्या तऱ्हेने पणाला लावणारा हा अ-युधिष्ठिर कलावंत कवी. जगण्यासाठी शेवटी त्याला कलेमध्ये भेसळ करून तथाकथित भावगीते आणि रहस्यकथा खरडाव्या लागतात; विनिमयाच्या बाजारात तो आणि त्याची कला चक्रावून जाते.

दुसऱ्या कथेचे स्वरूप मुलाखतीचे आहे. वस्तुतः ती कथा नव्हे. आणि व्यावहारिक अर्थाने तिला प्रत्यक्ष संदर्भ नसल्याने ती निर्भेळ मुलाखतही नाही. प्रचलित मराठी साहित्यावर केलेली ती अप्रत्यक्ष टीका आहे. जेथे जीवनानुभवच तोकडा आहे तेथे साहित्य तर कमअस्सल बनतेच. आणि कमअस्सलाच्या या जगात दुसऱ्या कोणी अस्सल लिहिले तर तेही खोटे वाटू लागते. मराठी साहित्यातील वास्तवाचा हा विदारक पेच आहे. या मुलाखतीत मराठी लेखकांच्या चाकोरीचे, त्यांच्या थिटेपणाचे परखड विश्लेषण एका एकाकी ताठर व्यक्तिमत्त्वाच्या लेखक-पात्राकडून केलेले आहे.

'फुलेचि झाली भ्रमर' ही कथा सर्वांत उठून दिसणारी. दि. बा. मोकाशींची 'आमोद सुनांसि आले' ही सर्वश्रुत कथा येथे प्रत्यक्ष संदर्भ म्हणून अवतरली आहे. मोकाशींची कथा कशी उमलली असावी, फुलली असावी, तिच्यातील वेगवेगळे घटक कोठून जमा झाले असावेत, त्याचे परस्पर साधे कोठे जमले नसतील, त्यातून कोणता मार्ग निघाला असेल आणि अखेर जन्ममृत्यूचा संघर्ष कसा तयार झाला असेल या सगळ्याचे उत्कट चित्रण गोखल्यांच्या कथेत आढळते. ते चित्रण काल्पनिक आहे की वास्तव आहे या गोष्टीशी वाचकाचा संबंध नाही. ते स्वतः भावरूप धारण करते की नाही हे महत्त्वाचे.

लेखकाचे मन हा बाह्य आणि आतरिक जगाचा सेस्मोग्राफ असतो. या जगातील सूक्ष्मातिसूक्ष्म स्पंदने तेथे जिवतपणे नोंदली जातात. या स्पंदनांचे तेथे संघटन होते. या संघटनाला आशयनिष्ठ असा अर्थ प्राप्त होतो. शब्दरूपांमध्ये ही स्पंदने पुन्हा गोठविली जातात. त्यांच्या पुनर्जागृतीची जबाबदारी वाचकावर असते. निर्मितीचे गणित एका अर्थाने निरामय असते. पण या निरामयतेला कलावंताचे व्यवहारी जीवन सतत छेद देते. या छेदातून निर्मितीच्या दृष्टीने विकृत असे क्षण उभे राहतात.

ही विकृती कलावंताचा छळ करते. निर्मिती आणि विकृती यांच्या विषम ध्रुवात सतत ताणलेले कलावंताचे हे जीवन कथाविषय बनविणे हे गोखलें याचे फार मोठे वेगळेपण आहे. येथे प्रत्येक आत्मा स्वतःला शोधतो आहे. एका चित्रपटात दुसरा चित्रपट जन्म घेतो आहे. एका नाटकात दुसरे नाटक घडते आहे.

पण अनुभवक्षेत्राचे हे वेगळेपण सोडले किंवा अनुभवाची उत्कटता प्रत्ययाला आणून देणाऱ्या काही कथा सोडल्या तर या संग्रहातील कथा पुनरावर्तित वाटतात.

प्रत्येक कथेमधील त्याच त्याच स्वरूपाच्या व्यक्ती, त्यांच्या त्याच त्याच प्रतिक्रिया, तोच तोच मध्यमवर्गीय स्तर. त्यामुळे एकेक कथा वाचन पुढे जावे तसतसे हे वातावरण बदिस्त वाटू लागते. कथानायक अगर नायिकेचे मनोन्वेषणही गिरक्या घेऊ लागते आणि परिणामी कथा उत्कटतेच्या दृष्टीने पातळ होतात. एखादे विशिष्ट क्षेत्रच अनेक कथांसाठी निवडले की असा तोचतोचपणा थोडाफार अपरिहार्य आहे हे मान्य करूनही तो उत्कटतेला बाधक ठरतो हे अमान्य करता येत नाही.

## लेखकाचे एकेरी भावविश्व

याचा अर्थ अनुभवक्षेत्राचे एकत्व हे अपरिहार्यपणे अनुत्कटतेला जबाबदार असते असे नाही. ते मूलत च अनुभवदृष्ट्या समृद्ध पाहिजे. आणि काही सन्मान्य अपवाद वगळता आजच्या मराठी लेखकाचे भावविश्व एकेरी तर आहेच त्याबरोबर ते हिणकस पण आहे. 'एका लेखकाची मुलाखत' मधील लेखकाने मराठी लेखकासबंधी जे म्हटले आहे ते अक्षरशः खरे आहे. प्राध्यापक, टीकाकार, शिक्षक, मध्यमवर्गीय कारकून यासारख्या पांढरपेशा लोकांशिवाय लेखक दिसत नाही ही अगदी कालपरवापर्यंतची स्थिती होती. ती आजही बहुतांशी कायम आहे. त्यामुळे अनुभवाचा हा रस्ता आखीव बांधीव वगैरे झाला आहे.

ठीक आहे. त्यानेही एवढे बिघडले नसते कारण अनुभवाच्या सामर्थ्याला क्षेत्राचा विस्तार ही एकच नवी दिशा नसते. हा रस्ताही कुठेतरी गेलाच असता, पण या रस्त्याने चालणारी ही मंडळी नाकासमोर सरळसुद्धा चालत नाहीत. आपल्याच पावलाच्या रिंगणात फिरत रहातात. परिणामी मध्यमवर्गीय क्षेत्रापुढेसुद्धा बदलत्या जीवनप्रवाहाने उभी केलेली नवी अनुभवात्मक आव्हाने या धृतराष्ट्रांना दिसतच नाहीत. सर्व प्रकारच्या नव्या आव्हानांना तोंड द्यावे लागणार हा मध्यमवर्ग कोठे तोंड चुकवतो आहे, कोठे पळ काढतो आहे, कोठे हतश होतो आहे तर कोठे खोट्या बुद्धिनिष्ठेची अलिप्त झूल पांघरून 'जितं मया'चा अभिनिवेश धारण करत आहे. या बदलाचे या बेगडीपणाचे आणि त्यामागील बेरड माणसाचे जिवंत दर्शनसुद्धा किती विस्मयकारक ठरू शकेल! पण तसे होत नाही.

परिणामी आमचे वाङ्मय निःसत्त्व बनते. मग निःसत्वाच्या फाफटपसाऱ्यातच अनुभवाची निर्मितीबीजे निवडू पहाणाऱ्या 'मंत्रमुग्धे'च्या हातात अर्थशून्य आवर्तांचे कमअस्सल फोल मिळणार हे काय वेगळे सांगावयास हवे?

या संग्रहाच्या परिणामशून्यतेचे आणख ही एक कारण संभवते. पूर्णांशाने साकार झालेल्या कलारूपामागे असंख्य गोष्टी कार्यप्रवण असतात. रसिकाचा संबंध मात्र या कार्यप्रवण गोष्टींशी नसून पूर्ण कलारूपाशी आणि त्याच्या परिणामाशी येतो. कलानिर्मिती हा अगदी विशिष्ट असा अनुभव आहे. त्याचे घटक जेवढे स्वयपूर्ण आणि समृद्ध असतील, त्याचप्रमाणे त्यांची भावित-अभावित अशी संघटना जेवढी गुंतागुंतीची असेल त्याप्रमाणात तो अनुभव रसिकाला आकर्षित करतो. या प्रक्रियेत ही अनुभवबीजे आणि ही संघटना प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे परिणामाला जबाबदार असते,


परिणामाचे साधन असते पण निर्मितीचा अनुभव हाच जेव्हा स्वतंत्रपणे कलारूप धारण करू पहातो तेव्हा वर निर्देशिलेल्या घटकांचे प्रयोजनच बदलते. ते साधन रहात नाहीत. ते स्वत:चेच स्वत: उपयोजक बनतात (बोक्याने स्वत:चीच पिले खाव त तसा थोडासा हा प्रकार आहे !)

आता अगदी विशिष्ट असा निर्मिती अनुभव परिणामाच्या स्वरूपात समोर उभा न रहाता केवळ अगभूत घटकांच्या उपयोजनाच्या आधारावर उभा रहातो तेव्हा तो साहजिकच अतिविशिष्ट बनतो. परिणामी केवळ आस्वादक्रियेशीच संबंधित असलेल्या (आणि कलानिर्मितिक्रियेची जाण नसलेल्या) वाचकांपासून तो फार दूर जातो. परिणामाची ही दूरता अखेर शून्यतेचे स्वरूप धारण करते.

एक उदाहरण घेऊ. चित्रपट सुरू आहे. प्रियकर प्रेयसीची भेट हे (चित्रपटातले) नेहमीचे दृश्य ! प्रियकराचा प्रथमस्पर्श नायिकेच्या देहाला असंख्य स्पर्शलहरींनी थरारून टाकतो. आणि पुढच्याच शॉटला दवाने डंवरलेले एक उमलते फूल हलकेच हिंदकळते. दोन्ही दृश्ये लागोपाठ येऊन प्रेक्षकांवर योग्य तो परिणाम करतात. हा झाला कलानुभव; पण या अनुभवाचे चित्रीकरण हाच अनुभवाचा विषय झाला तर? नटनटी वेळेवर आल्या का ? आल्यावर मेकअपमध्ये किती वेळ गेला ? शॉट सुरू होण्यापूर्वी किती लोकांनी कसा त्रास दिला ? प्रत्यक्ष शॉटमध्ये हे थरारणे किती वेळा प्रयत्न करून जमवावे लागले किंवा किती वेळा त्वचा तशीच निबरट निगरगट्ट राहिली ? त्याची कारणे कोणती ? (!) किती वेळा रीटेक् घ्यावा लागला ? फूल खरे होते की प्लॅस्टिकचे ? दवबिंदू म्हणून कोणता द्रव वापरला ? त्याचा भाव ? फूल हलण्यासाठी काय करावे लागले ? वगैरे वगैरे असंख्य प्रश्न उपस्थित होतील. आणि त्यांच्या उत्तराच्या संघटनेतून एक वेगळा कलानुभवही निर्माण होऊ शकेल. पण त्याचे नाते मूळ कलानुभवाशी सुसंगत नसून विसंगतच आहे, विरूप आहे. दुरून डोंगर साजरे, दिसते तसे नसते वगैरे म्हणी पटवून घेण्यासाठी फार तर वाचकांना त्याचा उपयोग होईल. पण मूळ अनुभवाशी तो जवळीक साधणारा नाही. खुद्द कलावंतही तसे म्हणू शकणार नाही.

निर्मितीचा अनुभवही जर अधिक संवहनशील बनवावयाचा असेल तर नेणिवेच्या अंधारातील निर्मितीची ही होळीच प्रज्वलित बनली पाहिजे. हे स्वत:च रचलेले स्वत:चे सरण आहे. सरणाच्या त्या धगधगत्या प्रकाशाने सभोवतालच्या अंधाराने लपेटलेले चेहरे कदाचित क्षणभरच उजळून दिसतील, पण त्याच दिसण्यातील रेषान्‌रेषा हृदयावर उमटून राहील. त्यासाठी निर्मितीचीच होळी धगधगली पाहिजे. तेथे समईच्या शुभ्र कळया उपयोगी पडणार नाहीत. त्यासाठी लागतील दऱ्याखोऱ्यात पेटवलेले पेटते पलाल ! ◘ ◘ ◘

**मंत्रमुग्धा : अरविंद गोखले : पॉप्युलर प्रकाशन मुंबई : मूल्य नऊ रुपये.**




## अनंत भावे

## पाच

सव्वीस मेची पहाट अटलांटिक महासागरावर उगवली. किनारादलाची दोन विमाने, खवळलेल्या समुद्रात 'बिस्मार्क'चा शोध घेण्यासाठी अगदी खालून उडत होती. महासागरावर धुक्याचा दाट थर पसरला होता. मधूनच वाऱ्याच्या वेगवान झोतांमुळे विमाने झोकांड्या खात होती. पहाटे तीन वाजल्यापासून 'बिस्मार्क'ला शोधत ती भिरभिरत होती. तासामागून तास चालले होते.

आता सूर्य वर आला होता. साडेदहा वाजले होते.

इतक्यात, सागरपृष्ठापासून अवघ्या पाचशे फुटांवरून उडणाऱ्या एका विमानाच्या कर्णधाराला अचानक एक युद्धनौका दिसली. ती 'बिस्मार्क'च असणार अशी त्याची व त्याच्या सहकर्णधाराची खात्री पटली. कारण ती ब्रिटिश युद्धनौका असती तर तिच्याबरोबर संरक्षक विनाशिकांचा ताफाही असता. सहकर्णधाराने ताबडतोब विमानदलाकडे बिनतारी संदेश पाठवला. 'बिस्मार्क' पुन्हा सापडली होती!

कोणत्याही मोठ्या नाविक मोहिमेत संघर्षाचे केंद्रस्थान सारखे बदलत असते. आदल्या रात्री या सिद्धान्ताचा पुन्हा पडताळा आला होता. ब्रिटिशांचे प्रमुख प्रतिनिधित्व आता सॉमरव्हिल आणि त्यांच्या एच् विभागाकडे आले होते. 'बिस्मार्क' हरवल्याची वार्ता आल्यापासून सॉमरव्हिलने त्याच्या काफिल्यातील

विमानवाहू आर्क रॉयलच्या कर्णधाराच्या-कॅप्टन मॉडच्या-सगनमताने 'बिस्मार्क'च्या शोधार्थ विमाने पाठवण्याची योजना आखली होती. सकाळ झाली की अखंड शोध करण्याचे त्यांनी ठरवले होते.

लवकरच सॉमरव्हिलला विनाशिकांची सोबत सोडावी लागली होती. तेलभरे-साठी त्यांना जाणे भागच होते. दुरावणाऱ्या विनाशिकांवर दोन महत्त्वाची कामे सॉमरव्हिलने सोपवली होती. मात्र एच् विभागापासून शभर मैल दूर गेल्याशिवाय ती कामे करू नयेत अशी त्याची सक्त ताकीद होती. पहिले काम होते नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाला एच् विभागाचा नेमका ठिकाणा कळवण्याचे आणि दुसरे होते प्लायमाऊथ येथील नाविक तळावरून ब्रेस्ट बंदरातील हवाई टेहळणीची त जो वार्ता मिळवण्याचे. सॉमरव्हिल एक महत्त्वाची गोष्ट विसरला नव्हता : तीनच दिवसापूर्वी स्वार्नहॉर्स्ट आणि नायसेनॉव या लढाऊ नौका ब्रेस्ट बंदरात होत्या त्या आता बिस्मार्क'च्या साहाय्याला येणे शक्य होते आणि मग त्या तीन जर्मन नौका-पुढे सॉमरव्हिलच्या एच् विभागाचा टिकाव लागणे दुरापास्त होते. म्हणून ब्रेस्टच्या टेहळणीचा अहवाल पाहून त्याला निर्णय घ्यायचा होता.

तासामागून तास गेले, पण प्लायमाऊथहून काहीच उत्तर आले नाही. सॉमर-व्हिल अस्वस्थ झाला. कदाचित तीन महाबलाढ्य नौकांशी संग्राम करण्याचा भयं-कर प्रसंग ओढवेल म्हणून आर्क रॉयलवर काही विमाने राखून ठेवणे त्याला अपरिहार्य झाले. खरे म्हणजे 'बिस्मार्क'चा शोध लागणे इतके निकडीचे होते की आर्क रॉयलवरील सगळीच्या सगळी विमाने शोधार्थ पाठवण्याची आवश्यकता होती.

पण विपरीत हवामानामुळे विमाने पाठवणे अशक्य होऊन बसले. कारण धूम-धार पाऊस कोसळत होता. समुद्र खवळला होता. प्रचंड लाटा उसळत होत्या. निसर्गाच्या रौद्र रूपाची तमा न बाळगता सॉमरव्हिलचा काफिला पुढे चालला होता. मात्र त्याची गती अपरिहार्यपणे मंदावली होती.

सकाळ झाली. आर्क रॉयलच्या डेक–विमानतळावरून लाटांचे पाणी निथळत होते. लाटांच्या तडाख्यामुळे नौका झोकांड्या खात होती. तरीही वैमानिकांनी हिंमतीने 'बिस्मार्क'च्या शोधार्थ उड्डाण केले. प्रत्येक विमानोड्डाणाच्या वेळी कॅप्टन मॉडच्या जिवाची घालमेल होत होती.

दोन तास झाले इतक्यात किनारादलाच्या एका विमानाला 'बिस्मार्क' सापड-ल्याची सुवार्ता कानी आली. आर्क रॉयलच्या ध्वनिक्षेपकांवरून ही वार्ता सग-ळ्यांना कळवण्यात आली. प्रतीक्षेने आंबलेल्या माणसात एकदम उत्साहाचे वारे संचारले.

परंतु मूळ वार्तेबद्दलच जरा घोटाळा झाला होता. किनारादलाच्या ज्या विमा-नाने 'बिस्मार्क' टिपली ते चुकून ढगाच्या आवरणातून बाहेर आले आणि लगेच 'बिस्मार्क'च्या विमानवेधी तोफमाऱ्यात सापडले. त्यातून कशीबशी सुटका करून

घेऊन त्या विमानाने पुन्हा ढगांचा आडोसा घेतला. तेवढ्या वेळात 'बिस्मार्क' कोठे नाहीशीच झाली होती. निदान त्या विमानाला तरी प्रयत्न करूनही ती दिसली नव्हती. म्हणूनच त्याच्या वार्तेत निश्चितो नव्हती.

पण आर्क रॉयलच्या विमानापैकी एक विमान लवकरच त्या स्थळी आले. त्याला मात्र उसळत्या महासागरातील शत्रुनौका दिसली. त्याने आर्क रॉयलवर संदेश पाठवला तो शत्रूचो 'क्रूझर' दिसल्याचा! आर्क रॉयलवर सगळयांना धक्काच बसला. शत्रूची 'क्रूझर'? 'युद्धनौका' नव्हे? म्हणजे इतक्या शोधान्ती सापडलेली नौका अखेर प्रिन्स युजेनच आहे को काय? मग युद्धनौका 'बिस्मार्क' कोठे गडप झाली?... पण काही मिनिटातच आर्क रॉयलवरील आणखी एका विमानाने शत्रूचो 'युद्धनौका' टिपल्याची बातमी दिली. बातम्यांची शहानिशा करण्यासाठी आणखी विमाने परत येईपर्यंत वाट पाहण्यावाचून कॅप्टन मॉडला गत्यंतर नव्हते.

विमाने परत आली. पण त्यांना निश्चयपूर्वक काही सांगता येईना. प्रथम 'युद्धनौका' पाहिल्याबद्दल त्याचे एकमत झाले. मग पुन्हा त्यांच्या मतात तफावत पडली. शेवटी मात्र ती नौका प्रिन्स युजेन असावी, असा निर्णय त्या दोघांनी एकमताने दिला! कदाचित असेलही प्रिन्स युजेन ती, कोणी सांगावे. पण ती 'बिस्मार्क'च असणार असे कॅप्टन मॉडची मनोदेवता निग्रहाने सांगत होती; आणि आपल्या वैमानिकांपेक्षा मनोदेवतेवर विश्वास टाकून मॉडने तसे जाहीरही करून टाकले. नंतर पाठवलेल्या टेहळयांनी, मॉडच्या मनोदेवतेचा कौल अचूक असल्याची ग्वाही दिली. ती शत्रुनौका 'बिस्मार्क'च होती!

'बिस्मार्क' सापडल्याचा किनारादलाच्या विमानाने आपल्या कार्यालयाला पाठवलेला संदेश आणखी एका ब्रिटिश नौकेने मध्येच टिपला होता. त्या नौकेची एतद्विषयक प्रतिक्रिया व्यवस्थित समजण्यासाठी आदल्या रात्रीच्या तिच्या हालचाली लक्षात घेणे आवश्यक आहे.

'बिस्मार्क'च्या शिकारीला निघालेल्या दर्यासारंग टोव्हीना, संरक्षक विनाशिकांच्या साथीविना पत्करायला लागणाऱ्या धोक्याची नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयातील नाविक हालचालींच्या नियंत्रकांना चांगलीच कल्पना होती. परंतु एकूण आरमारातच विनाशिकांचा तुटवडा होता. म्हणून सुरुवातीला त्यांचे हात जणू बांधले गेले होते. परंतु मोहिमेला निश्चित आकार आल्यानंतर, त्यांनी, नकाशावर, नजिकच्या कक्षेत असणाऱ्या विनाशिकांचा शोध करायला सुरुवात केली. अटलांटिकमधून येणाऱ्या एका अन्नवाहू नौकांच्या काफिल्याचे संरक्षण करणारा, कॅप्टन फिलिप व्हायनच्या विनाशकांचा ताफा त्या कक्षेत होता. याच धाडसी कॅप्टन व्हायनने एकोणिसशे चाळीस साली नॉर्वेजियन फियोर्डमध्ये अल्टमार्क या कपटी जर्मन नौकेवरून तीनशे ब्रिटिश नाविकांची मोठ्या हिकमतीने सुटका केली होती.

व्हायनच्या देखरेखीखाली असलेला अन्नवाहू काफिला आता रॉडने आणि किंग जॉर्ज द फिफ्थच्या निकट आला होता. जर्मन पाणबुड्यांपासून युद्धनौकांचे संरक्षण करण्यासाठी टोव्हींना विनाशिकाची आत्यंतिक गरज होती. व्हायनचा ताफा ती गरज भागवू शकत होता. कारण त्याच्या संरक्षणाखाली असलेला अन्नवाहू काफिला आता निर्धोक जलविभागात आला होता; त्याच्या बरोबरच्या संरक्षक विनाशिकांच्या ताफ्याची त्याला आता तादृश गरज नव्हती. नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयात चर्चाविनिमय होऊन व्हायनच्या विनाशिकांचा ताफा दर्यासारंगांच्या दिमतीला पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. योगायोगाची गोष्ट अशी की, ही चर्चा चालू असतानाच टोव्हींनी केलेली 'विनाशिकांची व्यवस्था तातडीने करा' अशी कळकळीची मागणी कार्यालयात येऊन पोचली ह'ती.

त्या रात्री, खूप उशिरा, खुद्द चर्चिलमहाशय नौदल कार्यालयात अकस्मात 'बिस्मार्क'च्या शिकारमोहिमेची हालहवाल पाहण्यासाठी जातीने आले होते. सारी परिस्थिती समजावून घेतल्यावर ते म्हणाले, "टोव्हीजवळ संरक्षक विनाशिका हव्यातच. उगाच भलता धोका पत्करण्यात अर्थ नाही" – त्यांची व्यवस्था केली आहे असे कळल्यावर चर्चिलसाहेबांनी सुटकेचा निःश्वास टाकला. व्हायनच्या विनाशिकांचा झुंजार ताफा या नव्या कामगिरीवर निघाला होता.

खरे म्हणजे बिनतारी तारायंत्राच्या साहाय्याने व्हायनचे 'बिस्मार्क'च्या शिकारीकडे प्रथमपासून लक्ष होते. अधीरतेने तो या मोहिमेची स्थित्यंतरे पाहात होता. या मोहिमेत आपण भाग घेऊ शकत नाही याची युयुत्सु व्हायनला सारखी खंत वाटत होती. रणक्षेत्र त्याच्या समीप होते; पण तलवार म्यान करून त्या रणक्षेत्राच्या बाहेर राहण्याचे त्याच्या नशिबी आले होते. वास्तविक एक वेळ अशी होती की 'बिस्मार्क' आणि प्रिन्स युजेन व्हायनच्या ताब्यातील अन्नवाहू काफिल्याला नष्ट करण्यासाठीच चाल करून आल्या होत्या. आणि 'बिस्मार्क'च्या सेलटाकीला पळती लागून तिचा बेत बदलला नसता तर व्हायनला त्यांना तोंड द्यावेच लागणार होते. . व्हायनच्या ताब्यात असलेल्या एका नौकेवर ईस्ट इंडिजचे सेनापती व्हाईस अॅडमिरल आरब्युथनॉट होते. 'बिस्मार्क' आणि प्रिन्स युजेनच्या रूपाने येणाऱ्या प्राणसंकटाची कल्पना व्हायनने त्यांना एका खास गुप्त-सदेश-योजनेच्या साहाय्याने वेळोवेळी दिली होती. परंतु त्या अन्नवाहू काफिल्यावर परमेश्वराची कृपादृष्टी असावी.

अखेर सव्वीस तारखेला सकाळी दोन वाजता व्हायन ज्याची वाट पाहात होता तो सदेश त्याला मिळाला. कोसॅक, झुलु आणि शीख या विनाशिका दर्यासारंग टोव्हींच्या किंग जॉर्ज द फिफ्थच्या आणि मावरी व पिओरन या रॉडनेच्या मदतीला पाठवण्याचा तो संदेश व्हायनला एखाद्या समारंभाच्या निमंत्रणासारखा संतोषकारक वाटला. अन्नवाहू नौकांना रामराम ठोकून व्हायन वेगाने टोव्हींच्या

दिशेने निघाला. परंतु टोव्हींकडे पोचण्याआधीच किनारादलाच्या त्या विमानाने आपल्या कार्यालयाला पाठवलेल्या, एका 'शत्रुनौके'चा शोध लागल्याचा संदेश व्हायनने मध्येच टिपला. त्या संदेशातील 'शत्रुनौका' दुसरी तिसरी कोठलीही नसून 'बिस्मार्क'च असणार, अशी त्याची मनोमन खात्री झाली.

तडकाफडकी त्याने एक अत्यंत धाडसी निर्णय घेतला. या निर्णयामुळे क्वचित घडू शकणाऱ्या अनिष्ट परिणामांची पर्वा त्याने केली नाही. स्व-तंत्र व्हायनच्या कीर्तीला साजेसेच वागणे होते त्याचे. आणखी दोनतीन तासांच्या वाटचालीनंतर, आदेशाप्रमाणे, तो टोव्हींच्या काफिल्याला गाठू शकत होता. परंतु 'बिस्मार्क'ची सध्याची शीघ्र गती मंदावल्याशिवाय रॉडने वा किंग जॉर्ज द फिफ्थ तिला गाठू शकणार नाहीत, असा विचार व्हायनच्या मनात आला. मग 'बिस्मार्क'ला रोखण्याचे काम आपणच का करू नये? 'बिस्मार्क' त्याच्या आग्नेयेला प्रयत्न-साध्य टप्प्यात तर होती ... व्हायनने टोव्हींना जाऊन मिळण्याचा आदेश धुडकावून लावला आणि आपला मोहोरा थेट 'बिस्मार्क'कडे वळवला.

व्हायनच्या एकांगी निर्णयाचा परिणाम भयंकर होण्याचा संभव होता. फ्रान्सच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रत्येक जर्मन पाणबुडी 'बिस्मार्क'च्या मदतीला येण्याची शक्यता होती; आणि त्यांच्या टॉर्पेडोमाऱ्यात विनाशिकांच्या संरक्षणाला मुकलेल्या टोव्हींच्या युद्धनौका सापडल्या असत्या तर त्या दुर्घटनेची जबाबदारी व्हायनवर आली असती.

व्हायन 'बिस्मार्क'च्या रोखाने सुसाट पळत होता. वारा त्याच्या पाठीवर वाहात होता. महासागर खवळला होता. एक वेळ त्या विनाशिका पर्वतप्राय लाटांच्या शिखरांवर आरूढ होत आणि दुसऱ्या वेळी खोल जलदरीत धडपडत.



प्रचंड महासागराच्या विस्तारावर त्या काही बुचांसारख्या दिसत होत्या. तितक्याच छोट्या, हलक्या आणि व्रदुक. डळमळणाऱ्या विनाशिकांवरील नाविकांना कशाचा तरी आधार घेणे भाग पडत होते. आधार घेता घेता, आणि घेऊनही, धडपडल्यामुळे, कित्येकांना जखमा झाल्या. कांहीची शुद्ध हरपली. एकजण तर दर्याच्या लाटांनी गिळकृतच केला. व्हायन मात्र अविचलित होता.

इकडे व्हायन 'बिस्मार्क'ला रोखण्यासाठी वेगात जात असताना तिकडे दर्या-सारंगाच्या ध्वजनौकेवर चर्चेमध्ये त्याचाच विषय निघाला. किंग जॉर्ज द फिफ्थच्या दिमतीला येण्यापेक्षा व्हायनला सरळ 'बिस्मार्क'च्या मागे पाठवावे अशी सूचना एका अधिकाऱ्याने केली. तशी मुद्दाम आज्ञा करण्याची फारशी आवश्यकता नाही, असे टोव्हीनी सांगितले. व्हायनला ते चांगले ओळखत होते. आपण न सांगताही बहुधा व्हायन स्वतंत्रपणे तोच निर्णय घेईल, अशी खात्री त्यांना मनोमन वाटत असली पाहिजे!

सव्वीस तारखेच्या दिवशी आणि रात्री नशिबाचे पारडे असे जीवघेण्या पद्धतीने वरखाली होत होते की एखाद्या कचदिल सेनाधिकाऱ्याने ते सहन न होऊन मोहिमे-तून माघार घेतली असती. परंतु दर्यासारंग टोव्ही स्थिरबुद्धीने, धीराने परिस्थि-तीचे विश्लेषण करून निर्णय घेत होते. 'बिस्मार्क' अजूनही त्यांच्यापासून किती-तरी दूर होती; आणि तिची गती मदावल्याखेरीज तिला गाठणे अशक्य आहे, असे त्याना वाटू लागले होते. सकाळी 'बिस्मार्क' अशा जलविभागात जाण्याची शक्यता होती की जेथे तिला जर्मन विमानांची मदत मिळू शकली असती. त्यापूर्वी तिला रोखणे जरूरीचे झाले होते. नाहीतर नामुष्की पत्करून रणातून काढता पाय घ्यावा लागणार होता.

'बिस्मार्क'ची गती रोखण्यासाठी तिच्यावर टॉर्पेडोमारा करणे हा एकच तोडगा होता. तो कोणी करावयाचा? अर्थात व्हायनच्या विनाशिकांनीं किंवा सॉमरव्हिलच्या एच विभागातील विमानवाहू आर्क रॉयलवरील विमानानी.

सॉमरव्हिलच्या विमानवाहू आर्क रॉयलवर धामधूम चालली होती. दोन विमाने सतत 'बिस्मार्क'वर पाळत ठेवत होती. आणि बाकीच्यानी चौदिशांनी येऊ शकणाऱ्या शत्रूवर बारीक नजर ठेवली होती. खवळलेल्या समुद्रात आर्क रॉय-लच्या डेकवरील विमानोड्डाण आणि विमानावतरण म्हणजे जीवावरचे सकट होते.

सॉमरव्हिलचा एच् विभाग आता बरोबर 'बिस्मार्क'च्या मार्गात उभा होता. 'रिनाऊन' या युद्धनौकेच्या साहाय्याने सॉमरव्हिल 'बिस्मार्क'ला युद्धात खेचू शकला असता. पण 'बिस्मार्क'सारख्या महाबलाढ्य युद्धनौकेशी लढत द्यायला रिनाऊन अगदी कुचकामाची होती. म्हणजे एकूण टॉर्पेडोमाऱ्यावाचून उपाय नव्हता.

आणि निसर्ग कोपला असताना आर्क रॉयलच्या विमानांनी टॉर्पेडोमारा करायचा

म्हणजे वैमानिकांच्या कौशल्याची आणि निर्धाराची कठीण कसोटीच होती. शिवाय 'बिस्मार्क' विमानांच्या भ्रमणकक्षेत आणण्यासाठी आर्क रॉयल 'बिस्मार्क'च्या जवळ नेणे भाग होते आणि तसे करण्यात वेगाने अंगावर येणाऱ्या 'बिस्मार्क'च्या दीर्घगामी तोफांनी आर्क रॉयलच्या चिथडया उडण्याचा धोका होता. अवजड-पणामुळे आणि मंदगतीमुळे विमानवाहू नौकेइतके वेधायला सोपे दुसरे लक्ष्य नाही, असे म्हटले जाते. एखादी लहानशी विनाशिकासुद्धा, विमानवाहू नौकेच्या अवजड हालचालीमुळे तिची सहज राखरांगोळी करू शकते. मग 'बिस्मार्क'बद्दल तर बोलायलाच नको. 'बिस्मार्क' पाठीवर वारा घेऊन एच विभागाच्या रोखाने वेगात येत होती. विरुद्ध दिशेने येणाऱ्या आर्क रॉयलला विमाने उडाल्यानंतर, त्यांच्या प्रत्यागमनाची वाट पाहात रेंगाळणे भाग होते. शिवाय विमाने अमुकच वेळात परत येतील असेही मानता येणार नव्हते. आणि तोपर्यंत 'बिस्मार्क' फुसांडत जवळ येणार होती. एच विभागाजवळ संरक्षक विनाशिका नव्हत्या. होती फक्त दुबळी रिनाऊन. शेफिल्ड या क्रूझरला सॉमरव्हिलने 'बिस्मार्क'शी प्रत्यक्ष संपर्क साधण्यासाठी आधीच पुढे पाठवून दिले होते.

'बिस्मार्क'च्या ईशान्येला पन्नास मैलावर सॉमरव्हिलने आपला एच् विभागाचा काफिला स्थिर केला. दोन वाजण्याच्या सुमारास, पोटात टॉर्पेडो घेऊन, आर्क रॉयलच्या पंधरा विमानांनी उड्डाण केले. ढगाळ आकाशात अंधुक होत जाणाऱ्या या विमानांच्या कामगिरीवर 'बिस्मार्क'च्या शिकारीचे भवितव्य अवलंबून आहे असा विचार सॉमरव्हिल आणि मॉडच्या मनात आला. तीन वाजण्याच्या सुमारास जेव्हा विमानहल्ला सुरू झाल्याची वार्ता टोव्हींना मिळाली तेव्हा त्यांच्याही मनात तोच विचार आला. प्रत्यक्ष हल्ल्याचे फलित ऐकायला टोव्ही अत्युत्सुक झाले.

या हवाई हल्ल्याच्या फलिताची वाट पाहात असतानाच रॉडने किंग जॉर्ज द फिफ्थला येऊन मिळाली. जवळजवळ दोड दिवस तिच्या ठावठिकाण्याचा कोणाला पत्ताच नव्हता. आणि आता निकडीच्या वेळी एखाद्या विश्वासू सखीसारखी ती मदतीला आली होती. तिच्या सोळा इंची तोफांची टोव्हींना सारखी आठवण येत होती!

आर्क रॉयलवरून निघालेली महत्त्वाकांक्षी विमाने वाऱ्यापावसातून 'बिस्मार्क'-ला शोधत कष्टाने मार्गक्रमण करत होती. अंदमासाने शत्रूच्या डोक्यावर आल्या-नंतर त्यांनी खाली झेप घेतली; आणि अकस्मात थोड्या अंतरावर त्यांना एक नौका दिसली. 'बिस्मार्क'? शंकाच नको. गिधाडांनी भक्ष्यावर झडप घालावी तशी विमानांनी त्या नौकेवर झडप घातली.

इकडे आर्क रॉयलवर कॅप्टन मॉडला नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाचा एक संदेश मिळाला. संदेश वाचून कॅप्टन मॉडच्या चित्ताचा ठावच सुटला. 'बिस्मार्क'शी प्रत्यक्ष संपर्क साधण्यासाठी शफिल्डला पुढे पाठवल्याची सॉमरव्हिलने नौदलाच्या

मध्यवर्ती कार्यालयाला कळवलेली वार्ता कार्यालयाने माहितीसाठी कॅप्टन मॉडला कळवली होती. तोपर्यंत कॅप्टन मॉडला ती ठाऊकच नव्हती पण आता फार उशीर झाला होता. मॉडची विमाने तोपर्यंत 'बिस्मार्क'जवळ पोचली असण्याची शक्यता होती. जवळपास कोणतीही नौका नाही, अशीच त्यांची समजूत असणार होती. पण शेफिल्ड होती तिलाच 'बिस्मार्क' समजण्याची चूक होणे त्या तसल्या कुद्द वातावरणात अगदी शक्य होते !

मॉडने सगळा सावधपणा झुगारून देऊन, संदेश-मौन वाऱ्यावर सोडून आपल्या विमानांना 'शेफिल्डकडे लक्ष द्या. तीही जवळच कोठेतरी असेल' असा स्पष्ट संदेश तातडीने पाठवला.

परंतु इकडे, मोठ्या मोहिमेच्या दडपणाने भारलेल्या विमानांनी, वाऱ्यापावसाने अंधारलेल्या वातावरणात, 'बिस्मार्क' समजून, आपल्याच नौकेवर – शेफिल्डवर – हल्ला चढवलाही होता. शेफिल्डच्या कर्णधाराला – कॅप्टन लारकॉमला – वाटले 'बिस्मार्क'ला वेधायला विमाने आपल्या नौकेवरून पुढे जातील. पण बापरे. ती तर सरळ शेफिल्डवरच टॉर्पेडोमारा करण्यासाठी झपावत होती ! एक क्षणभर कॅप्टन लारकॉम थिजूनच गेला; नंतर तत्परतेने शेफिल्डची गती कमाल वाढवण्याचा हुकुम त्याने दिला. इकडे विमानांनी शेफिल्डच्या रोखाने टाकलेले टॉर्पेडो शेफिल्डवरील भयचकित नाविक पाहात होते. नौकेवर होणाऱ्या स्फोटांना तोंड देण्याची मानसिक तयारी त्यांनी केली होती. परंतु काही अगम्य तांत्रिक दोषामुळे, काही टॉर्पेडोंचा पाण्यात पडल्याबरोबर स्फोट होऊन ते निरुपद्रवी ठरले. आणि शेफिल्डच्या रोखाने पाण्याखालून मार्ग काढत येणाऱ्या टॉर्पेडोंना शेफिल्डनेच, कॅप्टन लारकॉमच्या कुशल नेतृत्वाखाली, शिताफीने चुकवले. काही विमानांना आपली चूक वेळीच उमगून त्यांनी टॉर्पेडोमारा आवरून धरला. शेफिल्डचा काळ आला होता, पण वेळ आली नव्हती.

शेफिल्डवरील नाविकांच्या मनाची अवस्था काय झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. 'बिस्मार्क'च्या शिकारीच्या, दर्यासारंग टोव्हीनी, वरिष्ठांना पाठवलेल्या अधिकृत अहवालात लिहिले : 'या प्रसंगी शेफिल्डने कमालीचा संयम राखून यत्किंचितही प्रतिकार केला नाही.'

आर्क रॉयलच्या तरुण वैमानिकांनी त्या तसल्या भीषण वातावरणात मोठ्या धैर्याने विमाने उडवली होती. नाविक दलाच्या हवाई शाखेची आवश्यकता आणि योग्यता सिद्ध करण्याची ऐतिहासिक कामगिरी आपण करू शकू अशी रास्त आशा त्यांना वाटत होती. पण भलतेच विपरीत घडले होते. 'बिस्मार्क'ची गती रोखण्याचे बाजूलाच राहिले; शेफिल्डला निकामी करण्यात मात्र ते जवळजवळ यशस्वी झाले होते ! शरमिंदे झालेले वैमानिक आर्क रॉयलवर परतले. सर्वात विचित्र गोष्ट अशी की शिक्षणकालात शेफिल्ड हीच त्या वैमानिकांची लक्ष्य-नौका होती.

महासागरावर ज्या एका नौकेला त्यांनी पाहताक्षणी बिनचूक ओळखायला पाहिजे होते ती नौका म्हणजे शेफिल्ड !

परतलेल्या वैमानिकांना आपली तोंडे कोठे लपवावी ते कळेना. परंतु कॅप्टन मॉड शहाणा आणि समजूतदार होता. काही विशेष घडले होते असे त्याने मळी भासूच दिले नाही. विविध संदेशांचा स्वीकार करणे, त्यांचा अर्थ लावणे, आणि पुन्हा चौदिशांना योग्य ठिकाणी योग्य ती माहिती पुरवणारे शतधा संदेश पाठवणे, या गदारोळात नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाने शेफिल्डबद्दलचा संदेश आर्क रॉयलकडे फार उशीरा पाठवला. कदाचित तो ' केवळ माहितीसाठी ' असल्यामुळे त्याचे आर्क रॉयलच्या लेखी असलेले महत्त्व नौदल कार्यालयाच्या ध्यानात आले नसावे. त्यामुळे वैमानिकांनी त्या परिसरात दुसऱ्या नौकेची कल्पनाही केली नव्हती. कडव्या निश्चयामुळे ताणलेल्या मनस्थितीत त्यांच्याकडून ' बिस्मार्क '-ऐवजी शेफिल्डवरच हल्ला करण्याची फार मोठी चूक झाली होती. परंतु कॅप्टन मॉडच्या स्नेहदृष्टीने ही चूक क्षम्य होती; दुरुस्त करण्याजोगी होती. कॅप्टन मॉडने आधी वैमानिकांच्या जेवणाखाण्याची व्यवस्था केली. जेवणानंतरच दुसऱ्या हल्ल्याची बोलणी करू असे सांगितले.

त्यामळे वैमानिकांच्या मनावरचे दडपण नकळत उचलले गेले. पुढील खेपेला कसलीही चूक होणार नाही अशी जिद्द त्यांच्या मनात उत्पन्न झाली.

हा हल्ला फोल ठरल्याच्या बातमीने टोव्ही कमालीचे उदास झाले. त्यांच्या पल्लवित होऊ पाहणाऱ्या आशेवरचा तो अखेरचा कुठाराघात होता.

मात्र टोव्हींना, हल्ला अयशस्वी झाला, एवढीच मोघम माहिती सॉमरव्हिलच्या संदेशात मिळाली होती. वैमानिकांच्या झालेल्या दुर्दैवी घोटाळ्याची त्यांना काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे वाईट हवामानामळे वा ' बिस्मार्क 'च्या प्रखर प्रतिहल्ल्यामुळे किंवा दोन्हीमुळे हल्ला अयशस्वी झाला असावा असा तर्क त्यांनी साहजिकच केला. त्यामुळे सहा वाजून तीस मिनिटांनी दुसरा हल्ला करतो असा संदेश सॉमरव्हिलने पाठवला तरी त्यांच्या मनावरचे औदासीन्याचे पटल उठले नाही. नौदलाच्या या हवाई शाखेवरचा दर्यासारंगाचा विश्वासच क्षणभर ढळला होता. पहिला हल्ला पूर्णत: अयशस्वी झाल्यानंतर दुसरा तरी यशस्वी होईल अशी मनाला खोटी आशा लावायला त्यांची तयारी नव्हती. कारण आता दुसऱ्या हल्ल्याच्या वेळी अंधार पडणार होता. आणि हवामान तर उत्तरोत्तर अधिकच खराब होत होते.

ही ब्रिटिशांना मिळालेली जवळजवळ अखेरची संधी होती. सॉमरव्हिलचा हा दुसरा हल्ला निरुपयोगी ठरला तर ' बिस्मार्क 'ची गती मंदावणार नव्हती; आणि ती दुसऱ्या दिवशी सकाळी जर्मन विमानाच्या संरक्षणाखाली निसटून जाणेही अगदी शक्य होते. उलट टोव्हीच्या नौकांना जर्मन पाणबुड्या आणि किनाऱ्या-




## केशव सूज्ञ आहे : त्याला ठाऊक आहे की फक्त सिमेंटच्या कोठारातच धान्य संरक्षित राहाते

फक्त सिमेंटच्या कोठारातच तुमचे धान्य आग, पाणी, उंदीर-घुशी आणि कृमिकीटक या त्याच्या शत्रूंपासून सुरक्षित राहाते.
सिमेंटची कोठारे मजबूत आणि अधिक टिकाऊ असतात. एसीसी सिमेंटच्या साह्याने आपण अगदी सहज आणि स्वस्तात, आपल्या आवश्यकतेप्रमाणे जमिनीच्या पोटात किंवा पृष्ठभागावर धान्य कोठारे बांधू शकता.
आपला पैसा सूज्ञपणाने खर्च करा. धान्याच्या सुरक्षिततेसाठी एसीसी सिमेंटचीच कोठारे बांधून अधिक नफा मिळवा. एसीसी सिमेंट गेली ५० हून अधिक वर्षांपासून देशातील सर्वोत्कृष्ट दर्जाचे सिमेंट म्हणून महशूर आहे.

तुम्हाला लागणारे सिमेंट तुमच्या नजीकच्या एसीसी स्टॉकिस्टकडून किंवा दि सिमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षि कर्वे रोड, मुंबई-२० यांच्याकडून खरेदी करा.

दि कॉंक्रीट असोसिएशन ऑफ इंडिया, १२१, महर्षि कर्वे रोड, मुंबई-२० यांच्याकडून तुम्हाला तांत्रिक साह्य विनामूल्य मिळू शकेल.

**दि असोसिएटेड सिमेंट कंपनीज लिमिटेड**
दि सिमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लि.

**ACC**
किसानांचा साथी

CML-9287

वरील जर्मन विमाने यांच्यापासून धोका उत्पन्न होणार होता शिवाय किंग जॉर्ज द फिफ्थ आणि रॉडने यांच्यात सकाळपर्यंत फक्त स्वगृही परतण्याएवढच तेल शिल्लक राहणार होते. अशा परिस्थितीत पाठलाग सोडून द्यावा लागणार होता.

हां व्हायनच्या विनाशिकादेखील टॉर्पेडोमारा करून बिस्मार्क 'ला रोखण्याचा प्रयत्न करणार होत्या हे खरे. पण त्यांचा मारा यशस्वी होणे हा चमत्कार ठरला असता. एकाकी नौकेवर, रात्रीच्या वेळी, विनाशिकांनी चढवलेले टॉर्पेडोहल्ले तोपर्यंत बहुधा अयशस्वी झाले होते. आणि या तोल ढळवणाऱ्या वाऱ्यापावसात, खवळलेल्या महासागरात तो यशस्वी होणे अशक्य कोटीतलेच होते.

आर्क्टिक वर्तुळापासून बिस्केच्या उपसागरापर्यंतच्या तीन हजार मैलावरच्या महासागरावर दर्यासारंग टॉव्हींनी चपळ आणि चतुर 'बिस्मार्क 'चा पाठलाग चालवला होता. या प्रयत्नात सुरुवातीलाच हूडचा बळी गेला होता. हूडवरील अवघी तीनशे ? माणसे वाचली होती. व्हिक्टोरियसच्या विमानांनी खरोखर ऐतिहासिक मोलाची कामगिरी केली होती. मार खाऊन खिळखिळ्या झालेल्या प्रिन्स ऑफ वेल्सनेही 'बिस्मार्क 'वर असा एक प्रहार केला होता की त्यामुळे अटलांटिकमधील अन्नवाहू काफिल्यावर तुटून पडण्याचा आपला विचार ॲडमिरल लटयेन्सला बदलावा लागला होता. पराभवाच्या वार्ता सतत ऐकून नाउमेद झालेले ब्रिटन आता एखादी विजयाची वार्ता ऐकायला आतुर झाले होते. पंतप्रधान चर्चिल महाशयांनी तर स्पष्टच सांगितले होते : "बिस्मार्कला बुडवा–जल-समाधी द्या !"

'बिस्मार्कला बुडवा '– यासाठीच तर दर्यासारंगांचा अविरत अट्टाहास चालला होता. पण तो यशस्वी होणार नाही अशी चिन्हे दिसू लागली होती. ब्रिटिशांची प्रतिकारी कारवाई हाणून पाडून 'बिस्मार्क ' अटलांटिकमध्ये घुसली होती. सुख-रूपपणे फ्रेंच बंदरात जाऊन, श्वास टाकून, नव्या उमेदीने ती पुन्हा मोल्यवान ब्रिटिश अन्नवाहू नौकांच्या मागे हात धुऊन लागती तर दर्यासारंगांनी स्वत:ला कधीही क्षमा केली नसती.

या उद्वेगाच्या भरातच त्यांनी सॉमरव्हिलला निर्वाणीचा संदेश पाठवला : मध्य-रात्रीपर्यंत 'बिस्मार्क 'ची गती रोखण्यात यश आले नाही तर किंग जॉर्ज द फिफ्थ आणि रॉडने शिकार अर्धीच सोडून हात हालवीत परत फिरणार होत्या !

शेफिल्ड 'बिस्मार्क 'जवळ सरकतच होती. आपल्याच विमानांनी केलेल्या हल्ल्याच्या भयंकर दिव्यातून सहीसलामत बाहेर आल्यानंतर पुन्हा एकदा शेफिल्ड-वरील टेहळ्याला दोन पौंडांचे बक्षीस मिळणार होते. पावणेसहा वाजता, 'बिस्मार्क 'ला पाहिल्याचा पुकारा करून एका अधिकाऱ्याने हे बक्षीस पटकावले !

पावसाने कुंद झालेल्या क्षितिजावर एक अजस्र आकार अंधुक दिसत होता. शेफिल्ड आणखी थोडी पुढे सरकली आणि तो आकार हळूहळू स्पष्ट होत गेला.

लवकरच त्या आकाराला ' बिस्मार्क 'चे परिचित रूप प्राप्त झाले अखेर पुन्हा एकदा एक ब्रिटिश नौका हरवलेल्या ' बिस्मार्क 'च्या नेमक्या मागावर आली होती. आर्क रॉयलच्या आणि किनारादलाच्या विमानाना ' बिस्मार्क 'वरील पहाऱ्याच्या कामात शेफिल्डची सोबत मिळाली. ' बिस्मार्क 'च्या पिछाडीला आठ मैलांवर आपली जागा निश्चित करून, कॅप्टन लारकॉम मागे सफोक आणि नॉरफोकने पाठवले तसे ' बिस्मार्क 'चा मार्ग, स्थिती, गती यांची माहिती देणारे नियमित संदेश दर्यासारग टोव्हीना पाठवू लागला.

शेफिल्ड ' बिस्मार्क 'च्या इतक्या जवळ जाऊनही ' बिस्मार्क 'ने तिच्यावर तोफा डागल्या नाहीत. दिवसभर आर्क रॉयलच्या आणि किनारादलाच्या विमानांनी ॲडमिरल लटयेन्सचा पिच्छा पुरवला होता; त्यामुळे शेफिल्डवर तोफमारा करून आपला दारूगोळा फुकट घालवायला तो तयार नव्हता. कारण तोफमाऱ्याला भिऊन कदाचित शेफिल्ड पळालीच तरी ती चिवट विमाने मानगुटीवर होतीच ना.

लारकॉमला सॉमरव्हिलकडून आर्क रॉयलवरील विमानांच्या दुसऱ्या हल्ल्याची माहिती मिळाली होती. त्याचबरोबर आधी झालेल्या अपराधाबद्दल त्याने लारकॉमची क्षमायाचना केली होती। आणि आता केला जाणारा टॉर्पेडोमारा निश्चित ' बिस्मार्क 'वरच असेल असे आश्वासनही त्याला दिले होते !

आर्क रॉयलवर तर नुसती गडबड उडाली होती. एक एक क्षण मोलाचा असल्यामुळे माणसे इकडून तिकडे लगबगीने धावत होती. पहिल्या वेळी चुकून शेफिल्डवर मारा करताना टॉर्पेडोमधील एक तांत्रिक दोष लक्षात आला होता: टॉर्पेडोंना बसवलेल्या लोहचुंबकी खिट्या दोषास्पद होत्या. कारण लक्ष्य वेधून टॉर्पेडोंचा स्फोट होण्याऐवजी पाण्यात पडताक्षणीच त्यांचा स्फोट होऊन ते फुकट जात होते. आवश्यक ती दुरुस्ती करून टॉर्पेडो आता निर्दोष करण्यात आले होते

विमाने ' बिस्मार्क 'कडे जाताना वाटेत शेफिल्डशी हातमिळवणी करण्यात येईल असे लारकॉमला कळवण्यात आले होते. या खेपेला चूक होणार नव्हती.

सात वाजले. आर्क रॉयलच्या डेकवर विमाने उड्डाणासाठी सिद्ध झाली. समुद्र खवळलेलाच होता. वाऱ्यावादळामुळे आणि पावसामुळे वातावरण अंधारले होते. आर्क रॉयल कमालीची हालत होती. आर्क रॉयलवरील प्रत्येकजण या हल्ल्याचे महत्त्व जाणत होता. आर्क रॉयलच्या कर्तबगारीशी ब्रिटनचे भवितव्य जडलेले होते. कारण ब्रिटिश अन्नवाहू नौकांचा कर्दनकाळ ठरू शकणाऱ्या ' बिस्मार्क 'ला रोखून तिचा बदोबस्त करण्याची ही अखेरची संधी होती. या अखेरच्या निकराच्या प्रयत्नाला अनुरूप अशीच पार्श्वभूमी निसर्गाने निर्माण केली होती.

एकापाठोपाठ एक सारी विमाने उडाली. काळवंडलेल्या आकाशात अदृश्य होईपर्यंत ती पाहात राहणाऱ्या आर्क रॉयलवरील अधिकाऱ्यात आणि नाविकात असा एकही माणूस नव्हता की ज्याच्या अंतःकरणात त्यांच्यासाठी प्रार्थना उमटली नव्हती !

अर्ध्या तासाने विमाने शेफिल्डवरून पुढे गेली. ' बिस्मार्क ' बारा मैलांवर आहे अशी माहिती शेफिल्डने त्यांना दिली होती. परतु थोडयाच वेळात तो परत आली. त्या दिशेने, त्या चमत्कारिक हवामानात, त्यांना ' बिस्मार्क ' दिसू शकली नव्हती. शेफिल्डने त्यांना दुसऱ्या दिशेने मार्गदर्शन केले आणि विमाने अदृश्य झाली.

काही काळ गेला आणि शेफिल्डपुढील धुके आणि ढग अचानक उजळून निघाले. पाठोपाठ तोफमाऱ्याच्या निनादांनी आसमंत भरून गेले. हल्ल्याला सुरुवात झाली होती. शेफिल्डची उत्सुकता ताणली गेली होती.

मध्येच धुक्याचा पडदा उचलला जाई. एकदोन मिनिटेच ' बिस्मार्क ' दृश्यमान होई. तिच्या भीषण तोफमाऱ्याला न जुमानता, आर्क रॉयलची विमाने, संधी साधून, पाण्यात टॉर्पेडो टाकत होती. पुन्हा धुके दाटले म्हणजे केवळ तोफमाऱ्याचा दबलेला आवाज ऐकू येई.

शेफिल्डने मार्गदर्शन केल्यानंतर विमाने अचूक ' बिस्मार्क 'जवळ पोहोचली होती. दाट मेघव्याप्त आकाशात ती वर चढली. मेघपटल इतके दाट होते की त्यांच्या गटव्यवस्थेत घोटाळा झाला.

एक क्रमांकाचा गट खाली आला तेव्हा ईशान्येला चार मैलांवर त्याला ' बिस्मार्क ' दिसली. तिसऱ्या गटातील एक विमान चुकून त्यांच्याबरोबरच राहिले होते. ढगांचा आडोसा सांभाळत त्यांनी खाली झेप घेतली. विमानवेधी तोफा गरजल्या. विमाने सागराच्या पृष्ठभागाशी समांतर झाली आणि त्यांनी टॉर्पेडो टाकले. त्यातील एक ' बिस्मार्क 'वर जाऊन धडकला. दुसऱ्या गटातील दोन विमाने ढगांआड अदृश्य होऊन नऊ हजार फूट उंच चढली. आणि नव्याने पवित्रा घऊन खाली झेपावली. त्यांनी दोन टॉर्पेडो टाकले आणि नंतर तोफमाऱ्याला भिऊन पळ




काढला. दोहोपैकी एक तरी टॉर्पेडो ' बिस्मार्क 'वर धडकला असणार अशी त्यांची खात्री होती. या दुसऱ्या गटातील एक विमान चुकून एकाकी पडले होते. त्याची दिशाभूल झाली होती. ते सरळ शेफिल्डकडे गले आणि शफिल्डच्या मार्गदर्शनानंतर ' बिस्मार्क 'ला गाठून, तोफमाऱ्याला न जुमानता तिच्यावर तुटून पडले. त्याने टाकलेला एक टॉर्पेडो ' बिस्मार्क 'वर जाऊन आदळला !

' बिस्मार्क ' दुसऱ्या गटातील विमानाचा समाचार घेत असतानाच चवथ्या गटातील विमाने, तिसऱ्या गटातील आपली एका चुकार विमानासह, सहा हजार फुटावरून खाली तिच्यावर झेपावली. दोन हजार फुटावर असताना ढगामधील पाकळीतून त्याना दुसऱ्या गटाच्या हल्ल्याचे दृश्य दिसले. ' बिस्मार्क 'च्या पिछाडीच्या बाजूला ती आली तेव्हा ' बिस्मार्क ' तिच्याभोवती घोंघावणाऱ्या विमानांवर बेभानपणे आग ओकत होती. अचानक तिने आपला मारा चवथ्या गटावर केंद्रित केला. एका विमानाची गोळ्यांनी चाळण झाली. वैमानिक आणि गोलंदाज दोघेही जखमी झाले. तरीही त्यांनी टॉर्पेडो टाकले. दुर्दैवाने सगळे हुकले.

पाचव्या आणि सहाव्या गटातील विमानांची ढगामुळे दिशाभूल झाली. हल्ला करणे त्यांना शक्य झाले नाही.

साडेनऊ वाजता हल्ला समाप्त झाला. तेरा टॉर्पेडो टाकण्यात आले होते. त्यातील दोन टॉर्पेडोंनी तरी अचूक लक्ष्यवेध केला होता.

मुसळधार पावसात, आपली कामगिरी संपवून परतणारी आर्क रॉयलवरील दोन विमाने शफिल्डने पाहिली. विमाने तिच्या इतक्या जवळून गेली की आतील सैनिक आणि त्यांच्या चेहऱ्यावरचे भावसुद्धा स्पष्ट दिसत होते. विमानातील सैनिक आनंदाने हसत होते आणि ते आपल्या हाताचे अंगठे ताठ उभे करून यश मिळाल्याचे सूचित करत होते. ते शुभ चिन्ह पाहताच शेफिल्डवर उत्सवी वातावरण निर्माण झाले.

आर्क रॉयलवरील विमाने हल्ला संपवून परत गेली आणि जखमी ' बिस्मार्क 'ने अचानक शेफिल्डवर तोफा डागल्या. एका गोळ्याने तीन नाविक मृत्यु पावले. शेफिल्डने आपला वकूब ओळखून वेळीच माघार घेतली. इकडे शेफिल्डने माघार घेतली आणि तिकडे पश्चिम क्षितिजावर व्हायन आपल्या विनाशिकांसह ' बिस्मार्क 'चा रात्रभर पिच्छा पुरवण्यासाठी अवतीर्ण झाला !

(क्रमशः)



# वीज म्हणाली धरतीला

**शरद गोखले**

विषय कितीही स्फूर्तिदायक असला तरी ऐतिहासिक वास्तवता संभाळून, घेतलेल्या विषयातील नाट्य अचूक हेरून, आणि नाटकाच्या मर्यादा संभाळून नाटकाची यशस्वी बांधणी करणे, हे खरोखरच अवघड काम. झाशीच्या राणीचा फिरंगी सत्तेशी झालेला संघर्ष ही भारतीय इतिहासातील विलक्षण स्फूर्तिदायक घटना अनेक लेखकांनी, कादंबरीकारांनी, कवींनी झाशीच्या राणीच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी लेखणी झिजवली. सोहराब मोदींसारख्या तेव्हा जबरदस्त असणाऱ्या चित्रपट निर्मात्याने – लाखो रुपये खर्चून राणीचे जीवन रुपेरी पडद्यावर आणण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. असा हा विषय वि. वा. शिरवाडकर यांनी आपल्या नवीन नाटकासाठी घेतला. शिरवाडकरांजवळ हेवा वाटण्यासारखे भाषा-सामर्थ्य असले तरी त्यांचा मूळ पिंड कवीचा. त्यांच्यातील हा कवी त्यांच्या नाट्य-विषयावरही वर्चस्व गाजवतो, याचा प्रत्यय त्यांच्या या नवीन नाटकामध्ये वारंवार येतो. नाटकाचे नावच पहा ना – 'वीज म्हणाली धरतीला.' – नाटककार जर कवी नसता, तर विषय-आशयाशी जुळणारे, हे काव्यात्मक नाव कदाचित त्याला सुचते ना.

नाट्य-संपदा या आजच्या अग्रेसर व्यावसायिक नाट्यसंस्थेने नाटक रंगभूमीवर आणले आहे. दिग्दर्शक अर्थातच पुरुषोत्तम दारव्हेकर.

देशभर बंडाचे वादळ उठले आहे. बंडाला राणीचा पाठिंबा मिळावा म्हणून बंडाचे म्होरके राणीला भेटू इच्छित आहेत. राणीभोवती असलेल्या राजकीय सल्ला-

गारांना राणीने इंग्रजांशी इमान राखणे पसत आहे. पण दाराशी बंडखोर येण्या-पूर्वीच राणीने बंडामध्ये उडी घेण्याचा निर्णय घेतला आहे. पण भेटायला आलेल्या बडखोरांकडून दडपणाची भाषा सुरू झाल्याबरोबर राणीच्या स्वभाववैशिष्ट्याची एक झलक विजेसारखी चमकून जाते. इंग्रजाच्या बायका-मुलाना कोंडीत पकडून त्यांची केलेली कत्तल राणीला पसंत नाही. या अत्याचाराने ती व्यथित झाली आहे मनातील व्यथा, आणि व्यक्तिगत अडीअडचणी बाजूला ठेऊन राणी स्वातंत्र्य-युद्धामध्ये उतरली आहे. स्वातंत्र्यसमर जिंकण्याच्या ईर्षेने रणांगणामध्ये उतर-लेल्या राणीचा ग्वाल्हेरचा विजय साजरा करण्यावरून तात्या टोपे आणि राव-साहेब यांच्याशी झालेला संघर्ष राणीचे एक वेगळे स्वरूप दाखवून देतो. ज्या वेळी सर्वशक्तीनिशी उठाव करण्याची आवश्यकता, नेमक्या त्याचवेळी विजयो-त्सवाचे चाललेले सोहाळे राणीला सहन होत नाहीत. मनातील संताप राणी मोकळेपणाने व्यक्त करते आणि आपला एकाकी संघर्ष अखेरपर्यंत चालू ठेवते. इतिहासामध्ये राणीला स्थान देणाऱ्या तिच्या या स्वभाव वैशिष्ट्याचे चित्रण कुसुमाग्रज विलक्षण कौशल्याने करतात. राणी रणझुंजार खरी. स्वातंत्र्यसमर लढवण्यासाठी तिचे भगीरथ प्रयत्न चालले आहेत स्त्री–जीवनाला स्वाभाविकपणे आकर्षित करून घेणाऱ्या अनेक बाबी कटाक्षाने टाळून राणीने समशेर हातात घेऊन पुरुषांना लाजवणारे कर्तृत्व गाजवले म्हणून तर ती राणी लक्ष्मीबाई झाली. असे असले तरी लक्ष्मीबाई एक स्त्री आहे तिच्या या स्त्री-जीवनातील हळुवार भागही शिरवाडकरांनी मोठ्या कौशल्याने शब्दांकित केला आहे. या कामी त्यांनी सर्वांत जास्त उपयोग करून घेतला आहे जुलेखाचा. – राणीच्या दासी सुंदर व काशी यांचाही या कामासाठी उपयोग करून घेतला आहे. राणीच्या प्रत्ययकारी सहवासामुळे या सर्व स्त्रियांच्या जीवनातील स्थित्यंतरे आणि अखेरीस त्यांचे बलीदान या घटना नाट्याच्या स्वाभाविक परिपोष वाटतात. समरप्रसंगातून स्वतःचे मन बाजूला काढून पूर्वायुष्यातील स्मृतींना उजाळा देत तात्या टोपे यांच्या-बरोबरील राणीचे हितगूज विलक्षण मोहक आणि राणीची प्रभावी व्यक्तिरेखा सुस्पष्ट करणारे आहे.

ज्याच्यावर स्वातंत्र्यसमराची मदार, ती नेतेमंडळी फालतू पराक्रमाचे विजयो-त्सव मानण्यात दंग झाली आहेत. व्यथित झालेल्या राणीला एकाकीपणाच्या कल्पनेने ग्रासून टाकले आहे. या एकाकीपणामुळे निर्माण झालेला मनक्षोभ राणीला त्रस्त करत आहे – आणि अशा अवस्थेमध्ये राणी गंगादास स्वामीकडे येते मार्गदर्शनासाठी, – स्वामी राणीचे शंकानिरसन करतात. तिच्या कार्याचे स्वरूपही स्पष्ट करतात. – लक्ष्मी, देवळाचा सोनेरी कळस पायातल्या चिऱ्यांना दिसत नाही. तो दिसावला हवा असा आग्रहही त्याने धरू नये. श्रद्धेतून आणि बलीदानातून सिद्ध झालेला यज्ञ केव्हाही विफल होत नाही. स्वामीजीच्या आशीर्वादाने आणि मार्ग-

दर्शनाने प्रभावित झालेली राणी अखेरपर्यंत झुजत राहते – स्वातंत्र्यवेदीवरील या महत्त्वपूर्ण बलीदानाचे वर्णन कवी कुसुमाग्रज करतात...

ज्योत एक एकाकी लढली
घनांध रात्री काळ्याशी
प्रलयकर वादळी ॥
अर्पुन जीवन मधरेला
जळता जळता मावळली ती सूर्याच पाळली ॥

अशी ही 'झाशीची राणी'– तिच्या कार्यकर्तृत्वाचे हे नाटक. संपूर्णपणे राणीभोवती केंद्रीत होणे आवश्यक होते आणि तसे ते झाले असते तर नाटकाची उंची एकदम उंचावली असती. पण हळुवारपणे निर्माण झालेली जुलेखा कवी कुसुमाग्रजाचे मन व्यापून बसली. आणि कदाचित त्यांच्याही कळत-नकळत या व्यक्तिरेखेला प्राधान्य मिळाले, वाजवीपेक्षा जास्त. नाटककार शिरवाडकरावर कवी कुसुमाग्रजांनी विजय मिळवला. आणि जुलेखा – पसरत राहिली. प्रसंगी राणीला गौणत्व देऊन जुलेखाची वाटचाल चालू राहिली पण कुसुमाग्रजाना मोह घालणाऱ्या या व्यक्तिरेखेला शिरवाडकरांमधले नाटककार अडवू शकला नाही – आणि मग वजनदार झालेली ही व्यक्तिरेखा नाट्यविषयाला त्रासदायक ठरली. आणि संघर्षात्मक नाट्य अत्युच्च बिंदूला पोचले असताना – रसहानी करण्याचे पातकही जुलेखाच्या हातून झाले.

स्वामी गंगादासजी हेही काहीसे अनाहूत पात्र. जुलेखा इतका स्वामीजींनी त्रास दिला नाही तरी राणीच्या रणझुंझार व्यक्तिमत्त्वाला एक बारीकसा तडा हे पात्र देऊन जाते. राणीभोवती निराशाजनक परिस्थिती, आणि राणीही एक स्त्री होती, ही वस्तुस्थिती या दोन घटना या पात्राच्या दृष्टीने अनुकूल ठरतात. स्वतःचे मनोगत मोकळे करण्याची संधी हे पात्र नाटककाराला देते हेही विसरून चालणार नाही.

नाट्यविषय जितका अवघड तितकीच त्याची निर्मिती अवघड निर्मितीची ही अवघड बाजू नाट्यसंपदेने उचलली.

नाट्याची समज, लोभस व्यक्तिमत्त्व, आणि अभिनयकौशल्य असलेल्या ज्या काही थोड्याफार स्त्री कलावंत आज मराठी रंगभूमीवर आहेत त्यामध्ये सौ. सुधा करमरकर यांचा समावेश करावा लागेल. शिरवाडकरांनी उभी केलेली झाशीची राणी सर्वार्थाने सादर करण्याची ताकद असलेली स्त्री-कलावंत मिळवणे खरोखर कर्मकठीण काम नाट्यसंपदेने सुधाताईंची निवड करून–त्यांच्यातील कलावंताला आव्हान दिले होते. आणि बाईंनी या आव्हानाचा स्वीकार करून समर्थ राणी लक्ष्मीबाई उभी करण्याची अवघड कामगिरी यशस्वीपणे पूर्ण केली. झाशीच्या राणीसंबंधी प्रेक्षकांच्या मनामध्ये असलेल्या कल्पनेशी जुळणारी शरीरयष्टी

कदाचित बाईंजवळ नसेलही. पण ही उणीव जाणवू नये इतक्या कौशल्याने आणि तन्मयतेने बाई लक्ष्मीबाई उभी करतात. कुसुमाग्रजांचे प्रभावी संवाद चैतन्यमय करण्याचे सामर्थ्य बाईंच्या शब्दफेकीमध्ये आणि मुद्राभिनयामध्ये निर्विवादपणे आहे. रणझुजार झाशीची राणी, एकाकीपणे स्वामी गंगादासजीकडे मार्गदर्शनासाठी, आणि आशीर्वादासाठी आलेली राणी, जुलेखा, आणि दासीसमवेत स्त्री-सुलभ हितगूज करणारी लक्ष्मीबाई, पूर्वस्मृतींना उजाळा देत, तात्यांशी गप्पागोष्टी करणारी ब्रह्मावर्तांची मनू, अशी राणीची विविध रूपे बाई मोठ्या कौशल्याने दाखवतात. या भूमिकेसाठी सुधाताईंच्या निवडीबाबत जे नाराजी व्यक्त करतात, त्यानी बाईंना पर्याय म्हणून दोन तीन अन्य नावे डोळ्यांसमोर आणावीत म्हणजे त्यांना ही बाईंची निवड पसंत नसली तरी अपरिहार्य असल्याचे लक्षात येईल


अन्य कलाकारांपैकी फैय्याज, (जुलेखा) आणि वसंतराव देशपांडे (स्वामी गंगादास) यांना विशेष वाव आहे. फैय्याज काम मन लावून करते-एवढंच तिच्या बाबतीत म्हणता येईल. तिची गाणी ही बेताचीच रंगतात.-निदान मी पाहिलेल्या प्रयोगात तरी तशी होती. वसंतराव-स्वामीजींच्या भूमिकेत ठाकठीक वाटले,-तरी गायनाला पुरेशी संधी नसल्याने त्यांचे संगीतशौकीन प्रेक्षक निराश होतील. दोन अंक झाले तरी वसंतरावांचा पत्ता नसल्याने अस्वस्थ झालेले चाहते मी पाहिले आहेत. इतर कलाकारांपैकी ज्यांचे खरोखर कौतुक करावे अशी कामगिरी-माधुरी आजगावकर (मुंदर) आणि सौ. सुलभा पंचवाघ (काशी) या राणीच्या दोन दासींनी केली आहे. राणी लक्ष्मीबाईच्या या नाटकामध्ये एकही पुरुष पात्र भाव खाऊन जात नाही. थोडीफार संधी बिपीन तळपदे (तात्या टोपे) याना होती. पण सुधाताईंसमोर ते फिके पडतात. आणि मोहन कोठीवानांचा नाटकी नवाब त्याना इतरत्र संधी देत नाही. लहानपणी शालेय पुस्तकामध्ये तात्यांचा जो फोटो पाहिला तशी त्यांची वेषभूषा म्हणून त्यांना तात्या टोपे म्हणायचे इतकेच.

नाटकाचे दिग्दर्शन पुरुषोत्तम दारव्हेकर यानी केले आहे. सर्वसाधारणपणे त्यांची कामगिरी समाधानकारक असली, तरी जुलेखाला त्यांनी थोडाफार आवर घालणे आवश्यक होते.

नाट्यनिर्मितीसाठी संपदेने पाण्यासारखा पैसा खर्च केला आहे. सरकत्या रंगमंचावर स्थलकाळाशी अनुरूप ठरावीत अशी विविध दृश्ये, पात्रांची वेषभूषा, आणि प्रकाश, ध्वनी व अन्य तांत्रिक बाजू यामध्ये त्यानी कमतरता भासू दिलेली नाही.

शब्दसंपन्न कलाकृती, आणि उत्तम निर्मिती यांचा हा योग रसिक प्रेक्षकांनी चुकवू नये असे सुचवावेसे वाटते.

□ □ □



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

२५ एप्रिल ते १ मे १९७०

**मेष :** या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला शुभफलदायी आहे. रवी-बुध-शनी पहिले, दुसरे शुक्र-मंगळ, राहू अकरावा व गुरू सातवा असे सर्वच ग्रह शुभस्थानात आहेत. शुक्र-मंगळ अचानक धनलाभ करून देतील. विद्येत यश प्राप्त होईल. संततीचा उत्कर्ष होईल. मेडिकलचा अभ्यास करणारांना जास्त यशकारक. मित्रांकडून सर्व प्रकारची मदत मिळेल. चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे. ते अत्यंत चांगले आहे. ता. २६।२७ ला घरासंबंधी अगर घराचे जागेसंबंधी व्यवहार ठरतील. नोकरीत बदलीचा योग आहे. ता. ३०।४ व १।५ ला वडील नातलगांकडून त्रास होईल. मनस्वास्थ्य बिघडून त्रास फार होईल. ४२ वयाच्या पुढील व्यक्तींना चैनीच्या वस्तूंच्या व्यापारात जास्त फायदा होईल. शुक्रवारी स्त्रियांकडून अनपेक्षित आर्थिक फायदा होईल. घरात विवाहाच्या वाटाघाटी होतील. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे च, ल, र, त, अ ह्या नावांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. चंद्राचे दर्शन रोज सायंकाळी करावे. शुभ तारखा २६।२७।३० आणि १।५

**वृषभ :** या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला सर्व बाबतीत यश देणारे आहे. रवी-बुध-शनी बारावे, मंगळ-शुक्र पहिले, दहावा राहू, गुरू सहावा व चंद्राचे भ्रमण ८।९।१० स्थानातून आहे. प्रेमविवाह जमण्याचा योग आहे. भागीदार चांगले वागतील. सार्वजनिक कामात अपयश येईल. संततीकडून सुखदायक कृत्ये केली जातील. धनलाभात अडथळे येतील. सरकारी येणे लांबणीवर पडेल. अचानक धनलाभ लॉटरीत ता. ३०।४ व १।५ ला होण्याचा जोरदार योग आहे. नाट्य-व्यवसायातील व्यक्तींना जगाचे पुढे येण्याचा चांगला योग आहे. वडील माणसे आजारी पडण्याची शक्यता आहे. शत्रुनाश निश्चित होईल. लग्नातील शुक्र-मंगळ मेडिकल व्यावसायिकांना अतिशय धन मिळवून देईल. षष्ठातील गुरू धन व दशम स्थानावर पाहात आहे. तो जात असलेला पत संभाळील व धनव्यवस्था नीट राखील. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे व, ब, न, य, आ, ई, उ, ए, ओ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २८।२९।३० व १।५

**मिथुन :** या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशीला उत्कर्षकारक आहे. अकरावे रवी-बुध-शनी, बारावे शुक्र-मंगळ, नववा राहू व पाचवा गुरू असे सर्व ग्रह शुभ फलदायी आहे. शुक्र-मंगळाचा शुभ योग आहे, पण त्याला स्थानबल नाही. त्यामुळे

त्याचे मिश्र फळ मिळेल. शत्रुनाश होईल. मामाकडून अगर सासऱ्याकडून उत्तम मदत होईल. संततीकडून अपेक्षाभंग होईल. विद्येत यश येईल. चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून आहे, ते चांगले आहे. पत्नीकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. मंगळवार बुधवार रोजी धनलाभ होईल. ता. १।५ ला थोडे मनस्वास्थ्य बिघडेल. मनाविरुद्ध गोष्टी घडतील. सरकारी व सहकारी कामात यश मिळेल. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे क, प, द, ध, च, फ, झ, ज्ञ, घ, छ, थ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा २८।२९।३० व १।५

कर्क : या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला हानीकारक आहे. दहावे रवी-बुध-शनी, अकरावे मंगळ-शुक्र, आठवा राहू आणि चौथा गुरू अशी मिश्र फलदायक ग्रहांची अवस्था आहे. दशमातील गोचरी शनी पितृनाश अगर पत नष्ट करतो. त्याचबरोबर रवी-शनीचा उच्चनीच राजयोग झाला आहे, तो तितकासा चांगला नाही. बुद्धिभ्रंश होऊन हातून भयंकर चुका होतील उद्योगात अपयश. संततीकडून मदत होईल. चंद्राचे भ्रमण ६।७।८ स्थानातून आहे, ते मिश्र फलदायी आहे. ता. २६।२७ ला कोणतेही हाती घेतलेले काम सफल होईल. ता. ३०।४ व १।५ ला सर्व बाबतीत अपयश, धननाश होईल. राग अनावर होईल दररोज शंकराचे दर्शन घ्यावे. सिंडिकेटच्या कामात अपयश येईल. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे ज, स, ख, ह, ड ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा २६।२७।२८।२९

सिंह : या सप्ताहातील ग्रहमान सिंह राशीला शुभफलदायी आहे. रवी-बुध-शनी नववे, मंगळ-शुक्र दहावे, राहू सातवा, गुरू तिसरा असे राहूशिवाय सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. राहूमुळे मनस्वास्थ्य बिघडेल. भागीदाराशी मतभेद होईल. विद्येत यश मिळेल. संततीचा उत्कर्ष होईल. अचानक धनलाभ होईल. नोकरी व्यवसायात मानमान्यता मिळेल. घरात शुभ समारंभ होईल. एकच राजयोगकारक ग्रह मंगळ शुक्राबरोबर दशमात आहे. तो स्त्रियांकडून मान मिळवून देईल. नाट्य-व्यवसायातील व्यक्तींना अनोखे यश प्राप्त होईल. चंद्राचे भ्रमण ५।६।७ स्थानातून आहे. ते चांगले आहे. ता. २६।२७ ला नाट्य-व्यवसायातील व्यक्तीचे कौतुकास्पद काम होईल. ३०।४ व १।५ ला थोडेसे मनस्वास्थ्य बिघडेल. पण शत्रुनाश होऊन हाती घेतलेल्या सार्वजनिक कामात यश प्राप्त होईल. म, श, म, ट आणि ठ ह्या अक्षरांनी नावे सुरू असलेल्या व्यक्ती अगर संस्थांना असेच फळ मिळेल. शुभ ता. २५।२६।३० व १।५

कन्या : या सप्ताहातील ग्रहमान कन्या राशीला मिश्र फलदायी आहे. अष्टमात रवी-बुध-शनी, नवमात मंगळ-शुक्र, षष्ठात राहू व धनस्थानात गुरू असे शुभाशुभ स्थानात ग्रह आहेत. विद्येत अपयश. संततीकडून अडचणी निर्माण केल्या जातील. फौजदारी खटल्यात भाग घ्यावा लागेल. मानहानी होईल. धनलाभात अनपेक्षित अडथळा निर्माण होईल. चंद्राचे भ्रमण ४।५।६ स्थानातून आहे, ते बरे आहे. ता.

२५।२७ ला सुखहानी होईल २८।२९ ला अनपेक्षित धनलाभ होईल. फॅन्सी वस्तूचा व्यवसाय करणारे, वाद्य-व्यवसाय करणारे, नट-दिग्दर्शक या सर्वांना दिवस चांगले आहेत. प्रेमप्रकरणापासून दूर राहावे " प्रक्षालनात्‌हि पकस्य दूरात्‌ अस्पर्शनं वरम्‌ ॥ क, प, द, ध, फ, झ, ज्ञ, भ, घ, थ, छ ह्या अक्षरांनी ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे सुरू असतील त्यानाही असेच फळ मिळेल. शुभ तारखा २७।२८।२९

तूळ : या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला लाभदायक आहे. रवी-बुध-शनी सातवे, शुक्र-मंगळ आठवे, राहू पाचवा व गुरू लग्नी असे शुक्र-मंगळाशिवाय सर्व ग्रह शुभ स्थानी आहेत. चंद्राचे भ्रमण ३।४।५ स्थानातून आहे. ते चांगले आहे. अचानक धनलाभ होईल. प्रेमप्रकरणात मतभेद होऊन ताटातूट होण्याचा योग आहे. विद्येत भरघोस यश मिळेल. मित्रांकडून मदत होईल. भागीदारीत गोंधळ माजेल. ता. २८।२९ ला सरकारी कामात भरघोस यश मिळेल. ता. २५।२६ प्रवासाचे बेत होतील. त्यात फायदा होईल. ३०।४ व १।५ ला संततीकडून मनाला तापदायक गोष्टी केल्या जातील. तूळ राशीची माणसे अत्यंत धोरणी असतात. ते धोरण कायम ठेवून व्यवहार करावा. वाईट परिणाम घालविण्याकरता दररोज १०८ गायत्री जप करावा. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे च, ल, र, त, अ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २५।२६।२७।२८

वृश्चिक : या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला मिश्र फलदायी आहे. रवी-बुध-शनी सहावे, मंगळ-शुक्र सातवे, राहू चौथा व गुरू बारावा असे ग्रह शुभाशुभ स्थानात आहेत. पैशाचा खर्च फार होईल. विद्येत अपयश. अचानक धनलाभ हातात पडताता अडथळे येतील. भागीदारांकडून चांगली मदत होईल. संसारात आनंद निर्माण होईल. नाट्य-व्यावसायिकांना प्रसिद्धी मिळविण्याला दिवस चांगले आहेत. चंद्राचे भ्रमण २।३।४ या स्थानातून आहे, ते चांगले आहे. ता. २५।२६ ला येणारे पैसे आपोआप येतील. प्रवास घडेल. त्यात द्रव्यलाभ होईल. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे. न, य, व, ब, आ, इ, ई, उ, ओ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरील फळे मिळतील. शुभ तारखा २५।२६।२७।२८

धन : या सप्ताहातील ग्रहमान धनराशीला सौख्यकारक आहे. रवी-बुध-शनी पाचवे, शुक्र-मंगळ सहावे, राहू तिसरा व गुरु अकरावा असे सर्व ग्रह शुभ स्थानात आहेत. शत्रूचा नाश होईल. विद्याभ्यासात यश मिळेल. संततीचा उत्कर्ष होईल. मातुल घराण्याकडून मदत होईल. चंद्राचे भ्रमण १।२।३ घरातून आहे, ते फार चांगले आहे. ता. २६।२७ ला अचानक धनलाभ होईल. लॉटरीत ४।७।१।० या आकड्यांच्या कॉंबिनेशनचे तिकीट घेतल्यास रुपया फुकट जाणार नाही. विवाहाचे बेत ठरतील. ता. ३०।४ व १।५ ला जरासे मनस्वास्थ्य बिघडेल. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे क, प, द, ध, फ, झ, ज्ञ, भ, घ, थ, छ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. सर्व सप्ताहच शुभफलदायक आहे.

मकर : या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला सौख्यकारक आहे. रवी-बुध-

शनी चौथ, शुक्र-मंगळ पाचवे, राहू दुसरा असे सर्वच ग्रह योगबलात आहेत, पण त्याना स्थानबल नाही. विद्याभ्यासात विशेषत: कलांमध्यें यश येईल ' चित्रकला, गायनकला, नाट्यकला यामध्ये उत्कर्ष होईल. नोकरी नसणाराना नोकरी मिळेल. सरकारी व सहकारी कामात यश येईल. चंद्राचे भ्रमण १२।१।२ ह्या स्थानातून आहे, ते साधारणच आहे. ता. २६।२७ ला भागीदाराशी व पत्नीशी मतभेद होईल. ता. २८।२९ ला अचानक धनलाभ होईल. वडील भावडाकडून चांगली मदत होईल. मित्र उपयोगीं पडतील. राग अनावर होईल. त्यामुळे आर्थिक नुकतान होईल. सयम पाळावा. वाईट फल कमीं होण्याकरता १०८ गायत्री जप करावा. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे ज, स, ख ह ड ह्या अक्षरानी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा २६।२७।२८।२९

कुंभ : या सप्ताहातील ग्रहमान कुंभ राशीला शुभफलदायी घटना घडवून आणणारे आहे. रवी-बुध-शनी तिसरे, शुक्र-मंगळ चौथे, पहिला राहू व गुरु नववा असे सर्व ग्रह सेवेला तयार आहेत. विद्येत यश येईल. सरकारी कामात यश येईल. सततीचा उत्कर्ष होईल. मानमान्यता प्राप्त होईल. विवाह जमण्याचा योग येईल. शुक्र-मगळ केंद्राधिपती असून चतुर्थात आहेत. सौख्य-मगल प्रसंग घरातच घडून येईल. चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे; ते चांगले आहे. ता. २५।२६ ला मित्रांकडून व वडील भावडाकडून मदत होईल. ता. २८।२९ ला सरकारी कामाकरता प्रवासयोग घडेल व त्यात यश येईल. इजीनीयर्स, डॉक्टर्स या धद्यातील लोकांना फारच फायदा होईल. ता. ३०।४ व १।५ ला वयाचे ४२ च्या पुढे असलेल्या लोकांना अपघात-नुकसान होण्याचा योग आहे. जपून राहावे. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे ग, श, म, ट, ठ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील, शुभ तारखा २५।२६।२७।२८।२९.

मीन : या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला शुभफलदायी आहे. रवी-बुध-शनी दुसरे, मंगळ-शुक्र तिसरे, राहू बारावा, गुरू आठवा, अशी ग्रहाची मांडणी आहे. ग्रहांना योगबल आहे. पण स्थानबल नाही. अचानक धनलाभाची साधने उपलब्ध होतील. ता. २५।२६ ला विद्याभ्यासात यश येईल. शत्रूचा नाश होईल. मातुल घराण्याकडून त्रास होईल. घरात शुभ समारभ घडण्याचा योग येईल. मित्राकडून हातात घेतलेल्या कार्यात यश प्राप्त होण्यासारखी मदत होईल. चंद्राचे भ्रमण १०।११।१२ स्थानातून होत आहे, ते बरे आहे. ता. ३०।४ व १।५ ला अकल्पित मार्गांनी अचानक धनलाभ होईल. या दिवशी लॉटरीत भाग घेतल्यास त्यात हमखास यश येईल. १।२।७।८ हे अक या आठवड्यात शुभदायी आहेत. या अंकांच्यामुळे तयार होणारे तिकीट घेतले तर ते फुकट जाणार नाही. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे क, प, द, ध, फ, क्ष, ज्ञ, घ, भ, थ, छ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. सर्व आठवडाच शुभफलदायी आहे.

□ □ □

## विचार वारे

[ पृष्ठ ७ वरून ]

आधुनिक युगाचे लक्ष आकर्षून घेणारे एक वैशिष्टय म्हणजे सर्व जगात जेथे जेथे उद्योगधंदे आहेत तेथे तेथे त्यांच्या संचालनात कामगार अधिकाधिक भाग घेऊ लागले आहेत. या पद्धतीला सहकारी संचालन ('पार्टिसिपेटिव्ह मॅनेजमेंट') म्हणता येईल. सहकारी संचालनाचे सहा प्रमुख प्रकार आहेत. पहिला प्रकार म्हणजे कामगारांनी स्वतःच संपूर्ण संचालन करायचे. ही पद्धत युगोस्लाव्हियात व अल्जीरियाच्या काही उद्योगधंद्यात आहे. दुसरा प्रकार म्हणजे संचालक किंवा पर्यवेक्षक मंडळात एक तृतीयांश किंवा अर्धे सभासद कामगारांचे प्रतिनिधी असतात. ही पद्धत पश्चिम जर्मनीत आहे. तिसरी पद्धत म्हणजे कामगारांची सल्लागार मंडळे कायद्याने स्थापन करण्यात येतात, पण प्रत्यक्ष निर्णय घेण्याच्या कामात त्यांचा तोटा नसतो. ही पद्धत हॉलंड व ऑस्ट्रियामध्ये सर्रास वापरात आहे. चौथा प्रकार म्हणजे कायद्याचे बंधन नसतानाही मजूर व मालक यांच्यात करार होऊन त्या करारानुसार कामगार उद्योग-संचालनात भाग घेतात. ही पद्धत स्कॅन्डिनेव्हियन देशात पहायला मिळते. पाचवा प्रकार म्हणजे ट्रेड युनियनच्या मार्फत कामगारांनी संचालनाचा अधिकार वापरणे. हा अधिकार वाटाघाटीने मिळविण्यात येतो किंवा सोव्हिएट रशियासारख्या एकचालकानुवर्तित्ववादी देशात जरी एकाच व्यक्तीच्या हाती सर्व अधिकार असला तरी त्याच्या निर्णयावर छाप पाडण्याइतके सामर्थ्यशाली ट्रेड युनियन चालवून गाजविता येतो आणि सहावा प्रकार म्हणजे काही विशिष्ट कामगारांना निर्णय घेण्याच्या कामी मदत करण्यासाठी व्यक्तिशः बोलावण्यात येते. ही पद्धत अमेरिकेत अनेक ठिकाणी पहावयास मिळते मात्र कुठल्याही पद्धतीच्या उपयुक्ततेचे अध्ययन करताना 'केस-स्टडी" पद्धत वापरणे आवश्यक आहे. कारण हे तंत्र वापरल्याने कामगाराशी प्रत्यक्ष संबंध येतो व निर्णय कसे घेतले जातात हे जवळून पहायला मिळते.

□ □ □

आणि हे बघ...लोणचे करतांना वावरून जाऊं नकोस. सरळ ठाकूर यांचा लोणच्याचा तयार मसाला वापरून "ह्यांना" खुष कर



लोणची कमी श्रमांत, अल्प खर्चांत रुचकर, टिकाऊ व चवदार बनतात.

ठाकूर आणि मंडळी

माहीम, मुंबई-१६.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649




" हवामानाबरोबर सीमाप्रश्नासंबंधीही दररोज अंदाज वर्तवण्याचं काम वेधशाळेला का देत नाहीत हो ? ... "